


# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

अमरावती, मंगळवार ५ मे २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०




## भाजपसाठी आज 'सोनिया'चा दिन!

**देशातील पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांच्या निकालाचे कल हा मजकूर लिहेपर्यंत पुरेसे स्पष्ट झालेले आहेत. पाचपैकी पश्चिम बंगाल आसाम आणि पुद्देचरी या तीन राज्यात भारतीय जनता पक्षाने निर्विवाद यश संपादन केलेलं आहे आणि केरळ तसेच तमिळनाडू या दोन राज्यात उल्लेखनीय यश संपादन केलं आहे ; केरळात तर डाव्यांचा सत्तेचा शेवटचा बुरुज ढासळला आहे . एका अर्थानं भाजपसाठी आज 'सोनिया'चा दिन आहे असं म्हणायला हरकत नाही !**


यात सर्वाधिक धक्कादायक निकाल पश्चिम बंगालचा आहे. २००च्या घरात जागा संपादन करत भाजप बाबू मोशायच्या सत्ता स्थापन करेल. या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसचा दणदणीत पराभव झालाय. गेल्या वेळेस गेल्या निवडणुकीत २१० पेक्षा जास्त जागा मिळवणारा तृणमूल काँग्रेस ८० च्या उंबरठ्यावर गटांगळ्या खातो आहे . खरं तर , निवडणुकीची प्रक्रिया म्हणजे प्रचार अर्ध्यावर आलेला होता तोपर्यंत तृणमूल काँग्रेस पश्चिम बंगालमध्ये कशीबशी का असेना सत्ता स्थापन करेल, अशी शक्यता असल्याचं वातावरण राजकीय वर्तुळात होतं पण , भाजपनं हे वातावरण निवडणुकीच्या उत्तरार्धात पार बदलून टाकलं. संसदेत महिला आरक्षण विधेयक पराभूत करण्यात विरोधी पक्षांना यश आलं तेव्हाच समाज माध्यमांवर मी कमेंट केली होती की, विरोधी पक्षांनी भाजपाला एक धारदार राजकीय हत्यार मिळवून दिलं आहे आणि अगदी त्याप्रमाणे घडलं . लोकसभेत महिला आरक्षण विधेयक दोन तृतीयांश बहुमताअभावी फेटाळलं गेल्याच्या दुस-या दिवशी पासून काँग्रेससह अन्य सर्व विरोधी पक्ष कसे महिला विरोधी आहेत , असा देशव्यापी आक्रमक प्रचार भाजपनं सुरु केला . त्यात निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहोचलेल्या या पाच राज्यांचाही समावेश होता . खरं तर , विरोधकांकडे लोकसभेत १९९ इतकं मोठं संख्याबळ होतं , त्या आधारे महिला आरक्षण विधेयक एकतर संयुक्त संसदीय चिकित्सा समितीकडे सोपवून मोकळं होता आलं असतं किंवा सामंजस्याने काही तरी मार्ग काढून महिला आरक्षण विधेयक संमत होउ द्यायचं आणि मतदारसंघांच्या पुनर्रचनेला दोन तृतीयांश बहुमत मिळू द्यायचं नाही, असा काहीतरी राजकीय मार्ग विरोधी पक्षांना का काढता आला नाही, हा एक प्रश्नच आहे. विरोधी पक्षांना या हे विधेयक पाडल्याचा आता पश्चाताप होईल हेही तेवढेच खरं!

प्रवीण बर्दापूरकर
Cellphone +919822055799
www.praveenbardapurkar.com
praveen.bardapurkar@gmail.com

पश्चिम बंगालमध्ये दुसरा प्रमुख फटका मतदार संघाच्या सखोल छाननीचा ( SIR ) बसला. निवडणुकीच्या निकालाचे कल बघत असताना भारतीय जनता पक्षानं (पान २ वर)


# तीन राज्यांत 'कमळ' फुलले

**पश्चिम बंगाल/293**



| आघाडी | संख्या |
|---|---|
| भाजप | 206 |
| काँग्रेस | 02 |
| टीएमसी | 81 |
| इतर | 04 |

**आसाम/126**




| आघाडी | संख्या |
|---|---|
| भाजप | 102 |
| काँग्रेस | 21 |
| इतर | 03 |

**पुडुचेरी/30**




| आघाडी | संख्या |
|---|---|
| एनडीए | 18 |
| काँग्रेस | 06 |
| इतर | 06 |

**तामिळनाडू/234**



| आघाडी | संख्या |
|---|---|
| टीवीके | 105 |
| अण्णा द्रमुक | 50 |
| डीएमके | 63 |
| इतर | 11 |

**केरळ/140**



| आघाडी | संख्या |
|---|---|
| यूडीएफ | 102 |
| एलडीएफ | 35 |
| एनडीए | 03 |
| इतर | 0 |

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सा-या देशाचे लक्ष लागून राहिलेल्या ४ राज्यांतील विधानसभा आणि केंद्रशासित प्रदेशातील निवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर झाले. ३ राज्यांत भाजपचे कमळ फुलले आहे. पश्चिम बंगालमध्ये भाजपने ऐतिहासिक विजय मिळवत मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या सत्तेला सुरूंग लावला. १५ वर्षांची सत्ताविरोधी लाट आणि तृणमूल काँग्रेसच्या अंतर्गत आव्हानांचा फायदा घेत भाजपने हा गड सर केला. पंतप्रधान मोदींच्या निवडणूक प्रचाराने भाजपच्या या प्रचंड विजयात महत्त्वाची भूमिका बजावली. निवडणूक सभांमध्ये त्यांनी भ्रष्टाचारावरून तृणमूल काँग्रेसवर हल्ला चढवला. त्यांनी सत्ताधा-यांवर हिंसाचार आणि गैरकारभाराचा आरोप केला आणि तरुण व महिलांना भाजपला मतदान करण्याचे आवाहन केले.

झाडग्राममधील निवडणूक प्रचारादरम्यान मोदींनी आपला ताफा थांबवून एका स्थानिक विक्रेत्याकडून झालमुरी विकत घेउन खाल्ली. हा क्षण एक उत्स्फूर्त आणि सर्वांना भावणारा म्हणून मोठ्या प्रमाणावर (पान २ वर)

## ममता भवानीपूरमधून 15000 मतांनी पराभूत

**कोलकाता**-बंगालमधील २९४ जागांपैकी भाजपने १६६ जागा जिंकल्या असून ४२ जागांवर आघाडी घेतली आहे. टीएमसीने ५९ जागा जिंकल्या असून २० जागांवर आघाडी घेतली आहे.काँग्रेसने केवळ दोन जागा जिंकल्या आहेत. कमी मते मिळालेल्या एका जागेवर २१ मे रोजी फेरमतदान होणार आहे.



भवानीपूरमध्ये सुवेंदू यांनी ममता बॅनर्जी यांचा १५,११४ मतांनी पराभव केला. ममता बॅनर्जी यांनी मतमोजणी केंद्रावर सुमारे पाच तास घालवले. बाहेर आल्यावर, आपल्याला आत ढकलून मारहाण करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. फेरमतमोजणी झाली पाहिजे. आरजी कर बलात्कार पीडितेच्या आईचा विधानसभेत विजय झाला आहे.

# गंगोत्री ते गंगासागर कमळमय

## ऐतिहासिक विजयानंतर पीएम मोदींनी कार्यकर्त्यांचे मानले आभार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल आणि आसाम विधानसभा निवडणुकांमध्ये मिळालेल्या अभुतपूर्व यशानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांचे कौतुक करत विजयाचे श्रेय त्यांच्या दीर्घकाळाच्या परिश्रमांना दिले. पश्चिम बंगालमधील भाजपची ही ऐतिहासिक कामगिरी अनेक पिढ्यांपासून काम करणा-या असंख्य कार्यकर्त्यांच्या संघर्षामुळेच शक्य झाली आहे. मी सर्वांना सलाम करतो, असे उद्गार पीएम मोदींनी काढले.

नवी दिल्लीतील भाजप मुख्यालयात झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधानांनी भारत माता की जयच्या घोषणेसह आपल्या भाषणाची सुरुवात करत हा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व असल्याचे म्हटले. पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये पक्षाला मिळालेल्या मोठ्या यशाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, आज देशातील २० हून अधिक राज्यांत एनडीए-भाजप सरकार कार्यरत आहे



आणि नागरिकांच्या सेवेमुळेच जनतेचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. पीए मोदी पुढे म्हणतात, जिथे भाजप, तिथे सुशासन. हरियाणा, महाराष्ट्र, दिल्ली आणि बिहारमधील विजयासह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यशाचाही त्यांनी उल्लेख केला. पंतप्रधानांनी यावेळी पुडुचेरीतील जनतेचे आभार मानत तेथील विकासासाठी एनडीए सरकार कटिबद्ध असल्याचे म्हटले. तसेच आसाममध्ये तिस-यांदा भाजपवर जनतेने दाखवलेल्या विश्वासाला ऐतिहासिक घटना संबोधत राज्याच्या विकासाला अधिक (पान २

## केरळात 10 वर्षांनंतर काँग्रेसची सत्ता

**कोलकाता/दिसपूर/पुदूचेरी/ तिरुवनंतपुरम/चेन्नई /वृत्तसंस्था:** गेल्या काही दिवसांपासून संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीचा निकाल सोमवार दि. ४ मे रोजी जाहीर झाला. पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळ या पाचही राज्यांमध्ये सोमवारी सकाळी आठ वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. यामध्ये पश्चिम बंगालमध्ये भाजपला घवघवीत यश मिळाले. तर आसामध्येही भाजपने पुन्हा एकदा सत्ता राखण्यात यश मिळवले. तर केरळमध्ये डाव्यांचा शेवटचा गड पडला असून याठिकाणी काँग्रेसची सत्ता येण्याची शक्यता आहे. तर तामिळनाडूमध्ये विजय थलपति याच्या टीव्हीके पक्षाने मुसंडी मारत द्रमुक आणि अण्णाद्रमुकला मागे टाकले. तर पुद्दुचेरीमध्येही भाजपने (पान २ वर)

## पंतप्रधान मोदींचा 'बंगाली लूक' हिट!

### पारंपरिक धोती-कुर्त्यात भाजप मुख्यालयात एन्ट्री



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या अभूतपूर्व विजयानंतर, पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवारी दिल्लीतील भाजप मुख्यालयात पोहोचले. यावेळी त्यांच्या पेहरावापासून ते भाषणापर्यंत सर्वच गोष्टींनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. बंगालमध्ये तब्बल १५ वर्षांची ममता बॅनर्जींची सत्ता उलथवून भाजपने पहिल्यांदाच विजयाचा झेंडा फडकावला असून, या विजयाचा जल्लोष आज दिल्लीत पाहायला मिळाला.

पंतप्रधान मोदी हे नेहमीच आपल्या पेहरावातून एक विशिष्ट राजकीय संदेश देण्यासाठी ओळखले जातात. आजही त्याचा प्रत्यय आला. पंतप्रधान मोदींनी बंगालच्या पुरुषांचा पारंपारिक पेहराव असलेला पांढरा कुर्ता आणि तसर सिल्कचे धोतर नेसले होते. त्यांच्या धोतराला लाल रंगाची बॉर्डर होती. महत्त्वाचे म्हणजे, बंगाली परंपरेप्रमाणे त्यांनी धोतराचे एक टोक कुर्त्याच्या खिशात ठेवले होते. त्यांनी गळ्यात घातलेले सुती कापडाचे उपरणे देखील बंगालच्या संस्कृतीची ओळख करू न देत होते. (पान २ वर)

**निकालानंतर पश्चिम बंगालमध्ये तणाव!**

## TMC चे कार्यालय पेटवले


### निमलष्करी दलाच्या 700 तुकड्या तैनात

**कोलकाता/ वृत्तसंस्था:**पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू असतानाच, राज्याच्या अनेक भागांत हिंसाचाराच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. भारतीय जनता पार्टी ऐतिहासिक विजयाच्या



उंबरठ्यावर असून, या विजयामुळे ममता बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या सत्तेला सुरूंग लागणार आहे. मतमोजणी दरम्यान, राजकीय कार्यकर्त्यांमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर तृणमूल काँग्रेसचे एक पक्ष कार्यालय पेटवून देण्यात आले. आसनसोल आणि दिनहाटा येथील मतमोजणी केंद्रांवर संघर्षाच्या घटना घडल्याचे वृत्त आहे. आसनसोल इंजिनिअरिंग कालेज येथील मतमोजणी केंद्रावर, मतदान प्रतिनिधींमधील किरकोळ झटापटीचे एका मोठ्या संघर्षात रूपांतर झाले.

आसनसोल-दुर्गापूर पोलीस आयुक्तलयाचे आयुक्त प्रणव कुमार यांच्या मते, काही समाजकंटकांनी एका राजकीय पक्षाच्या कार्यालयांना लक्ष्य केले असून, यामध्ये सहभागी असलेल्यांची ओळख (पान २ वर)






# CM फडणवीसांनी केले श्यामाप्रसाद मुखर्जींचे स्मरण

## म्हणाले, 'प.बंगालचा खरा पक्ष भाजपाच...'

**मुंबई/प्रतिनिधी :** देशातील जनतेला एकच गोष्टी माहिती आहे की, मोदी है तो मुमकिन है. पश्चिम बंगालला कुशासनातून बाहेर काढण्याचे काम जनतेने केले आहे. ३० वर्षे काँग्रेस, ३६ वर्षे कम्युनिस्ट आणि या दोघांपेक्षा भयंकर ममता बॅनर्जी यांचे शासन होते. पश्चिम बंगाल देशातील पहिले औद्योगिक राज्य होते. सात हजार उद्योग तिथून सोडून गेले. पश्चिम बंगालची अवस्था जंगलराज झाली होती. पण पंतप्रधान मोदी यांनी जे व्हिजन मांडले, जो आशेचा किरण दाखवला त्यावर लोकांनी विश्वास दाखवला. जनतेला हा विश्वास बसला की पश्चिम बंगालचे परिवर्तन कुणी करू शकते, तर त्या व्यक्तीचे नाव नरेंद्र मोदी हेच आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचे निकाल हाती येण्यास सुरु वात झाली आहे. २९३ जागांपैकी एकूण २०२ जागांवर भाजपा आघाडीवर असून, २१ जागी भाजपा उमेदवारांनी विजय मिळवला आहे. तर ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष एकूण ८५ जागांवर आघाडीवर असून, ८ जागांवर तृणमूलचे उमेदवार विजयी झाले आहेत. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने जोरदार मुसंडी मारली असून, देशभरात विजयोत्सव साजरा केला जात आहे. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मुंबई मुख्यालयात जल्लोष केला.

**पश्चिम बंगालमध्ये परिवर्तन नाही, तर महापरिवर्तन झाले**

हा दिवस सगळ्यांसाठी ऐतिहासिक आहे. पश्चिम बंगालमध्ये गेलो होतो, तेव्हा पत्रकार परिषदेत तिथल्या एका पत्रकाराने विचारले होते की, ममतादीदी म्हणतात भाजपा आणि त्यांचे नेते बंगालच्या बाहेरचे आहेत. बाहेरचे लोक मते मागतात. मी पत्रकारांना सांगितले की, भाजपाची स्थापना ज्यांनी केली, ते श्यामाप्रसाद मुखर्जी हेच पश्चिम बंगालचे होते, त्यामुळे ख-या पश्चिम बंगालचा पक्ष कोणता असेल, तर तो भारतीय जनता पक्ष आहे. पश्चिम बंगलाच्या जनतेने ममता दीदींना दाखवून दिले की, पश्चिम बंगालचा खरा पक्ष कोणता आहे. पश्चिम बंगालच्या लोकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींवर विश्वास ठेउन नुसते परिवर्तन नाही, तर महापरिवर्तन करून दाखवले. ते इतके आहे की, दोन तृतीयांश संख्याबळ भाजपाला मिळते आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

दरम्यान, पंतप्रधान मोदींवरचा विश्वास जनतेने मतपेटीतून दाखवला आहे. आपले मास्टर स्ट्रॅटेजिस्ट आणि आधुनिक राजकारणातील चाणक्य अमित शाह यांनी ज्या प्रकारे योजना तयार केली आणि आपले नेतृत्व काय आहे, ते दाखवून दिले. तसेच आपले राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, नेते शुभेंदू अधिकारी यांच्यासह मी सगळ्यांचे अभिनंदन करतो. पश्चिम बंगलचा विजय हा केवळ एका राज्याचा विजय नाही. पश्चिम बंगालचा विजय हा भारतात होणारी घुसखोरी, भारतावर होणारे हल्ले यापासून भारताला वाचवणारा विजय आहे, असेही फडणवीस म्हणाले.

# निकालाची धाकधूक, दिवसभर दुकान बंद ठेवले, भाजपा विजयी होताच पुन्हा उघडले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकांचे निकाल हाती येण्यास सुरु वात झाली आहे. २९३ जागांपैकी एकूण २०४ जागांवर भाजपा आघाडीवर असून, ६६ जागी भाजपा उमेदवारांनी विजय मिळवला आहे. तर ममता बॅनर्जी यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष एकूण ५३ जागांवर आघाडीवर असून, ३० जागांवर तृणमूलचे उमेदवार विजयी झाले आहेत. तर काँग्रेस पक्ष २ जागांवर आघाडीवर असून, एक जागा जिंकली आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने जोरदार मुसंडी मारली असून, देशभरात विजयोत्सव साजरा केला जात आहे. यातच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ज्या दुकानात झालमुडी घेतली होती, त्या विक्रेत्याची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी पश्चिम बंगालमध्ये गेले होते. त्यावेळी त्यांनी झालमुडीचा आस्वाद घेतला. पंतप्रधान मोदींचा झालमुडी विकत घेतानाचा व्हिडीओही व्हायरल झाला होता. यानंतर देशभरात या घटनेची मोठ्या प्रमाणावर चर्चा झाली होती. भाजपाच्या पश्चिम बंगालमधील विजयाच्या निर्णायक मुद्द्यांमध्ये पंतप्रधान मोदी यांनी झालमुडी विक्रेत्याच्या दुकानाला दिलेली भेट आणि



आपलेपणाने साधलेला संवाद हाही एक मुद्दा मानला जात आहे. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत भाजपाने विजयश्री खेचून आणताच त्या झालमुडी विक्रेत्याची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे.

पश्चिम बंगालमधील झारग्राम येथे काही दिवसांपूर्वी एका रॅलीहून परतत असताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी येथील एका झालमुडी विक्रेत्याच्या दुकानात थांबले होते. त्यांनी या झालमुडीचा आस्वाद घेतला होता. निवडणुकीच्या निकालांबाबत असलेल्या अनिश्चिततेमुळे दुकानदार विक्रम कुमार साउ यांनी दिवसभर आपले दुकान बंद ठेवले होते; मात्र भाजपच्या विजयानंतर सायंकाळी त्यांनी ते पुन्हा उघडले. या दुकानाबाहेर भाजपा कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. तसेच या दुकानासमोर भारत माता की जय, जय श्रीराम अशा घोषणाही दिल्या. भाजपाच्या यशाबाबत प्रतिक्रिया देताना दुकानदार विक्रम कुमार साउ म्हणाला की, खूपच छान वाटले. केवळ माझे दुकानच प्रसिद्ध झाले नाही, तर 'झालमुरी'ला एक खाद्यपदार्थ म्हणून संपूर्ण भारतात ओळख मिळाली आहे.दरम्यान, पंतप्रधान मोदी यांच्या भेटीनंतर विक्रम साह यांनी या अनुभवाबाबत सांगितले. पंतप्रधान मोदी यांना झालमुडी खूपच आवडली. त्यांनी माझे नाव विचारले आणि किती शिक्षण घेतले आहे, हेही विचारले. पंतप्रधान मोदी येथे १० मिनिटे थांबले होते. त्यांच्यासोबत लहान मुलेही होती. पंतप्रधान माझ्या दुकानात येतील, असे वाटले नव्हते. पुढे हसून विक्रम यांनी म्हटले होते की, एका गोष्टीची खंत आहे, ती म्हणजे, मी पंतप्रधानांची स्वाक्षरी घ्यायला विसरलो. हा क्षण मी आयुष्यभर लक्षात ठेवेल. देशाचे पंतप्रधान माझ्या छोट्याशा दुकानात आले याचा मला खूप आनंद झाला होता.

पान १ व १० वरून

## भाजपसाठी आज 'सोनिया'चा दिन!

पश्चिम बंगालच्या मुस्लिम बहुल भागातही मोठे यश मिळवल्याचं समोर येत आहे . याचा अर्थ त्या मतदारसंघांमध्ये 'एक विरु द्ध अन्य सर्व' हे समीकरण लोकांच्या मनावर बिंबवण्यात आणि ते मतांमध्ये परावर्तित करु न घेण्यात भाजपाला यश आलेलं आहे . हे तिन्ही मुद्दे लक्षात घेतले तर 'शुद्ध' लोकशाहीच्या मार्गानं भारतीय जनता पक्षानं पश्चिम बंगालमध्ये यश मिळवलं असं म्हणणं हे एक धाडसच म्हणावं लागेल . अर्थात निवडणुकीच्या रिंगणात हे असे 'फंडे' वापरले जातच असतात ; पूर्वी मोठ्या प्रमाणात असे फंडे किंवा भावनेला हात घालण्याचे मुद्दे काँग्रेसकडून समोर केले जात असत , आता म्हणजे २०१४ नंतर भाजपनं निवडणुकीच्या या 'कौशल्यां'वर पकड मिळवलेली आहे असं म्हणता येईल .

एखादा प्रचार कसा उलटू शकतो याची हकीकत आज सकाळी समजली-मतदानाचे कल समजल्यावर कोलकत्यामधील एका पत्रकार मित्राला फोन केला तर तो म्हणाला, 'केवळ एस आय आर आणि महिला आरक्षणच नव्हे तर पश्चिम बंगालच्या उपसागरातले मासेही भाजपच्या विजयाच्या बाजून उभे ठाकल्याचं चित्र आहे!' . त्याचा संदर्भ काय तो विचारला तर त्यांनी सांगितलेली हकीकत अशी–

निवडणुकीच्या काळात तृणमूल काँग्रेस कडून 'बीजेपी एले, मायेर आमिष भोग होबे तो?' म्हणजे भाजपाचे सरकार आलं तर पश्चिम बंगालची जनता कालीमातेला माशांचा प्रसाद (भोग) चढवू शकणार नाही' . तशी पोस्टर्सही गल्लीबोळात लावली गेली, गल्लोगल्लीच्या प्रचारातही हा मुद्दा आला तेव्हा भाजपाने, 'खेये माछ रातदिन, बीजेपीको व्होट दिन. म्हणजे, तुम्ही केव्हाही मासे खा, मातेला माशांचा प्रसाद चढवा, मत मात्र भाजपाला द्या. लोकांनी भाजपाचा हे आव्हान फार आवाहन फारच मनावर घेतलं! असं हसत हसत हा माझा मित्र म्हणाला.

पश्चिम बंगालमध्ये माया ममता बॅनर्जी यांची गेली सलग पंधरा वर्षे सत्ता होती . ही सत्ता उलथवून टाकण्याचे प्रयत्न भाजपाकडून गेल्या तीन निवडणुकांपासून सुरु होते . पहिल्या निवडणुकीत त्यांनी तीन जागा मिळवल्या, दुस-या निवडणुकीत हा आकडा ७० वर नेला आणि आता भाजपा विधानसभेत दोनशे जागांच्या उंबरठ्यावर उभा आहे , असं चित्र आहे . केवळ तीन निवडणुकांत भाजपने गाठलेली ही मजल विशेष उल्लेखनीय म्हणायला हवी कारण १५ वर्षात एखाद्या राज्यात केवळ अस्तित्व निर्माण करायचं नाही तर सत्ता संपादन करायची , हे राजकीय आव्हान फार मोठं आणि काटेरी असतं . त्यावर भाजपनं मात केली याचं . कारण एक तर ममता बॅनर्जी हा भाजपाला पर्याय नाही हे भाजपच्या नेत्यांना चांगलं ठाउक होतं . अतिशय आक्रस्ताळा आणि कर्कश्श असा त्यांचा लौकिक होता . शिवाय राज्यकारभार हाकताना एकारलेपणा त्यांनी कधीच सोडला नाही तरी त्याना जनतेचा मोठा पाठींबा होता कारण, बंगाली जनतेची प्रादेशिक अस्मिता (आठवा पक्षी : मानुष , माटी) आपल्या महाराष्ट्रापेक्षा जास्त कडवी आहे . त्यामुळे बंगालची मातीही भावनात्मक पातळीवर ममता बॅनर्जीच्या पाठीशी उभी राहिली . वर्षाचे बारा महिने इलेक्शन मोड मध्ये असण्याच्या भाजपच्या वृत्तीला आणि संघटनात्मक विणेला ममता बॅनर्जी कायम तोंड देउ शकत नाही हे भाजपला चांगलं ठाउक होतं . शिवाय ती प्रादेशिक अस्मिता आता आपल्या बाजूने विरत चाललेली आहे , मतदार भाजपच्या बाजूने झुकू लागलेला आहे , ममता बॅनर्जी यांच्या हाती सीमावर्ती भाग असलेला पश्चिम बंगाल सुरक्षित नाही , हा प्रचार प्रभावी ठरतो आहे , हे ममता बॅनर्जी यांच्या लक्षातच आलं नाही. केंद्र आणि राज्यात एकाच पक्षाचा सरकार असलं की 'डबल इंजिन' राज्यासाठी फायद्याचं ठरतं हाही मुद्दा होताच .

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे , पश्चिम बंगालमधील निवडणुकीचा सामना तसा विषम होता . भाजप हा देशातील सर्वात मोठा पक्ष आहे . या पक्षाकडे संगतान्म क्षमता , निष्ठावान कार्यकर्ते आणि साम आणि दंड भेदाची कोणतीही कमतरता नाही आणि नरेंद्र मोदी तसेच अमित शहा यांच्यासारखे 'चाणक्य' आहेत . हे चाणक्य निवडणूक जिंकण्यासाठी टोकाच्या राजकीय रणनीतीचा वापर करू शकतात. त्यातुलनेत ममता बॅनर्जी यांचा प्रभाव केवळ एका राज्यापुरता आहे . शिवाय भाजपा इतका राजकीय आक्रमकपणा आणि धनाचा साठा निवडणुकीत वापरण्यासाठी त्यांच्याकडे नाही हेही स्पष्ट होतं . एका अर्थानं जनतेचा नेता असलेल्या ममता बॅनर्जी विरु द्ध बलाढ्य नेते असा हा सामना होता . त्या तुलनेत निकालावर नजर टाकली तर ममता बॅनर्जी यांचा पश्चिम बंगालमधून बीमोड झालेला नाही, हे आपण लक्षात घेतलं पाहिजे

दुसरा धक्कादायक निकाल तमिळनाडूचा आहे गेली जवळजवळ पाच दशकं या राज्यात द्रविड मुन्नेत्र कळघम किंवा अखिल भारतीय द्रविड मुन्नेत्र कळघम अशी सत्तेची आलट-पालट होत आलेली आहे . याही निवडणुकीत द्रमुककडे सत्ता राहील असा अंदाज प्रारंभी होता . परंतु अलीकडच्या दीड दोन वर्षात थलपती विजय या नावाचं टीव्हीके नावाचं वादळ राज्यात प्रभाव निर्माण करत आहे याचा अंदाजच द्रमुक आणि अन्नद्रमुकला आला नाही . विजय यांचा मुख्य व्यवसाय अभिनय असला तरी त्यांनी त्यांची राजकीय महत्वाकांक्षा जबर आहे आणि ती साध्य करण्यासाठी अविरत श्रम घेण्याची त्यांची तयारी आहे , हे हळूहळू स्पष्ट होत गेलं पण , तोवर उशीर झालेला होता . शिवाय असं म्हणतात की रामचंद्रन यांच्यानंतर तमिळनाडूतले ते सर्वात प्रभावी सर्वात लोकप्रिय अभिनेते आहेत . अभिनेता म्हणून मिळालेली लोकप्रियता आणि राजकीय महत्त्वाकांक्षा यांचा मिलाफ झाला की जनमतावर मोठा प्रभाव पडतो हे याआधीही प्रादेशिक पातळीवर बघायला मिळालेलं आहे . आंध्र आणि तमिळनाडू ही त्याची उदाहरणं आहेत.

विशेषतः गेल्या सहा आठ महिन्यात थलपति विजय यांनी तमिळनाडू राज्य पिंजून काढलं आणि द्रमुक तसेच अद्रमुक हे एकाच अकार्यक्षम नाण्याच्या दोन बाजू कशा आहेत हे जनतेला पटवून दिलं. विशेषतः ज्यांचा विजय अपेक्षित मानला जातो का त्या द्रमुकच्या , विद्यमान मुख्यमंत्री स्टॅलिन यांना मात्र विजय नावाचा नट एक आभास आहे असंच वाटत होतं म्हणून विजय आणि त्यांना मिळणा-या जनतेच्या प्रतिसादाबद्दल स्टॅलिन गाफील राहिले . निकालांनी द्रमुक आणि अण्णाद्रमुक यांचे अंदाज साफ खोटे ठरवले या दोन्ही पक्षांच्या आळीपाळीनं सत्तेत येण्याच्या मनसुब्यांवर पाणी फिरवलं . तामिळनाडूमध्ये शंभरावर जागा मिळवून विजय यांचा हा पक्ष बहुमताच्या केवळ काही जागा कमी पडून थांबलेला आहे . त्यांना द्रमुक किंवा अण्णाद्रमुक यांच्याकडून बहुमताची रसद मिळण्याची शक्यता नाही . कदाचित अण्णाद्रमुक सोबतची युती तोडून भाजप त्यांना सत्तेत येण्यासाठी मदत करु शकतो , अशी शक्यता आहे .पुद्देचरी या छोट्याशा राज्यातील भाजपचा विजय उल्लेखनीय आहे . या निमित्ताने महाराष्ट्रा खालच्या दक्षिण भारतात जवळजवळ दहा वर्षानंतर भाजपची पुन्हा सत्ता येत आहे . याआधी कर्नाटकात भाजपची सत्ता होती पण ती गमावली गेली . आता दक्षिण भारतात भाजपकडे एकही राज्य नव्हतं. ती कसर पुद्देचरीनं भरु न काढली आहे . तमिळनाडू आणि केरळ या राज्यातही भाजपाने विधिमंडळात राजकीय अस्तित्व आणखी ठळक केलं आहे . उद्या दक्षिण भारत पादाक्रांत करण्यासाठीचं पाहिलं पाउल ठेवण्यासाठी राज्य म्हणून भाजपाला पुद्देचरीचा उपयोग होईल .एकूण काय तर आसाम आणि पश्चिम बंगालातील भरघोस विजयामुळे पूर्व , पश्चिम आणि उत्तर भारतात भाजपनं व्यवस्थित हातपाय पसरले आहेत, या सर्व भागातून काँग्रेस आणि डाव्यांचं अस्तित्व नाममात्र करु न टाकलं आहे. पाच राज्यातील विधानसभा निवडणुकात मिळालेल्या आजच्या मोठ्या उल्लेखनीय विजयामुळे भाजपचा संपूर्ण देश पादाक्रांत करण्याचा म्हणजे , भारत भगवा करण्याचा मनसुबा आणखी ठाम करण्यासाठी प्रेरणा मिळेल शिवाय नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला भारतीय जनता पक्षात कोणताही पर्याय नाही हेही या निकालांनी सिद्ध केलेलं आहे . त्यामुळे नरेंद्र मोदी आणि भाजप यांच्यावर केलेल्या टीकेला पिसाळून उत्तर देण्यासाठी ट्रोल्सना बळ मिळणार आहे हेही तेवढेच खरं !

## तीन राज्यांत 'कमळ'

शेअर केला गेला. मोदींनी प. बंगालसाठी ६ प्रमुख हमी जाहीर केल्या. ज्यात सुधारित पायाभूत सुविधांवर भर दिला आणि ममता बॅनर्जीनी केंद्र सरकारला विरोध करू न राज्याच्या विकासात अडथळा आणल्याचा आरोप केला होता. ममता बॅनर्जी यांनी सत्ता टिकवण्यासाठी विविध आरोप केले; पण ते अयशस्वी ठरले. २०२४ मध्ये आर. जी. कार बलात्कार आणि हत्या प्रकरणामुळे महिलांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. राज्यभरात प्रचंड आंदोलने झाली. प. बंगाल एसएससी भरतीच्या मुद्यावरू नही हजारो लोक रस्त्यावर उतरले होते. ममता सरकारने सुरू केलेल्या कन्याश्री आणि लक्ष्मी भंडार यासारख्या कल्याणकारी योजना त्यांच्या मर्यादामुळे टीकेच्या भोव-यात सापडल्या. यंदाच्या निवडणुकीत ९१ टक्क्यांहून अधिक असे प्रचंड मतदान झाले होते. मतदानाचा टक्का वाढला की ते सहसा सत्ताधा-यांच्या विरोधात जात असते तसेच ते समर्थनार्थही जाउ शकते; परंतु या वेळी पहिली शक्यताच खरी ठरली. या निवडणुकीत सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला शंभरीही गाठता आली नाही.

त्यांना ९० जागांच्या आसपास समाधान मानावे लागले. प. बंगालमध्ये १५ वर्षे सत्तेवर असलेल्या तृणमूल काँग्रेसची सत्ता भाजपने उलथून टाकल्यामुळे भाजपच्या ताब्यात आणखी एक राज्य आले आहे. यामुळे देशातील भाजपशासित राज्यांची संख्या वाढली आहे. प. बंगालमधील विजयानंतर आता देशातील २२ राज्यांमध्ये भाजप किंवा भाजपचे आघाडीचे सरकार असेल. हे भाजपसाठी खूप मोठे यश मानले जात आहे. यंदाच्या निवडणुकीत केरळ आणि तामिळनाडू वगळता भाजपला भरघोस यश मिळाले आहे. प. बंगालमधील चंचूप्रवेश भाजपच्या दृष्टीने सफल झाला आहे. यंदाच्या निवडणुकीतील दुसरा धक्कादायक निकाल म्हणजे तामिळनाडूत मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक पक्षाला बसलेला धक्का. अभिनेता विजय थलपतीच्या टीव्हीके पक्षाने सत्ताधा-यांना जोरदार धक्का देताना १०८ जागांवर बाजी मारली. सत्ताधारी द्रमुक-काँग्रेस पक्षाला ७३ जागांवर समाधान मानावे लागले. दीड-दोन वर्षापूर्वी स्थापन झालेला टीव्हीके पक्ष अशी कमाल करू शकेल, असे कोणालाच वाटले नव्हते. मतदानोत्तर चाचण्यांमध्ये टीव्हीके पक्षाला ९८ ते १२० जागा मिळतील, असा अंदाज वर्तवण्यात आला होता त्यावर टीकाही झाली होती. पडद्यावरचा हिरो राजकारणात काय करणार? असा प्रश्न केला जात होता;

परंतु आता हाती आलेल्या निकालांनी टीकाकारांची तोंडे बंद केली आहेत. तामिळनाडूच्या जनतेने अनेक दशकापासून द्रविडी राजकारणातील दोन मोठ्या शक्तींना पाहिले आहे मात्र या वेळी जनतेने प्रस्थापित राजकारणाला छेद देत एका नव्या नेतृत्वावर वि[illegible]ास दाखवला आहे. विजय यांच्या या झंझावाताने केवळ स्टॅलिन यांनाच धक्का दिला नाही तर भाजप आणि अण्णा द्रमुकसारख्या पक्षांनाही विचार करायला भाग पाडले आहे. केरळम राज्याने मात्र काँग्रेसला दिलासा दिला आहे. केरळमध्ये काँग्रेसने आपला १० वर्षाचा दुष्काळ संपवला असून मोठ्या झोकात कमबॅक केले आहे. केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील युडीएफने १०० हून अधिक जागांवर विजय मिळवला आहे. काँग्रेसच्या या विजयामुळे डाव्यांच्या शेवटच्या बालेकिल्ल्याला भगदाड पडले. देशातील कोणत्याही राज्यात आता डाव्यांची सत्ता नाही. सुमारे ४९ वर्षानंतर डाव्यांवर ही नामुष्की ओढवली आहे. केरळच्या जनतेने या वेळी सुमारे ७९ टक्के मतदान केले होते. मतमोजणीच्या सुरु वातीच्या टप्प्यात मुख्यमंत्री पी. विजयन पिछाडीवर होते. अखेर ते जवळपास १९ हजार मतांनी निवडून आले. केरळमध्ये भाजपला फक्त ३ जागा मिळाल्या. आसाममध्ये मुख्यमंत्री हिमंत बिस्वा यांनी भाजपला यश देण्यात मोठा वाटा उचलला. भाजपला १०२ जागांवर घवघवीत यश मिळाले. काँग्रेसला १९ जागांवर समाधाना मानावे लागले. आसाममध्ये सलग तिस-यांदा भाजपने हॅट्ट्रिक साधली आहे. काँग्रेससाठी धक्कादायक बाब म्हणजे काँग्रेस नेते गौरव गोगोई यांचा झालेला पराभव. गौरव हे काँग्रेसचे महत्त्वाचे नेते मानले जातात. पुद्दुचेरी विधानसभा निवडणुकीतही भाजपने बाजी मारली. भाजपला २२ तर काँग्रेसला ६ जागा मिळाल्या. भारतीय शेअर बाजारासाठी विधानसभा निवडणुकांचे निकाल फलदायी ठरले. शेअर बाजारात प्रचंड तेजी दिसून आली. बाजाराच्या सुरु वातीला सेन्सेक्स ५०० अंकांनी वधारला. निफ्टीमध्येही जोरदार तेजी दिसून आली. प. बंगाल, आसाम आणि पुद्दुचेरीमध्ये भाजपची पकड मजबूत होत असल्याचे पाहून शेअर बाजारात ट्रेंड बदलत गेले. आजच बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीचे निकालही जाहीर करण्यात आले. बारामती मतदारसंघात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार सुमारे २ लाख १८ हजार मतांनी विजयी झाल्या. राहुरी मतदारसंघाची जागा भाजपने जिंकली. येथे भाजपचे अक्षय कर्डिले विजयी झाले.

## गंगोत्री ते गंगासागर

गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.पंतप्रधान मोदी पुढे म्हणतात, केरळ आणि बंगालमधील भाजप कार्यकर्त्यांनी प्रचंड दडपशाही आणि अत्याचारांचा सामना केला आहे. आज बंगालमधील भाजपच्या यशाचे श्रेय मी अशा सर्व कार्यकर्त्यांना आणि त्यांच्या कुटुंबियांना देतो. हा विजय मी बंगालच्या जनतेला समर्पित करतो. डा. श्यामाप्रसाद यांच्या आत्म्याला आता शांती लाभली. बंगालच्या जनतेने आम्हा भाजप कार्यकर्त्यांना, त्यांचे स्वप्नातील बंगाल साकार करण्याची संधी दिली आहे. आजपासून बंगालच्या नशिबात एका नव्या अध्यायाची भर पडली आहे. जरी ४ मेची संध्याकाळ आता मावळत असली, तरी बंगालच्या या पवित्र भूमीवर एका नव्या पहाटेचा उदय झाला आहे. गंगोत्रीपासून गंगासागरपर्यंत कमळच कमळ फुलले आहे. गंगा किना-यावरील बहुतांश राज्यांत आता भाजप-एनडीएची सत्ता आहे, असे सांगत त्यांनी पक्षाच्या विस्ताराचा उल्लेख केला. लोकशाहीबाबत बोलताना मोदी म्हणाले की, जिंकणे आणि हारणे हे निवडणुकीचा स्वाभाविक भाग आहे. मात्र या निवडणुकांमधून भारत लोकशाहीची जननी का आहे, हे पुन्हा जगासमोर आले आहे. लोकशाही ही केवळ व्यवस्था नसून ती आपल्या संस्कारांमध्ये रु जलेली आहे. कार्यकर्त्यांच्या चेह-यावर दिसणारा आनंद हा त्यांच्या दीर्घ साधनेचा परिणाम असल्याचे सांगत त्यांनी एक भारत, श्रेष्ठ भारत या संकल्पनेवर जनतेचा वाढता विश्वास अधोरेखित केला.

## केरळात 10 वर्षांनंतर

यश मिळवले आहे. पाच राज्यांच्या निवडणुकीत मिळालेल्या या यशामुळे भाजपची देशभरातील ताकद आणखी वाढली आहे. त्यामुळे आगामी काळात भाजप आणखी आक्रमक राजकारणाचे धोरण अवलंबू शकते. या निकालातून आता विरोधक काय धडा घेणार आणि यापुढे कशाप्रकारची रणनीती आखणार, हे पाहावे लागेल.

पश्चिम बंगालमध्ये हिंसा उसळली

पश्चिम बंगालमध्ये सत्तापालट होतानाचे दिसताच तसेच मतमोजणी सुरु असतानाच प. बंगालमधील आसनसोलमध्ये मोठा राडा झाला असून सुरक्षा दलांनी हा राडा शमविण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. या राड्यात टीएमसी आणि भाजपचे कार्यकर्ते एकमेकांत भिडल्याचे सांगण्यात आले.

## पंतप्रधान मोदींचा 'बंगाली लूक'

मंचावर दिसली PM मोदींची खास झलक

भाजप मुख्यालयात जल्लोषाचे वातावरण असताना पंतप्रधान मोदींसोबत भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितिन नबीन, गृहमंत्री अमित शाह, जेपी नड्डा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. यावेळी जेव्हा नितिन नबीन पंतप्रधानांना पुष्पहार घालण्यासाठी पुढे आले, तेव्हा मोदींनी तो हार स्वीकारला नाही, तर तो स्वतःच्या हाताने नितिन नबीन यांनाच घातला. या कृतीतून त्यांनी सर्वांची मने जिंकली.

'आजचा दिवस उज्ज्वल भविष्याची उद्घोषणा'; पंतप्रधान मोदींचे भाष्य

कार्यकर्त्यांना संबोधित करताना पंतप्रधान मोदी अत्यंत भावूक आणि उत्साही दिसत होते. 'आजचा हा दिवस ऐतिहासिक आणि अभूतपूर्व आहे. जेव्हा अनेक वर्षांची साधना सिद्धीमध्ये बदलते, तेव्हा जो आनंद चेह-यावर असतो, तो आज मी देशभरातील भाजप कार्यकर्त्यांच्या चेह-यावर पाहत आहे. हा विजय म्हणजे भारताच्या महान लोकशाहीवरील विश्वासाचा विजय आहे,' असं पतप्रधान मोदी म्हणाले.

बंगालमध्ये भाजपची मुसंडी

भाजपने पश्चिम बंगालमध्ये पहिल्यांदाच सरकार स्थापनेकडे पाउल टाकले आहे. ताज्या आकडेवारीनुसार, भाजपने ७७ जागांवर विजय मिळवला असून तब्बल १२७ जागांवर आघाडी घेतली आहे. एकूण २०४ जागांवर भाजपची पकड मजबूत असून, ११८ हा बहुमताच्या आकडा पार केला आहे.

## TMC चे कार्यालय पेटवले

पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. एका राजकीय पक्षाच्या कार्यालयाची तोडफोड करण्यात आली आहे. या तोडफोडीस जबाबदार असलेल्या लोकांची ओळख पटवली जात आहे, असे त्यांनी म्हटल्याचे वृत्त एएनआय या वृत्तसंस्थेने दिले आहे.विशेष म्हणजे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने संवेदनशील ठिकाणी केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या मोठ्या संख्येने तुकड्या तैनात केल्या आहेत. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरही CAPF च्या सुमारे ७०० तुकड्या पश्चिम बंगालभर तैनात राहतील. अत्यंत चुरशीने लढल्या गेलेल्या या निवडणुकीत भाजपाच्या बाजूने निर्णायक कल दिसून येत असतानाच, ही हिंसाचाराची घटना घडली आहे. या निवडणुकीत भाजपाने १९७ जागांवर आघाडी घेतली असून, तृणमूल काँग्रेस मात्र दुहेरी अंकांवरच अडकल्याचे पाहायला मिळत आहे. जर हा कल कायम राहिला, तर पश्चिम बंगालमध्ये भाजपा पहिल्यांदाच सरकार स्थापन करेल. यामुळे तृणमूल काँग्रेसच्या एका दशकाहून अधिक काळाच्या सत्तेचा अंत होईल आणि राज्यात एका मोठ्या राजकीय बदलाची नांदी ठरेल. विशेष म्हणजे, २०११ पूर्वी या राज्याने ३४ वर्षे डाव्या पक्षांची सत्ताही अनुभवली होती.

## विद्यार्थ्याचे अपहरण करून लुटणारे

दानियाल मध्यस्थी करण्यासाठी आला तर आरोपींनी त्याला जबरीने कार मध्ये बसवले आणि जमीन कॉलनी कडे घेऊन गेले. वजाहद तेथून पळाला. आरोपींनी दानियालला मारहाण केली शिवीगाळ करत त्याला एका ओसाड जागेवर घेऊन गेले. जिथे त्यांनी त्याला मारहाण करून त्याच्याजवळून ६ हजार रुपये हिसकावून घेतले. दानियालने पैसे मागितले तर आरोपींनी त्याला अजून मारले आणि अल अजीज हॉल जवळ आणून त्याला सोडून दिले.दानियालने त्याचे मित्र वजाहद त्याचवेळी ओळखीचे समीर काजी, भाई अवेज काजी तिथे पोहोचले. त्यांनी नागपुरी गेट ठाण्यात जाऊन आरोपीविरुद्ध तक्रार दाखल केली आणि दानियालला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. पोलिसांनी आरोपींना विरुद्ध गुन्हा दाखल करून आरोपी शेख शाहिद शेख रशीद, सुफियान खान नाजिम खान व एफाज शेख इस्माईल या तिघांना ताब्यात घेतले. तर शेख सलमान फरार आहे. त्याचा शोध घेतला जात आहे.

## पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक

झालमुरी सह मिठाई वाटली. यावेळी भाजपा शहराध्यक्ष नितीन धांडे, महिला मोर्चा अध्यक्ष सुधा तिवारी, युवा मोर्चा अध्यक्ष विक्की शर्मा, प्रदेश प्रवक्ता शिवराय कुलकर्णी, कामेश साहू, नगरसेवक मिलिंद बांबल, राजेश गोफणे, संजय नरवणे, राजु कुरील, प्रणित सोनी, सचिन रासने, बंडू हिवसे, ओमप्रकाश पुंशी, बादल कुलकर्णी, रविराज देशमुख, सुरेखा लुंगारे, सुनील खराटे, कौशिक अग्रवालसह भाजपा पदाधिकारी कार्यकर्ता उपस्थित होते.

## माथेफिरूचा महिला परिचारिकेवर

मुन्नू पुजूर याला ताब्यात घेतले. विचारपूसमध्ये त्याने स्वतःला मानसिक रोगी असल्याची माहिती दिली आहे. त्याच्या कडून चौकशी केली जात आहे. त्याने हा हल्ला का केला याचा तपास पोलीस करत आहे.

## पिंपळखुटा येथे तरुणीची

माहिती मोर्शी पोलिसांना देण्यात आली. लगेच मोर्शी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतक तरुणीचे प्रेत शवविच्छेदनाकरिता उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे रवाना केले. आज दि.२ मे रोजी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली आकस्मिक मृत्यूची नोंद करून पुढील तपास आरंभीला आहे.

## लक्ष्मी सॉ मिलमध्ये अग्नी

घटना स्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले पण तोपर्यंत येथे ठेवलेले लाकूड आणि मशिनरी जळून ३० ते ४० लाखांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज संचालकांनी व्यक्त केला आहे. शॉर्ट सर्किट मुळे आग लागल्याचे म्हटले जात आहे. गर्मीमुळे शहरात गेल्या काही दिवसापासून आग लागण्याच्या घटना वाढल्या आहे. तीन दिवसांपूर्वी जवाहर गेट परिसरातील सुप्रसिद्ध किराणा आणि जडीबुटीच्या दुकानात आग लागून लाखोंचे नुकसान झाले होते. त्यानंतर ही एक मोठी घटना शहरात सोमवारी समोर आली.

## ट्रकच्या धडकेत ऑटो चालकाचा

त्यांना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारा दरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी त्यांचा मुलगा इसरार आली अहमद अली (वय ३३) याच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी ट्रक चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा शोध सुरू आहे.

## वीट भट्टी कामगारांचे जिल्हाधिकारी

आहे. वीट भट्टीवर पाणी , प्रकाश, निवास, शौचालय, सावली, अभ्यासासाठी योग्य वातावरण नसते. त्यामुळे विद्यार्थी शिक्षणाबाह्य होत आहे. त्यांच्यावर यामुळे अन्याय होत आहे. वीट भट्टीवर तरुण मुली, विद्यार्थी, स्तनदा माता, गर्भवती महिला व अगदी छोटी मुली असतात. या सगळ्यांना मुळीच सुट्टी नसल्यामुळे आरोग्यसेवा येथे शक्य होत नाही. यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता दिसून येत आहे. या लोकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या मागण्यासाठी आंदोलन करण्यात आले.

## ‚दोन मुली झाल्याः म्हणून छळ

लागत होता. या छळामागील मुख्य कारण म्हणजे तिला दोन मुली झाल्या होत्या. मृतकाच्या कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, सासरच्यांकडून वारंवार धमक्या दिल्या जात होत्या. मृतकाचा भाऊ व फिर्यादी शेख वसीम मोहम्मद मोसीन यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, आरोपी पतीने त्याला 'तुझ्या बहिणीला इथून घेऊन जा, नाहीतर तिला मारून टाकीन,' अशी धमकी दिली होती. सततचा छळ, धमक्या आणि सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या अत्याचारामुळे त्रस्त झालेल्या साजेदा आफरीन यांनी अखेर गळफास घेऊन जीवन संपवले. या प्रकरणी अचलपूर पोलिसांनी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## गोदावरी अर्बनला 'महाराष्ट्र उद्योग

पाटील यांनी आनंद व्यक्त केला आहे. त्यांनी व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर आणि समस्त संचालक मंडळाचे विशेष अभिनंदन केले. या पुरस्कार वितरण सोहळ्याला नाशिक शाखेचे व्यवस्थापक आशिष तायडे यांची देखील प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या या यशामुळे सहकार क्षेत्रात सर्वत्र कौतुक होत असून, आधुनिक तंत्रज्ञान आणि पारदर्शक व्यवहारांमुळे गोदावरी अर्बनने राष्ट्रीय स्तरावर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

## कर्जात अडकलेल्या तरुण

रुपयांचे कर्ज घेतले होते. याशिवाय, नातेवाईक आणि खासगी सावकारांकडूनही कर्ज घेतल्याने आर्थिक ओझे प्रचंड वाढले होते. गेल्या काही हंगामांमध्ये निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. अपेक्षित उत्पन्न न मिळाल्याने मयूर आर्थिक अडचणीत सापडला. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची शासकीय भरपाई वेळेवर न मिळाल्याने त्याच्या अडचणी आणखी वाढल्या. कर्जदारांचा सततचा तगादा आणि स्वतःच्या लग्नासाठी लागणारा खर्च कसा भागवायचा, या चिंतेत मयूर गेल्या काही दिवसांपासून होता. या मानसिक तणावातूनच त्याने हे टोकाचे पाऊल उचलल्याची चर्चा गावात होत आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

एक प्रतिष्ठित सवय

■ मंगळवार, ५ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## सौर पॅनल पुरात वाहून ; दहा महिन्यांनतरही मदत नाही

### सावरगावातील दोन अल्पभूधारक शेतकरी अडचणीत; प्रशासनाकडे धाव घेऊनही निष्फळ

■ प्रतिनिधी | खेट्री ■

*पातूर तालुक्यातील अतिदुर्गम सावरगाव परिसरातील दोन अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या शेतातील सौर ऊर्जेचे पॅनल पुराच्या पाण्यात वाहून गेल्यानंतर तब्बल दहा महिने उलटूनही त्यांना कोणतीही मदत मिळाली नसल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. त्यामुळे या शेतकरी कुटुंबांवर अक्षरशः उपासमारीची वेळ ओढवली आहे.*



*'२६ जून २०२५ रोजी आलेल्या पुरात आमच्या शेतातील सौर पॅनल वाहून गेले. आम्ही जिल्हाधिकारी, वीज वितरण विभाग व सौर कंपनीकडे वारंवार तक्रारी केल्या; पण दहा महिने उलटूनही कोणतीही मदत मिळालेली नाही. त्यामुळे आमच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.'*

**सुरेश चुनडे,**
*शेतकरी, सावरगाव*

सावरगाव येथील विश्वमित्र नदीकाठी शेती करणारे सुरेश किसन चुनडे व प्रकाश किसन चुनडे या दोघा भावांनी २०२१ साली सर्वे क्रमांक ६८ मध्ये सौर ऊर्जेचे पॅनल बसवले होते. मात्र, २६ जून २०२५ रोजी आलेल्या पुरामुळे हे पॅनल पूर्णपणे वाहून गेले. या घटनेत सुमारे तीन लाख रुपयांचे नुकसान झाले.

दोघेही शेतकरी अल्पभूधारक असून प्रत्येकी अडीच एकर शेतीवर त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. सौर पॅनलच्या माध्यमातून शेतीला पाणीपुरवठा केला जात होता. मात्र, पॅनल नष्ट झाल्याने पाण्याचा पुरवठा पूर्णपणे बंद झाला असून पीक घेणे अशक्य झाले आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास संबंधित सौर ऊर्जा कंपनीने पॅनल पुन्हा बसवून देणे अपेक्षित असताना, दहा महिने उलटूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत शेतकऱ्यांनी वीज वितरण विभाग, सौर ऊर्जा कंपनी तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे वारंवार पाठपुरावा केला; मात्र अद्यापही दखल घेण्यात आलेली नाही.

या दुर्लक्षामुळे दोन्ही शेतकरी कुटुंब आर्थिक संकटात सापडले असून उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष देऊन नुकसानभरपाई द्यावी व सौर पॅनल त्वरित बसवून द्यावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## भाजपकडून निवडणूक निकालानिमित्त जल्लोष

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय जनता पार्टी (भाजप) वाशिम शहराच्या वतीने आज पाच राज्यांमध्ये पार पडलेल्या निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल, पाँडिचेरी व आसाम येथे मिळालेल्या यशाबद्दल उत्साहात जल्लोष साजरा करण्यात आला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्व नितीन नवीन यांच्या मार्गदर्शनाखाली मिळालेल्या या घवघवीत यशाबद्दल कार्यकर्त्यांनी आनंद व्यक्त केला. शहरात विविध ठिकाणी आतषबाजी, ढोल-ताशांच्या गजरात मिठाईचे वितरण करण्यात आले. यावेळी पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये उत्साह व आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.



पश्चिम बंगाल येथून भारतीय जनता पक्षाची सुरुवात श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केली होती. आज त्या भूमीत पक्षाने भक्कम यश संपादन केल्याने कार्यकर्त्यांमध्ये विशेष आनंदाचे वातावरण निर्माण झाले असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. भाजपच्या सुरुवातीपासूनच पक्षाने देशभरात आपले मजबूत स्थान निर्माण केले असून, या निवडणूक निकालांमुळे पश्चिम बंगालसारख्या राज्यांमध्येही पक्षाची वाढ अधिक स्पष्ट झाल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या जल्लोष कार्यक्रमास मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे, वाशिम नगराध्यक्ष अनिल केंदळे, भाजपा नेते राजू राजे पाटील, भाजप शहराध्यक्ष मनिष मंत्री, तालुकाध्यक्ष एकनाथ कड पाटील यांच्यासह शहरातील नगरसेवक, नगरसेविका तसेच जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील महिला व पुरुष पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्रांतर्गत राज्य निवड चाचणी जाहीर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्रातून आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने खेलो इंडिया राज्य निपुणता केंद्र अंतर्गत राज्यस्तर निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य तसेच शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे बालेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध क्रीडा प्रबोधिनींसाठी ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी क्रीडा प्रबोधिनीमध्ये सरळ प्रवेश व कौशल्य चाचणीद्वारे निवासी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. त्यानुसार विविध क्रीडा प्रकारांसाठी राज्यस्तरीय निवड चाचण्या शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे , पुणे-४५ येथे आयोजित करण्यात आल्या आहेत.

**निवड चाचणीचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :**

मैदानी क्रीडा (थेट राज्यस्तर) : ११ ते १२ मे २०२६

**उपस्थिती :** ११ मे रोजी सकाळी ९.०० वाजता

सायकलिंग (थेट राज्यस्तर) : ११ ते १२ मे २०२६

**उपस्थिती :** ११ मे रोजी सकाळी ९.०० वाजता

**शूटिंग (थेट राज्यस्तर) :** १८ ते १९ मे २०२६

**उपस्थिती :** १८ मे रोजी सकाळी ९.०० वाजता

या निवड प्रक्रियेत वाशिम जिल्ह्यातील राज्य व राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त खेळाडूंनी अनिवार्यपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी केले आहे.

खेळाडूंना अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा, संतुलित आहार व तांत्रिक मार्गदर्शन देऊन त्यांना उच्चस्तरीय स्पर्धांसाठी सक्षम करण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## वाशिम येथे आदिवासींना संविधानाच्या प्रतिचे थाटात वितरण व मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम जिल्ह्यातील आदिवासी समाज बांधवांना भारतीय संविधानाच्या माध्यमातून आपले हक्क व अधिकारांची जाणीव व्हावी तसेच कायद्याचे ज्ञान प्राप्त व्हावे या उद्दात्त हेतुने जेष्ठ समाजसेवक भारत टारपे यांच्या कल्पनेतून, पुस्तक यात्रा ग्रुप महाराष्ट्र यांच्या वतीने, भारतीय संविधानाच्या २०० प्रतीचे वाटप दिनांक २ मे रोजी शनिवारला मान्यवरांच्या हस्ते माऊली मुंगसाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, क्रांतिवीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून नंतर वितरण करण्यात आले आहे.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष नाजुकराव भोंडने जिल्हाध्यक्ष हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून भारत टारपे, सहाय्यक आयुक्त, तुकारामजी भिसे, मुख्य लेखा व वित्तअधिकारी, पुष्पराज वाघमारे, ग्रंथालय विभाग नागपूर, सदाशिव आसोले, विभागीय व्यवस्थापक, लक्ष्मणराव कुरुडे, GIS नांदेड,



ॲड. गजाननराव भरकाडे, आत्माराम धंदरे, मा.जि.प. सदस्य. ओंकार सुरकुटे, मा.जि. प.सदस्य. गायत्री वाघमारे, महिला जिल्हा अध्यक्ष, सिताताई धंदरे, अध्यक्षा वाशिम जिल्हा, हे होते.

नंतर जिल्ह्यातील सर्व उपस्थित आदिवासी महिला पुरुष मंडळींना संविधाना विषयी व त्याची सविस्तर माहिती भारत टारपे, लक्ष्मणराव कुरुडे, सदाशिव आसोले, तुकारामजी भिसे, पुष्पराज वाघमारे, ॲड. गजानन भरकडे, शेवटी कार्यक्रमाचे अध्यक्ष नाजूकरावजी भोंडने, यांनी आदिवासी समाजांनी आता अंधश्रद्धा, बुवाबाजी, व्यसन, पोथी पुराण, न वाचता सविधान वाचावे , सविधान वाचल्याने माणूस प्रखरपणे समाजाच कार्य करतो, असे अनेक उदाहरण यावेळी भोंडणे यांनी दिले.

संविधानाच्या किमान दोन प्रती प्रत्येक आदिवासींच्या बहुल गावामध्ये देण्यात आल्या. कार्यक्रमाला वाशिम जिल्ह्यातील बहुसंख्य आदिवासी समाज उपस्थित होता. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी आ. क. संघटनेने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एम. बी. डाखोरे, यांनी केले. सूत्रसंचालन विजयराव भुरकाडे यांनी केले, तर आभार शिवाजीराव पोटे यांनी मानले.

## मातंग समाजासाठी विकास योजनांवरील कार्यशाळा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मातंग समाज व तत्सम बारा पोटजातीतील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा कार्यालय, वाशिम (मर्या) यांच्या वतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेद्वारे समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देऊन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळा बुधवार, दि. ६ मे २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, वाशिम येथे आयोजित करण्यात आली आहे. या उपक्रमातून मांग व मातंग समाजातील नागरिकांना आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक उन्नतीसाठी उपलब्ध असलेल्या योजनांचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यशाळेस उपस्थित राहून अधिकाधिक नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक दि. शं. पाखमोडे यांनी केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत सेंटबॅक अर्जांवरील कार्यवाहीबाबत सूचना

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षाकरिता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी रितसर अर्ज करूनही विद्यार्थी क्षमतेअभावी प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण सुरू ठेवता यावे, यासाठी ही योजना उपयुक्त ठरत आहे.

या योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेशित विद्यार्थ्यांना, तसेच इयत्ता १० वी, इयत्ता १२ वी व पदवीनंतर विविध स्तरांवरील अभ्यासक्रमांसाठी महाविद्यालये/शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन व इतर शैक्षणिक सुविधा स्वतः उपलब्ध करून घेण्यासाठी आवश्यक आर्थिक सहाय्य देण्यात येते.

ही रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा केली जाते. याबाबत शासन निर्णय दिनांक ०६ जानेवारी २०१७ अन्वये योजना कार्यान्वित आहे.

जिल्हा व तालुका स्तरावरील नगरपरिषद हद्दीतील महाविद्यालयांमध्ये प्रवेशित अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांनी सन २०२५–२६ या शैक्षणिक वर्षासाठी दिनांक ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत अर्ज सादर केले होते. प्राप्त अर्जांची तपासणी करण्यात आली असून, तपासणीत आढळलेल्या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित अर्ज विद्यार्थी लॉगिनवर 'Sent Back' करण्यात आले आहेत.

सदर विद्यार्थ्यांनी प्रसिद्धीपत्रक प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर जाऊन आपल्या अर्जातील त्रुटींची पूर्तता तातडीने करावी. निर्धारित कालावधीत त्रुटींची पूर्तता न झाल्यास संबंधित अर्ज अपात्र करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

## महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

श्री. दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती यांच्या वतीने संचालित तक्षशिला औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था, खेर्डा तसेच तक्षशिला आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र येथे शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिन उत्साहात व अभिमानाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७:३० वाजता करण्यात आली. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच स्मृतिशेष श्री. दादासाहेब गवई यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर संस्थेचे प्राचार्य जगदीश मनवर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर सर्व उपस्थितांनी एकमुखाने भारतीय राष्ट्रगीताचे गायन करून देशभक्तीची भावना व्यक्त केली. याप्रसंगी प्राचार्य मनवर यांनी महाराष्ट्र दिनाचे ऐतिहासिक महत्त्व विशद करताना १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना कशी झाली याचा आढावा घेतला. तसेच महाराष्ट्राच्या प्रगतीत प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत सामाजिक जबाबदाऱ्या ओळखून राज्याच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारीवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर देशभक्तीपर वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले.

## सवड येथील शासकीय निवासी शाळेत प्रवेशप्रक्रिया सुरू

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील सवड येथील अनुसूचित जाती मुलांची शासकीय निवासी शाळेत शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. ही शाळा महाराष्ट्र राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येते.

या निवासी शाळेत इयत्ता ६ वी ते १० वी (सेमी इंग्रजी माध्यम) पर्यंतच्या वर्गासाठी प्रवेश अर्ज मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना मोफत निवास, ग्रंथालयीन सुविधा, सुसज्ज संगणक कक्ष तसेच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

प्रवेशासाठी जागांचे आरक्षण प्रवर्गनिहाय पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विजाभज ५ टक्के, विमाप्र २ टक्के आणि दिव्यांग ३ टक्के. इच्छुक विद्यार्थ्यांनी १५ मे २०२६ पर्यंत प्रवेश अर्ज भरावेत, असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक अतुल भगत यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क क्रमांक ९९२३७०३०५९ असा आहे.

## कामगार दिनी अग्निशमन वीरांचा गौरव

### कारंज्यात उत्साहात सत्कार समारंभ संपन्न

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधत भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा कारंजा (शहर व ग्रामीण) मंडळाच्या वतीने अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांचा भव्य सत्कार समारंभ पार पडला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात आयोजित या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाचे आयोजन आ. सौ. सईताई प्रकाश डहाके व भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष प्रदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. प्रमुख उपस्थितीत उपसभापती प्रकाश लिंगाटे, संचालक दिनेश राठोड, कौस्तुभ डहाके, शहर मंडळ अध्यक्ष अमित संगेवार, कामरगाव मंडळ अध्यक्ष



संजय लाहे यांच्यासह अनेक पदाधिकारी, नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

अग्निशमन दलातील भारत जोंधळे, मीर जाहेद अली जाकीर अली, सचिन बैस, शुभम झोपाटे, इमरान खान आमद खान आणि अनुराग बारबोले या कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह देऊन विशेष गौरव करण्यात आला. त्यांच्या धाडसी व समर्पित सेवेस उपस्थितांनी दाद देत कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभिषेक भेंडे यांनी केले, तर प्रास्ताविक गौरव गांजरे यांनी सादर केले. आभार प्रदर्शन सविज जगताप यांनी केले. कार्यक्रमाला गोपी डेंडुळे, विकास कोळकर, मनीष भेलांडे, राजू पाटील मोरे, रवी राऊत, शुभम ताथोड यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

## आज पासून मोफत बालसंस्कार शिबिराचे आयोजन



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक प्रजापती ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय वाशिम शाखेच्या वतीने पालकांमध्ये संस्कार संस्कृती आत्मविश्वास सकारात्मक विचार मूल्यशिक्षण वृद्धिंगत व्हावे याकरिता मंगळवार ५ मे ते ८ मे सकाळी आठ ते दहा वाजेपर्यंत मोफत बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सदर शिबिरामध्ये पालकांसाठी विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन ही करण्यात आली आहे. मुलांच्या सर्वांगीण विकासाकरिता पालकांनी या शिबिरामध्ये सहभागी करावे असे आव्हान प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने करण्यात आली आहे.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी नामांकित निवासी शाळांचे दरवाजे खुले

### इयत्ता पहिली प्रवेशासाठी १० मे अंतिम मुदत; पात्र विद्यार्थ्यांनी संधीचा लाभ घ्यावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्या वतीने शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठी शहरातील नामांकित इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. वाशिम जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज विनामूल्य उपलब्ध असून, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांच्या कार्यालयात तसेच जवळच्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये अर्ज मिळणार आहेत. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १० मे २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

प्रशासनाने पालकांना कोणत्याही प्रकारच्या भुलथापांना बळी न पडण्याचे आवाहन केले आहे. प्रवेश अर्ज केवळ अधिकृत कार्यालयातून किंवा आश्रमशाळांमधूनच प्राप्त करून घ्यावेत व थेट कार्यालयात सादर करावेत, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

**अटी व शर्ती :** या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असणे आवश्यक आहे. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे बंधनकारक राहील. पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयांपेक्षा कमी असावे, यासाठी तहसीलदारांचे उत्पन्न प्रमाणपत्र आवश्यक आहे. इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय किमान सहा वर्षे पूर्ण असावे.

अर्जासोबत संमतीपत्र, दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे तसेच आधार कार्डची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे. आदिम जमातीतील विद्यार्थी, विधवा, घटस्फोटित, निराधार, परित्यक्ता तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थ्यांना प्राधान्य दिले जाणार असून, संबंधित प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. तसेच विद्यार्थ्यांचे पालक शासकीय अथवा निमशासकीय सेवेत नसावेत, ही अटही लागू आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची शाळा निश्चित झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत बदल करता येणार नाही. अपूर्ण कागदपत्रे अथवा खोटी माहिती आढळल्यास प्रवेश तत्काळ रद्द करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे. अशी माहिती प्रकल्प अधिकारी मोहन कुमार व्यवहारे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी दिली असून, पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५७ ■ मंगळवार ५ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


## शेतकऱ्यांच्या जीवाशी खेळ थांबवा :

# अवैध खतसाठ्यावर भरारी पथकाचा 'हल्लाबोल'

### नियमांना हरताळ फासणाऱ्यांवर कारवाईचा बडगा; ७ लाखांचा संशयित साठा जप्त

**पुलगाव जनमाध्यम :** जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या अवैध खतव्यवसायाचा अखेर पर्दाफाश झाला असून कृषी विभागाच्या भरारी पथकाने रविवारी दुपारी धडक कारवाई करत तब्बल ७ लाख रुपयांचा खतसाठा जप्त केला. नाचणगाव बसस्थानक परिसरात राबविण्यात आलेल्या या कारवाईने बेकायदेशीर साठेबाजांचे धाबे दणाणले आहेत.

माहितीनुसार, एका घरामध्ये कोणतीही अधिकृत परवानगी न घेता मोठ्या प्रमाणावर खत साठवले जात असल्याची गोपनीय माहिती मिळताच पथकाने अचानक छापा टाकला. तपासणीदरम्यान विविध प्रकारचे खत मोठ्या प्रमाणावर आढळून आले. चौकशीत हा साठा 'एनजीपी ॲग्रो केअर, इंझाळा' या कृषी सेवा केंद्राचा असल्याचे स्पष्ट झाले. मात्र, साठवणुकीसाठी आवश्यक परवानगीच घेतलेली नसल्याचे उघड झाल्याने अधिकाऱ्यांनी तत्काळ संपूर्ण साठा जप्त केला.



ही कारवाई जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरिकर आणि कृषी विकास अधिकारी शिवा जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. भरारी पथकाचे प्रमुख संदीप ढोणे यांच्यासह प्रमोद पेटकर, राजेश अंबुलकर, महेश पालवे आणि रितेश करोडे यांनी ही मोहीम यशस्वी केली.

**नियमांची पायमल्ली; विक्रीवर तत्काळ बंदी**

तपासणीदरम्यान खत नियंत्रण आदेश १९८५ च्या नियमांचे उघड उल्लंघन झाल्याचे समोर आले. अनेक पिशव्यांवर आवश्यक माहितीच नव्हती, तर सर्वच पिशव्यांवर एकच बॅच क्रमांक आणि उत्पादन महिन्याची नोंद असल्याचे आढळले. ही गंभीर बाब लक्षात घेत कृषी विभागाने संपूर्ण खतसाठ्याच्या विक्रीवर तात्काळ बंदी घातली आहे. नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून अहवालानंतर संबंधितांवर कठोर कारवाई होणार आहे.

दरम्यान, या कारवाईमुळे शेतकऱ्यांच्या नावावर सुरू असलेल्या गैरव्यवहाराला मोठा धक्का बसला आहे. शेतकऱ्यांच्या घामाचा पैसा लुबाडणाऱ्यांना आता पळता भुई थोडी होईल, असा इशाराच प्रशासनाने दिला आहे.

# भाड्याच्या कारमधून घरफोडी; दोन आरोपी जेरबंद

## ६.२९ लाखांचा मुद्देमाल जप्त



**वर्धा जनमाध्यम :** घरफोडीच्या गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना रामनगर पोलिसांनी चोख कामगिरी बजावत किरायाच्या कारचा वापर करून घरफोडी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. अचूक तपास, सीसीटीव्हीचे बारकाईने विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी दोन आरोपींना अटक करत तब्बल ६ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

रामनगर परिसरातील अग्निहोत्री कॉलेजजवळ राहणाऱ्या हेमलता गजानन वाडकर (वय ४६) या केदारनाथ येथे दर्शनासाठी गेल्या असताना त्यांच्या बंद घरावर चोरट्यांनी डोळा ठेवला. घरात कोणी नसल्याची संधी साधून चोरट्यांनी कुलूप तोडत घरफोडी केली आणि मौल्यवान ऐवज लंपास केला. परतल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येताच वाडकर यांनी तातडीने रामनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून पोलिसांनी गुन्ह्यांची नोंद घेतली. गुन्हा दाखल झाल्यावर पोलिसांनी तपासाला सुरूवात केली. सुरूवातीला पोलिसांनी वाडकर यांच्या घराच्या आवारात असलेल्या सी.सी.टी.व्हीचे चित्रिकरण तपासले. शिवाय गोपनीय माहिती जाणून घेतली. त्यानंतर पोलिसांना एम. एच. ४० सी. एक्स. २७०३ ही कार घटनास्थळावरील परीसरात संशयीत रिता फिरत असल्याची माहिती प्राप्त झाली. पोलिसांनी वाहन मालक व चालकाचा शोध घेतला असता संबंधित वाहन हे प्रसन्न प्रमोद मेश्राम (वय २६) रा. चमेडीया नगर यवतमाळ याच्या ताब्यात असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी सखोल विचारपुससाठी प्रसन्न प्रमोद मेश्राम याला ताब्यात घेतले असता कार किरायाणे घेत साथीदार साहिल उत्तम घरत (वय १९) रा. सुरभीनगर पिपंळगाव रोड यवतमाळ यांचे सोबत संगणमत करून घरफोडी केल्याचे पुढे आले. पोलिसांनी एम. एच. ४० सी. एक्स. २७०३ क्रमांकाची कार, एक मोबाईल, ४ हजार रुपये रोख, चांदीच्या दोन तोरड्या व दोन जोडवे असा एकूण ६ लाख २९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अजय भुसारी, गजानन इवनाथे, योगेश चन्ने, अजहर खान, राहुल भोयर, रूपेश उगेमुगे, सचिन पवार यांनी केली.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना 'भारतरत्न' द्या; खासदार अमर काळे

### पंतप्रधानांना पत्राद्वारे केली मागणी : संसदेत आवाज उठवणार



**वर्धा जनमाध्यम :** वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' प्रदान करण्यात यावा, यासाठी वर्ध्याचे खासदार अमर काळे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांना पत्राद्वारे मागणी केली आहे. राष्ट्रसंतांना भारतरत्न मिळेपर्यंत मी संसदेत सातत्याने आवाज उठवणार, अशी ग्वाही त्यांनी दिली असून, या भूमिकेमुळे जिल्ह्यात चर्चांना उधाण आले आहे.

खासदार काळे यांनी पत्रात नमूद केले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ संत नव्हते, तर स्वातंत्र्यलढ्यात जनमानसाला प्रेरणा देणारे महान समाजप्रबोधक होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात आष्टी व चिमूर येथे उसळलेल्या उठावामागे त्यांच्या विचारांची ठिणगी होती. त्यांच्या कीर्तनातून, संदेशातून सामान्य माणसाच्या मनात स्वातंत्र्याची ज्वाला चेतवली गेली आणि ब्रिटिश सत्तेविरोधात उभे राहण्याचे धैर्य जनतेत निर्माण झाले.

ज्या भूमीवर राष्ट्रसंतांनी वास्तव्य केले, त्या भूमीत आपण राहतो, हेच आपले भाग्य आहे. त्यांच्या विचारांची पूजा केवळ शब्दांत नको, तर कृतीतून व्हायला हवी, असे सांगत त्यांनी राष्ट्रसंतांच्या कार्याचा गौरव केला.

राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' मिळणे हा केवळ एका व्यक्तीचा सन्मान नसून, देशभक्तीच्या महान परंपरेचा गौरव असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. केंद्र सरकारने या मागणीची दखल घ्यावी, यासाठी संसदेत सातत्याने पाठपुरावा करणार, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

दरम्यान, खासदारांच्या या आक्रमक भूमिकेमुळे वर्धा जिल्ह्यात राष्ट्रसंतांविषयी नव्याने अभिमानाची लाट उसळली असून, 'भारतरत्न'च्या मागणीला जनसमर्थन वाढत असल्याचे चित्र आहे.

# वादळी वाऱ्याने सोलर प्रकल्पाचे नुकसान

### शेतकऱ्याला २.७० लाखांचा फटका



**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील जोगापूर येथील शेतकरी शत्रुघ्न हजारे यांच्या शेतातील सोलर प्रकल्पाला अचानक आलेल्या वादळी वाऱ्याचा फटका बसून मोठे नुकसान झाले. या घटनेत अंदाजे २ लाख ७० हजार रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती मिळाली आहे.

जोगापूर येथील शेत सर्वे क्रमांक ४९/४ मध्ये हजारे यांनी शेतीसाठी सोलर प्रकल्प उभारला होता. मात्र, अचानक आलेल्या जोरदार वाऱ्यामुळे एव्हीएल कंपनीचे सोलर पॅनल उडून गेले. काही पॅनल तुटल्याने संपूर्ण प्रकल्प बाधित झाला आहे.

या घटनेमुळे शेतकऱ्याला आर्थिक फटका बसला असून, शेतीसाठी आवश्यक असलेला वीजपुरवठा विस्कळीत झाला आहे. परिसरात इतर ठिकाणीही किरकोळ नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे.

दरम्यान, या प्रकरणी संबंधित यंत्रणांनी पंचनामा करून नुकसानभरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच सोलर प्रकल्प उभारताना सुरक्षिततेच्या उपाययोजनांची तपासणी करावी, अशी मागणीही पुढे येत आहे.

# प्रेमाच्या नकाराचा सूड; रस्त्यात अडवून निर्घृण हत्या : दोघांना जन्मठेप

**वर्धा जनमाध्यम :** एका तरुणीने लग्नास नकार दिल्याचा राग मनात धरून दोन आरोपींनी थेट रस्त्यात अडवणूक करत तिच्यावर आणि भावावर जीवघेणा हल्ला चढविल्याची थरारक घटना अखेर न्यायालयाने कठोर शिक्षेद्वारे ठोठावली. या प्रकरणात हिंगणघाट न्यायालयाने दोन्ही आरोपींना जन्मठेप व दंडाची शिक्षा सुनावून समाजात स्पष्ट संदेश दिला आहे.

हिंगणघाट येथील रहिवासी असलेल्या फिर्यादी तरुणीची ओळख आरोपी कपील नंदकिशोर आखाडे याच्याशी झाली होती. मात्र आरोपी तिचा सतत पाठलाग करून प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. त्रास असह्य झाल्याने तरुणीच्या कुटुंबाने सेवाग्राम येथे स्थलांतर केले व सेवाग्राम पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली होती.

११ जुलै २०२२ रोजी तरुणी परीक्षा देण्यासाठी समुद्रपूर येथे भावासोबत गेली होती. परतीच्या वाटेवर शेडगाव फाट्याजवळ आरोपी कपील आखाडे व त्याचा साथीदार वैभव भोजराज लाजूरकर यांनी त्यांची अडवणूक केली. लग्न का करत नाहीस असा जाब विचारत आरोपींनी लोखंडी रॉडने तरुणीवर हल्ला केला. बहिणीला वाचवण्यासाठी धावलेल्या भाऊ ओमवरही निर्दयीपणे वार करण्यात आले.

या भीषण हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले. सेवाग्राम रुग्णालयात उपचारादरम्यान ओमचा मृत्यू झाला, तर तरुणी गंभीर अवस्थेतून बचावली. या घटनेनंतर समुद्रपूर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून उपनिरीक्षक अपेक्षा मेश्राम यांनी तपास पूर्ण करत सबळ पुरावे न्यायालयात सादर केले.

पैरवी अधिकारी निशा तीनघसे यांनी १८ साक्षीदार उभे केले, तर सरकारी वकील दीपक वैद्य यांनी प्रभावी युक्तिवाद मांडला. अखेर जिल्हा न्यायाधीश तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश वर्षा पारगांवकर यांनी दोन्ही आरोपींना दोषी ठरवत जन्मठेप व १५ हजार रुपयांचा दंड ठोठावला.

# अवैध रेती वाहतुकीवर पोलिसांचा अंकुश

### नाकाबंदीत ट्रॅक्टर ट्रॉली जप्त; ६.६० लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** परिसरात सुरू असलेल्या अवैध रेती वाहतुकीवर सिंदी रेल्वे पोलिसांनी कारवाई करत ट्रॅक्टर ट्रॉलीसह लाखोंचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे रविवारी (ता. ३) कांढळी ते सिंदी (रेल्वे) मार्गावरील टी-पॉईंट येथे नाकाबंदी करण्यात आली. यावेळी संशयित लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉली थांबवून तपासणी केली असता वाहनातून काळ्या रेतीची विनापरवाना वाहतूक होत असल्याचे आढळून आले. चालकाकडे रेती वाहतुकीचा कोणताही वैध परवाना नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली.



या प्रकरणी चालक अमोल गोविंदराव डोमकावळे (रा. कांढळी) व महादेव वांदीले (रा. कानकाटी) यांच्याविरुद्ध सिंदी रेल्वे पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६२/२०२६ नोंदविण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाईदरम्यान सुमारे ६ लाख रुपये किमतीचा ट्रॅक्टर ट्रॉली व ६ हजार रुपये किमतीची रेती असा एकूण ६.६० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस निरीक्षक नरेंद्र निस्वादे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ओम कालेगुरवर, तसेच पोलीस कर्मचारी प्रफुल्ल डफ, नितीन नखाते, सचिन उईके, अमोल कोडापे यांच्या पथकाने केली.

# रेल्वेत सापडला एकटा चिमुकला; 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते'तून सुरक्षित बचाव

**वर्धा जनमाध्यम :** सजग प्रवाशांच्या सतर्कतेमुळे आणि रेल्वे सुरक्षा बलाच्या (इइ) तत्पर कारवाईमुळे एका अल्पवयीन बालकाचा 'ऑपरेशन नन्हे फरिश्ते' अंतर्गत सुरक्षित बचाव करण्यात आला. बालकाला पुढील काळजीसाठी चाईल्ड हेल्पलाईनकडे सुपूर्द करण्यात आले असून, त्याच्या पालकांचा शोध सुरू आहे.

नागपूरकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनंतर संबंधित यंत्रणा तात्काळ सक्रिय झाली. गाडी क्रमांक २०८५७ च्या एस-६ डब्यातील बर्थ क्रमांक ०८ वर सुमारे आठ वर्षांचा मुलगा एकटाच प्रवास करत असल्याचे काही प्रवाशांच्या लक्षात आले. बालक एकटा असल्याचे पाहून त्यांनी त्वरित रेल्वे प्रशासनाला माहिती दिली.

माहिती मिळताच रेल्वे सुरक्षा बलाचे एएसआय राजू मुटकुरे आणि कर्मचारी कल्पना जाधव यांनी वर्धा रेल्वे स्थानक गाठले. फलाट क्रमांक २ वर गाडीची तपासणी करण्यात आली. माहिती देणारा प्रवासी वर्धा स्थानकापूर्वी उतरल्याचे स्पष्ट झाले; मात्र इतर सहप्रवाशांकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित बालकाची ओळख पटविण्यात आली.

बालकाला सुरक्षित ताब्यात घेऊन इइ ठाण्यात आणण्यात आले. प्राथमिक चौकशीत त्या मुलाने दुर्ग स्थानकावरून एकटाच रेल्वेत चढल्याचे सांगितले. त्यानंतर तत्काळ चाईल्ड हेल्पलाईनशी संपर्क साधण्यात आला.

हेल्पलाईनचे प्रतिनिधी सूरज वानखेडे आणि संतोष दोने यांनी वर्धा स्थानक गाठून बालकाचा ताबा घेतला.

बालकाची वैद्यकीय तपासणी करण्यासाठी त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. पुढील कायदेशीर प्रक्रियेनुसार त्याला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्यात आले असून, त्याच्या पालकांचा शोध घेण्याचे काम सुरू आहे.

दरम्यान, या घटनेमुळे रेल्वे प्रवासादरम्यान अल्पवयीन मुलांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रेल्वे सुरक्षा बल आणि लोहमार्ग पोलीस यांच्यात अधिक प्रभावी समन्वयाची आवश्यकता असल्याचे जाणकारांचे मत आहे. तसेच, प्रवाशांनीही अशा घटनांकडे दुर्लक्ष न करता तत्काळ प्रशासनाला माहिती देणे आवश्यक असल्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या कारवाईत रेल्वे सुरक्षा बलाने दाखविलेली सतर्कता आणि जबाबदारीची जाणीव कौतुकास्पद ठरत आहे.

# बसस्थानक की छळछावणी? प्रवाशांचा संताप टोकाला

### प्रवाशांना वाऱ्यावर सोडले; सुविधांचा बोजवारा, प्रशासन गाढ झोपेत, सावली-पाणी-शौचालय गायब

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील बसस्थानकाच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असताना प्रवाशांच्या मूलभूत सोयींचा पूर्णतः बोजवारा उडाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. सावली, पिण्याचे पाणी आणि शौचालय यांसारख्या अत्यावश्यक सुविधांचा अभाव असल्याने प्रवाशांना अक्षरशः हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

उन्हाळ्याच्या कडाक्यात, लग्नसराईचा हंगाम आणि शाळांच्या सुट्ट्यांमुळे प्रवाशांची मोठी वर्दळ आहे. मात्र बसण्यासाठी जागा नाही, तात्पुरते शेड अपुरे आणि असुविधाजनक असल्याने महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांचे विशेष हाल होत आहेत. येणाऱ्या पावसाळ्यात ही



परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या गंभीर प्रश्नावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने आक्रमक भूमिका घेत, माजी राज्यमंत्री तथा माजी आमदार अशोक शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आगार व्यवस्थापकांना निवेदन दिले. उपजिल्हाप्रमुख सतीश धोबे व तालुकाप्रमुख मनीष देवडे यांची यावेळी उपस्थिती होती. प्रशस्त तात्पुरते शेड, स्वच्छ पिण्याचे पाणी, सुरक्षित शौचालय व बसण्यासाठी पुरेशी बाके उपलब्ध करून देण्याच्या ठोस मागण्या करण्यात आल्या. तसेच, एसटी विभागीय नियंत्रकांशी संपर्क साधून तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली. अन्यथा रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला.

दरम्यान, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा निषेध नोंदवला. प्रवाशांच्या सहनशक्तीची परीक्षा घेणाऱ्या या कारभारावर प्रशासन कधी जागे होणार, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

# दीड वर्षानंतर दुचाकी चोरीचा उलगडा; अट्टल गुन्हेगार अटकेत



वर्धा जनमाध्यम : शहरातील दुचाकी चोरीच्या प्रकरणाचा दीड वर्षानंतर उलगडा करण्यात वर्धा शहर पोलिसांना यश आले आहे. या कारवाईत अट्टल गुन्हेगाराला अटक करून चोरीला गेलेली ॲक्टीव्हा दुचाकी जप्त करण्यात आली आहे.भिमनगर येथील रहिवासी राजेश महादेवराव घोडे (५४) यांनी २२ नोव्हेंबर २०२४ रोजी त्यांच्या घराच्या अंगणात ॲक्टीव्हा (क्र. रुप ३२ ऊ ४३३३) उभी केली होती. रात्रीच्या वेळी अज्ञात चोरट्याने ही सुमारे ४५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली. याप्रकरणी वर्धा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान पोलीस हवालदार प्रशांत वंजारी यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी यवतमाळ येथे कारवाई करत शुभम धोंगडे याच्याकडून संबंधित दुचाकी जप्त केली. चौकशीत धोंगडेने ही गाडी सतीश उर्फ शेंबड्या उर्फ मुंगश्या बाबाराव मडावी (रा. राळेगाव, जि. यवतमाळ) याच्याकडून २५ हजार रुपयांत खरेदी केल्याचे सांगितले.पुढील तपासात मडावी हा सध्या यवतमाळ जिल्हा कारागृहात एमपीडीए अंतर्गत बंदिस्त असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्यावर वर्धा जिल्ह्यात चोरी व घरफोडीचे ८, तर यवतमाळ जिल्ह्यात ४० हून अधिक गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. आवश्यक परवानगीनंतर त्याला ताब्यात घेऊन अटक करण्यात आली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# निवडणूक निकालांचे मोमेंटसः चेन्नईत विजयच्या कुटुंबीयांचा डान्स, बंगालमध्ये भाजपने झालमुडी वाटून जल्लोष केला

**नवी दिल्ली/ तिरुवनंतपुरम/ गुवाहाटी/कोलकाता/चेन्नई/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पुद्दुचेरीमध्ये विधानसभा निवडणुकीची मतमोजणी सुरू आहे. बंगालमध्ये भाजपच्या आघाडीमुळे जल्लोष सुरू आहे. कोलकाता येथील टीएमसी कार्यालयात शांतता पसरलेली दिसली. तामिळनाडूमध्ये मोठ्या उलथापालथीदरम्यान टीव्हीके प्रमुख विजय यांच्या घरी जल्लोषाचे वातावरण आहे. तर, डीएमके कार्यालयातून तंबू हटवण्यात आले.राज्यांमध्ये निवडणूक प्रचारादरम्यानही अनेक असे क्षण दिसले, जे चर्चेत राहिले. पंतप्रधान मोदींनी बंगालमध्ये झालमुडी खाल्ली, तर राहुल गांधी केरळमध्ये सायकलवरून फिरले. ममतांनी भाजी खरेदी केली.



### बंगाल भाजप कार्यालयात मासे आणि भाताची मेजवानी

कोलकाता येथील बंगाल भाजप कार्यालयात पक्षकार्यकर्त्यांना मासे आणि भात वाढण्यात आले. एका कार्यकर्त्याने असे निरीक्षण नोंदवले की, भाजप सत्तेवर आल्यास मांसाहारावर बंदी घालेल, असा दावा करून टीएमसी (TMC) यापूर्वी खोटा प्रचार करत असे.



### कोलकाता येथील भाजप कार्यालयात झालमुडी वाटण्यात आली

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील भाजप कार्यालयात कार्यकर्त्यांनी झालमुडी वाटून जल्लोष केला. कलांमध्ये भाजपने बहुमताचा आकडा पार केला आहे. बंगालमध्ये पहिल्यांदाच भाजपचे सरकार स्थापन होणार आहे.




### कोलकाता येथील टीएमसी कार्यालयात शांतता

मतमोजणीदरम्यान कोलकाता येथील टीएमसी कार्यालयाबाहेर शांतता पसरलेली दिसली. कोणतीही लगबग दिसली नाही. तर भाजप कार्यालयात सकाळपासूनच जल्लोषाचे वातावरण होते. केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, खासदार संजय जयस्वाल यांच्यासह अनेक नेते पोहोचले.



### विजयच्या कुटुंबीयांनी नृत्य केले, शिट्ट्या वाजवल्या

तामिळनाडूच्या चेन्नईमध्ये TVK पक्षाचे प्रमुख विजय यांच्या घरी त्यांचे कुटुंब जल्लोष करत आहे. कुटुंबातील सदस्यांनी नृत्य केले आणि शिट्ट्या वाजवल्या. TVK चे निवडणूक चिन्ह शिट्टी आहे. पहिल्यांदा निवडणूक लढवणारी TVK सध्या २३४ पैकी १०४ जागांवर आघाडीवर आहे.



### TVK समर्थकाने गुडघ्यांवर चालून आनंद व्यक्त केला

TVK च्या प्रभावी कामगिरीच्या पार्श्वभूमीवर, या प्रसंगाचा आनंद साजरा करण्यासाठी 'ग्लोरी' नावाची एक समर्थक चेन्नईतील 'ईस्ट कोस्ट रोड'पासून TVK च्या मुख्यालयापर्यंतचा संपूर्ण रस्ता गुडघ्यांवर रांगत गेली. या दोन्ही ठिकाणांमधील अंतर अंदाजे २ ते ३ किलोमीटर इतके आहे.



### दिल्ली भाजप मुख्यालयात जिलेबी बनवली

दिल्लीतील भाजप मुख्यालयात मतमोजणी सुरू होताच जल्लोषाची तयारी दिसू लागली. येथे कार्यकर्त्यांनी जिलेबी बनवायला सुरुवात केली. पक्षाने आसाममध्ये बहुमताचा आकडा पार केला आहे आणि पश्चिम बंगालमध्ये आघाडी कायम ठेवली आहे.

### दिल्लीत बँड-बाजासह भाजपचा जल्लोष

दिल्लीतील भाजप मुख्यालयात वेगवेगळ्या पद्धतीने जल्लोष साजरा केला जात आहे. बँड-बाजाची टीम पोहोचली आहे. संध्याकाळी ७ वाजता पंतप्रधान मोदी येथे पोहोचतील. पक्ष कार्यकर्त्यांना संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जमा होण्यास सांगितले आहे.






### मनोज तिवारींनी रसगुल्ला थीमचा केक कापला

बंगालमध्ये भाजपने बहुमताचा आकडा पार केल्यानंतर, पक्षाचे खासदार मनोज तिवारी यांनी दिल्लीतील आपल्या निवासस्थानी जल्लोष केला. 'रसगुल्ला' संकल्पनेवर आधारित एक विशेष केक कापून त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.



### बंगालमध्ये TMC नेत्यावर हल्ला, शर्ट फाडला

पश्चिम बंगालच्या कूचबिहार जिल्ह्यातील दिनहाटा टाऊन ब्लाकचे टीएमसी (TMC) अध्यक्ष बिशू धर यांच्यावर, मतमोजणी केंद्रातून बाहेर पडत असताना हल्ला करण्यात आला. हा हल्ला भाजपचे कार्यकर्ते आणि समर्थकांनी केल्याचा आरोप करण्यात येत आहे. हल्लेखोरांनी त्यांचे कपडेही फाडले.



### DMK कार्यालयातून तंबू हटवले

चेन्नईतील DMK पक्षाच्या मुख्यालयात, अण्णा अरिवलयम येथे, टेंट हटवण्यात आले, कारण ट्रेंडमध्ये पक्ष तिस-या स्थानावर घसरताना दिसत आहे. सुरुवातीच्या ट्रेंडमध्ये TVK पहिल्या क्रमांकावर आणि AIADMK दुस-या क्रमांकाचा पक्ष बनला आहे.



### केरळमध्ये आघाडी घेतल्याबद्दल काँग्रेसचा जल्लोष

दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात जल्लोष सुरू झाला आहे. केरळमध्ये सुरुवातीच्या कलांमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील UDF आघाडीने आघाडी घेतली आहे. UDF ने दुपारी १२ वाजेपर्यंत आकडेवारीत बहुमत पार केले आहे.

## राहुरी पोटनिवडणुकीत अक्षय कर्डिले विजयी

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची मतमोजणी आज पार पडली. यात अक्षय कर्डिले यांनी शानदार विजय मिळवला आहे. भाजपचे आमदार शिवाजी कर्डिले यांच्या निधनानंतर ही जागा रिक्त झाली होती. त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले यांनी विजय मिळवला आहे. अक्षय कर्डिले यांचा सामना शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या गोविंद मोकाटे यांच्याशी झाला होता. या निवडणुकीत अक्षय कर्डिले यांनी १ लाखापेक्षा जास्त मतांनी विजय मिळवला.

राहुरी पोटनिवडणुकीत मिळालेल्या विजयानंतर अक्षय कर्डिले यांच्या कार्यकर्यांनी मोठा जल्लोष केला. त्यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांनी खांद्यावर उचलून घेत आनंद साजरा केला. या विजयानंतर बोलताना कर्डिले यांनी, आज माझे वडील असते तर खूप आनंद झाला असता. मला ज्यांनी ज्यांनी मदत केली मी त्यांना कधी विसरू शकत



नाही. यत्या काळात सर्वांना मदत करणार अशी भावना व्यक्त केली.

**सुरुवातीपासून आघाडी-**राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या मतमोजणीत अक्षय कर्डिले यांनी सुरुवातीपासूनच आघाडी घेतली होती. प्रत्येक फेरीनंतर त्यांची आघाडी वाढत गेली. अखेर त्यांनी एक लाखापेक्षा जास्त मतांनी विजय मिळवला आहे. ही पोटनिवडणूक जाहीर झाल्यापासून अक्षय कर्डिले यांच्या नावाची चर्चा होती. या निवडणुकीत ते विजय मिळवतील असा अंदाज एक्झिट पोलमध्येही वर्तवण्यात आला होता.

**जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला : कर्डिले**

राहुरी-नगर मतदारसंघातील जनतेने माझ्यावर जो विश्वास टाकला आहे, तो माझ्यासाठी मोठी जबाबदारी आहे. भारतीय जनता पार्टीच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळं माझा विजय झाला आहे. माझ्या वडिलांनी केलेल्या विकासकामांची परंपरा पुढे नेत उर्वरित कामांसाठी मी दुप्पट वेगाने झटणार आहे. हा फक्त विजय नाही, तर जनतेच्या अपेक्षांची सुरुवात आहे.

## केजरीवालांचा प्रचार ठरला 'अपशकुन'?

### ममता बॅनर्जी आणि स्टॅलिन यांच्या हातून सत्ता निसटली

**नवी दिल्ली / कोलकाता / चेन्नईः** देशातील ५ राज्यांच्या विधानसभा निवडणुकांचे निकाल आज जाहीर होत असून, यामध्ये राजकीय वर्तुळाला सर्वात मोठा धक्का बसला आहे. पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी आणि तामिळनाडूमध्ये एम. के. स्टॅलिन या दोन्ही दिग्गज नेत्यांना सत्ता गमवावी लागली आहे. विशेष म्हणजे, आम आदमी पार्टीचे निमंत्रक अरविंद केजरीवाल यांनी या दोन्ही ठिकाणी जोरदार प्रचार केला होता, परंतु त्याचा फायदा होण्याऐवजी दोन्ही राज्यांत सत्तांतर झाले आहे. पश्चिम बंगालमध्ये गेल्या १० वर्षांपासून सत्तेत असलेल्या ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला मोठा फटका बसला आहे. ताज्या कलानुसार, भाजपने १९० हून अधिक जागांवर आघाडी घेत बहुमताचा आकडा पार केला आहे. अरविंद केजरीवाल यांनी ममतांच्या



समर्थनासाठी बंगालमध्ये सभा घेतल्या होत्या आणि लोकशाही वाचवण्याचे आवाहन केले होते. मात्र, मतदारांनी परिवर्तनाला कौल दिल्याचे स्पष्ट दिसत आहे. तामिळनाडूमध्येही चित्र वेगळे नाही. एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके सरकारला सत्ता राखण्यात अपयश आले आहे. येथे अभिनेता विजयच्या टीव्हीकेपक्षाने अनपेक्षित मुसंडी मारत राजकीय गणिते बदलली आहेत. अरविंद केजरीवाल यांनी एप्रिलमध्ये चेन्नईत जाउन स्टॅलिन यांच्यासाठी प्रचार केला होता, पण तामिळनाडूच्या जनतेने द्रविडी राजकारणात नवीन चेह-याला पसंती दिली आहे. केजरीवाल यांनी ज्या ज्या ठिकाणी जाउन प्रचार केला, तिथे सत्ताधारी पक्षाला पराभवाचा सामना करावा लागल्याने आता सोशल मीडियावर आणि राजकीय वर्तुळात केजरीवालांचा प्रचार म्हणजे सत्तेला घरघर अशी चर्चा रंगली आहे. या निकालांमुळे देशाच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता असून, विरोधी पक्षांच्या इंडिया आघाडीसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

## बारामतीत सुनेत्रा पवार विजयी

# देशात सर्वाधिक मताधिक्याचा रचला इतिहास

**पुणे/प्रतिनिधी :**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीच्या निकालाचे चित्र आता स्पष्ट झाले असून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) उमेदवार आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विजयाकडे मोठी झेप घेतली आहे. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विक्रमी कामगिरी करत माजी आमदार अजित पवार यांच्या २०१९ मधील मताधिक्याचे सर्व रेकार्ड मोडीत नवा रेकार्ड बनवला आहे. २४ च्या फेरीअखेर मिळालेल्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांचा विक्रमी विजय झाला आहे.

सुनेत्रा पवार २ लाख १८ हजार ९३० इतक्या विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्या आहेत. देशात सगळ्यात जास्त मताने निवडून येण्याचा विक्रम सुनेत्रा पवारांच्या नावाने आज झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, जय पवार आणि पार्थ पवार यांनी सुनेत्रा पवारांना विक्रमी मतांनी निवडणून देण्याचं आवाहन केलं होतं, त्याचबरोबर सर्व पक्षांनी आणि संघटनांनी देखील सुनेत्रा पवारांना पाठिंबा दिला होता, तर दुसरीकडे सुनेत्रा पवारांच्या विरोधात उभ्या राहिलेल्या एकाही उमेदवाराला हजारापेक्षा जास्त मते देखील पडली नसल्याचं दिसून येत आहे.



करूणा मुंडे यांना १२५ मते मिळाली आहेत, तर अभिजित बिचुकले यांना १२१ मते मिळाली आहेत.

**अजित दादांचा विक्रम मोडला-** बारामती पोट निवडणुकीतील सर्व मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर सुनेत्रा पवारांना मिळालेले हे मताधिक्य आतापर्यंत देशातील सर्वाधिक मताधिक्य असल्याचा दावा करण्यात आला आहे. या आधी उत्तर प्रदेशमधील सुनील कुमार शर्मा हे २०२२ साली २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्याने विजयी झाले होते. सुनेत्रा पवारांनी त्यांचा विक्रम मोडला आहे, असं सांगितलं जात आहेत.

**आज आनंदाचा दिवस :पार्थ पवार**

सुनेत्रा पवारांना मिळालेल्या विजयानंतर पार्थ पवार यांनी माध्यमांशी संवाद साधला, यावेळी बोलताना पार्थ पवार म्हणाले की, आज रेकार्ड मताने निवडून आलो त्यांचे आभार. निवडणुकीला सामोरे जावे लागेल असे वाटले नव्हते. आम्हाला कुणालाही वाटत नाही आज आनंदाचा दिवस आहे. कुणीही जल्लोष करू नये. २०२९ ची तयारी नाही. मी इथे लोकांसाठी असेल, जनता दरबार घेईल. आचारसंहिता संपल्यावर मी जनता दरबार घेईल, अशी माहिती देखील पार्थ पवारांनी दिली आहे.

**बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार : सुनेत्रा पवारांची प्रतिक्रिया**

बारामतीकरांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित आहे, असं सुनेत्रा अजित पवार यांनी म्हटलं आहे. तर बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानतानाच हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची..! असं म्हणत सुनेत्रा अजित पवार यांनी बारामतीकरांना विकासाचा विश्वास दिला आहे. आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांनी एक्स वर ट्वीट करत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.



### निकाल अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित

बारामती पोटनिवडणुकीची मतमोजणी सुरू असताना सुनेत्रा पवारांनी सोशल मीडियावर पोस्ट केली. त्यांची ही पोस्ट व्हायरल होत आहे. या पोस्टमध्ये त्यांनी असे लिहिले की, आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते. आजचा हा निकाल जाहीर होत असताना आदरणीय दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत.'

तसंच, 'दादांवर जीवापाड प्रेम करणा-या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया. दादांच्या स्वप्नातील बारामती घडवण्याची संधी मला दिल्याबद्दल मी सर्व बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार मानते. हा शेवट नाही, ही तर फक्त सुरुवात आहे. निर्धाराची, संघर्षाची आणि नव्या बारामतीची!', असे सुनेत्रा पवार यांनी कार्यकर्त्यांना आवाहन केले आहे. त्यामुळे बारामतीमध्ये सुनेत्रा पवार यांच्या विजयानंतर जल्लोष केला नाही.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## हिंस्त्र विकृती

**म**हाराष्ट्र दिनाचा आनंदसोहळा साजरा होऊन काही तास उलटले असतानच पुणे जिल्ह्याच्या परिसरात लागोपाठ घडलेल्या बलात्कार आणि खुनाच्या नृशंस घटनांनी संपूर्ण समाजाला अस्वस्थतेच्या गर्तेत ढकलले. नसरापूरमधील साडेतीन वर्षांच्या चिमुरडीवर ६५ वर्षांच्या नराधमाने केलेले अत्याचार आणि त्यानंतर तिचा झालेला निर्घृण खून ही घटना वासनांधतेची उच्चांकी पातळी दर्शवणारी आहे. या घटनेने फुटलेले अश्रूंचे बांध आणि आक्रोश थांबतो न थांबतो तोच चाकणमध्ये निष्पाप बालकावर अनैसर्गिक अत्याचार करून त्याची हत्या झाल्याची घटना समोर आली. इंद्रियांची भूक अनावर झालेले नराधम जेव्हा मोकाट सुटतात तेव्हा त्यांच्या हव्यासाच्या मगरमिठीतून चिमुरड्या, तरुणी, गर्भवती, आया, आज्जी अशा कुणाचीही सुटका होत नाही. अडीच-तीन वर्षांची चिमुरडी पाहून आपल्या लेकराची आठवण येऊन डोळे पाणावणारे बाप या समाजाने पाहिले आहेत. मित्र-नातेवाईकांच्या मुलींचा सांभाळ करून, त्यांना शिकवून मोठे करणारे दिलदार या समाजात आहेत. हक्काचे कुणी नाही म्हणून रोज छोट्या मुलांना खाऊ देणारे आजोबा इथे आहेत. या सकारात्मक भवतालावर विश्वास ठेवून माणूस जगत असतो; पण वाढत चाललेल्या विकृतींनी या विश्वासाचा चिखल केला आहे. कुणाही संवेदनशील माणसाचे यामुळे रक्त खवळणे स्वाभाविकच. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपी सराईत गुन्हेगार होता आणि त्याच्यावर यापूर्वीही बलात्काराचे दोन गुन्हे दाखल होते. यातील एका प्रकरणात स्वतःच्या भावाच्या मुलीबाबत त्याने असे कृत्य केल्याचा आरोप आहे.कायद्यातील पळवाटांचा लाभ मिळून अशा प्रवृत्ती समाजात मोकळ्या फिरत असतील, तर बलात्काराचे गुन्हे थांबणार कसे? महिलांसाठी सुरक्षित समाजनिर्मितीचे स्वप्न पूर्ण होणार कसे? एनसीआरबीच्या अहवालावर नजर टाकल्यास दिसते की, गेल्या दशकात दरवर्षी सरासरी १ लाख ४० हजारांहून अधिक बालके कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या गुन्ह्याला बळी पडत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, 'पोक्सो' कायद्यांतर्गत नोंदवल्या जाणाऱ्या गुन्ह्यांमध्ये ९० टक्क्यांहून अधिक प्रकरणांत आरोपी हे परिचयाचे किंवा शेजारी असतात. चाकणच्या घटनेत शेजारीच राहणाऱ्या मुलाने परिसरात खेळत असलेल्या तीन वर्षांच्या निष्पाप मुलाला फसवून खोलीत नेले आणि त्या चिमुकल्यावर अत्यंत अमानुष पद्धतीने लैंगिक अत्याचार केला.गुन्हा लपवण्यासाठी मुलाचा गळा चिरून खून केला आणि मृतदेह बॅगेत भरून तो फरार झाला. मध्यंतरी नाशिकच्या इगतपुरीतील शासकीय वसतिगृहात दहावीच्या मुलांनी लहान मुलांवर गुंगीचे औषध देऊन अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला. ही सर्व परिस्थिती भीषण आणि चिंताजनक आहे. सामाजिक सुरक्षितता आणि भयमुक्त वातावरणनिर्मिती हे कोणाही शासन यंत्रणेचे प्रथम कर्तव्य आहे. विकासाचे आलेख कितीही उंचावत असतील आणि जीडीपी, इज ऑफ डुईंग बिझनेसमधील क्रमवारी कितीही सुधारत असली, तरी समाजात महिलांना, मुलींना सुरक्षित संचार करता येणार नसेल, तर त्या सर्वांवर पाणी फेरल्यासारखे होईल. पुण्यातील घटना समाजातील ढासळत्या नैतिकतेचे आणि अधःपतनाचे लक्षण आहे.कायद्याचे भय संपुष्टात आले की, अशा विकृतींना रान मोकळे मिळते. नसरापूर प्रकरणातील आरोपीला पूर्वीच्या आरोपांखाली वेळीच शिक्षा झाली असती, तर आज त्या चिमुकलीचा जीव वाचू शकला असता. 'शंभर दोषी सुटले तरी चालतील; पण एका निर्दोषाला शिक्षा होता कामा नये' हे आपल्या न्यायप्रणालीचे आधारतत्त्व आहे. आदर्श तत्त्व म्हणून ते आदरणीयच आहे; पण गुन्हे करूनही आपण जामिनासारख्या तरतुदींचा आधार घेऊन नियमित जीवन सुरळीत जगू शकतो, पुन्हा गुन्हाही करू शकतो हा समज समाजात दृढ होत गेल्यास गुन्हेगारी प्रवृत्ती कमी होणार कशी? बलात्काराच्या गुन्ह्यातील दोषींना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी नसरापूर प्रकरणानंतर करण्यात आली; पण प्रत्यक्ष फासावर लटकवण्यात आलेल्यांची संख्या किती आहे? कोर्टात केस उभी राहून निकाल लागेपर्यंत किती वर्षे निघून जातात? अनेक प्रकरणांत पीडिता बलात्कारोत्तर आयुष्य जगण्यास मानसिकदृष्ट्या असमर्थ ठरून तिचा मृत्यू होतो; पण तरीही आरोपनिश्चिती झालेली नसते. त्यामुळेच हैदराबादमधील डॉक्टर महिलेला अत्याचार करून मारून टाकणाऱ्या नराधमांचा एन्काऊंटर झाला तेव्हा समाजाने पेढे वाटून आनंदोत्सव साजरा केला. महाराष्ट्रात बदलापूरमधील शाळेतील दोन मुलींवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या अक्षय शिंदेचा पोलिस एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाला तेव्हाही नागरिकांनी समाधान व्यक्त केले. कायद्याचे राज्य या संकल्पनेनुसार ही स्थिती निश्चितच चिंताजनक ठरणारी आहे; पण त्यातील सारांश आणि संदेश महत्त्वाचा आहे. वाढत चाललेल्या विकृतांना आणि पाशवी नराधमांना रोखायचे असेल, तर कायद्याचा धाक निर्माण करावाच लागेल. नसरापूरमधील घटनेनंतर संतप्त नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग रोखून धरला. आरोपीच्या अटकेनंतर सर्वसामान्य नागरिकांना वेठीस धरावे का, असा सवाल कुणीही विचारू शकेल; पण मूळ घटनेने निर्माण झालेला संताप व्यक्त करता न येण्यामुळे माणसे हतबल होतात आणि त्यातून उद्रेक घडतो.आज समाजमनाचा कानोसा घेतल्यास बलात्कार आणि खून करणाऱ्या गुन्हेगारांना गर्दीच्या हवाली करा असा सार्वत्रिक सूर दिसतो. हे व्यवस्थेचे अपयश आहे. ज्या राजगड पोलिस ठाण्यात नसरापूरच्या गुन्ह्याची नोंद झाली त्या दुर्गराजाची उभारणी करणाऱ्या शिवछत्रपतींच्या स्वराज्यातील कायदे व्यवस्थेचा आदर्श आपल्यापुढे आहे. तसा धाक निर्माण करण्यात यश येत नसेल, तर निश्चितच काही तरी चुकते आहे. आज माहिती-तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया, इंटरनेटमुळे विकृत लैंगिक भावना चाळवणाऱ्या साधनांचा सुळसुळाट झाला आहे. स्मार्ट फोनवर अश्लील व्हिडीओ पाहणाऱ्यांची संख्या वाढली आहे. त्यांनाही आपण कायद्याने रोखू शकलेलो नाही. अशाने बलात्कारमुक्त समाज कसा निर्माण होणार? यासाठी वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर आमूलाग्र बदल करणे आवश्यक आहे. मुलांना गुड-बॅड टचचे ज्ञान लहानपणीच द्यावे लागेल. अनेकदा राग, आक्रमकता आणि वर्चस्व म्हणजे पुरुषत्व, असा समज खोलवर रुजलेल्यांची 'टॉक्सिक मॅस्क्युलिनिटी' बलात्कारासारख्या गुन्ह्यांना खतपाणी घालते. हे लक्षात घेता समाजात मानसिक आरोग्याबद्दल उघडपणे बोलले गेले पाहिजे, जेणेकरून अशा हिंसक प्रवृत्तींना सुरुवातीलाच आळा घालता येईल.

# मोसमी वाऱ्यांवर शेतीचे हेलकावे

**यंदा सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडण्याचा अंदाज आहे. भारताची अर्थव्यवस्था आजही मोसमी वाऱ्यांवर, म्हणजे मान्सूनवर अवलंबून आहे. या वाऱ्यांवर भारताची शेती हेलकावे घेत असते.**

**स**न २०२६मध्ये सरासरीच्या सुमारे ९२ टक्के पाऊस पडेल, अशी शक्यता भारतीय हवामान विभागाने नुकतीच वर्तवली. 'एल निनो'मुळे जागतिक तापमान वाढून भारतातील मान्सूनवर विपरीत परिणाम होण्याचे संकेत असून यंदा पाणीटंचाईचाही इशारा देण्यात आला आहे. जगभरातील युद्धाच्या सावटाबरोबरच आता दुष्काळाचे भयही अर्थव्यवस्थेला भेडसावत आहे. मात्र, सामान्यांच्या मनात प्रश्न असा आहे, की आजच्या एआय युगात, भारतीय अर्थव्यवस्था जगातील पहिल्या पाच-सहा राष्ट्रांत गणली जात असतानाही, संपूर्ण अर्थव्यवस्था मोसमी वाऱ्यांवर, म्हणजे मान्सूनवर अवलंबून का?



### आजही शेतीप्रधान अर्थव्यवस्था

एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीक्षेत्राचा वाटा इतर क्षेत्रांच्या तुलनेत कमी असणे, हे प्रगत अर्थव्यवस्थेचे एक लक्षण मानले जाते. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये शेतीक्षेत्राचा वाटा १९८०पर्यंत सरासरी ४० टक्क्यांहून अधिक होता; तो कमी होऊन २०२६ मध्ये फक्त १८ टक्क्यांवर आला आहे, कारण तुलनेने इतर क्षेत्रांतील उत्पन्न वाढले आहे. मग भारत आजही शेतीप्रधान देश आहे का? टक्केवारीच्या स्वरूपात शेतीक्षेत्राचा राष्ट्रीय उत्पन्नातील सहभाग कमी असला तरी शेती हाच भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालानुसार आजही शेतीक्षेत्र ४६.१ टक्के लोकांना रोजगार पुरवत आहे. म्हणजेच जवळपास निम्मी लोकसंख्या आजही पोटापाण्यासाठी शेतीवरच अवलंबून आहे! त्यामुळेच दुष्काळासारख्या अस्मानी संकटामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या कुटुंबांना हाताला काम आणि पोटाला भाकरी मिळणे बंद झाले की, त्याचे पडसाद संपूर्ण अर्थव्यवस्थेवर उमटतात ही वस्तुस्थिती आजही कायम आहे.

### शेतीप्रेरित अर्थव्यवस्था

शेतीक्षेत्राचे इतर क्षेत्रांशी असलेले दुवे इतके घट्ट आहेत, की उर्वरित क्षेत्रांना शेतीपासून तोडता येत नाही. खते, बियाणे, ट्रॅक्टर, वीज, गोदामे यांसाठी शेतकरी पुरवठादारांशी जोडलेले असतात; तर शेतीमालाच्या विक्रीसाठी त्यांना बाजारपेठांच्या पुरवठा-साखळीत सहभागी व्हावे लागते. या दोन्ही साखळ्या सुरळीत असतील, तरच शेतमालाची मूल्यवृद्धी होते, योग्य भाव मिळतो आणि अपव्यय कमी होतो. म्हणूनच शेतापासून किरकोळ विक्रीपर्यंतच्या पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित करणे, शेतकरी उत्पादक कंपन्या (एफपीसी) आणि डिजिटल बाजारपेठांना प्रोत्साहन देणे या गोष्टी महत्त्वाच्या ठरत आहेत. फेब्रुवारी २०२५ पर्यंत 'प्रधानमंत्री किसान संपदा' या योजनेअंतर्गत ४१ मेगा फूड पार्क, ३९४ कोल्ड चेन प्रकल्प आणि ६१ पुरवठा-साखळी प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे आणि त्यामुळे शेतीव्यवसायाला चालना मिळेल अशी अपेक्षा आहे.

म्हणजेच शेतीतील प्रत्यक्ष ४६ टक्के रोजगाराबरोबरच पुरवठा साखळीतील प्रक्रिया उद्योग, वितरण, कमिशन एजंट, किरकोळ विक्रेते आणि असंख्य लघू-मध्यम-सूक्ष्म उद्योगही शेतीवरच अवलंबून आहेत. भाजीपाला, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, कापड, साखर अशा हजारो शेतीनिगडित उद्योगांमुळे औद्योगिक क्षेत्रही शेतीशी जोडले गेले आहे. प्रक्रिया केलेले अन्न, डबाबंद फळांचे रस, फळे आणि फुलशेती हे परंपरागत व आधुनिक व्यवसाय शेतीक्षेत्रातून निर्यातीला चालना देतात. त्यामुळे शेतीक्षेत्राचा देशाच्या उत्पन्नामधील प्रत्यक्ष वाटा १८ टक्के असला, तरी अर्थव्यवस्थेशी असलेल्या सर्वदूर दुव्यांमुळे शेतीवरील संकट हे अन्नधान्य पुरवठा, रोजगारनिर्मिती, उद्योग-सेवा क्षेत्र आणि निर्यात या सगळ्यांवर परिणाम करते.

### शेतीक्षेत्र आणि आर्थिक धोरण

वर उल्लेख केल्याप्रमाणे भारतीय शेतीक्षेत्राच्या अर्थव्यवस्थेशी असलेल्या सर्वदूर दुव्यांमुळे महागाई दर, व्याजदर एवढेच नव्हे, तर शेअर बाजार निर्देशांकदेखील मान्सून अंदाजानुसार कमी-जास्त होत असतो. महागाईचा दर मोजताना अन्नधान्य हा ग्राहकाच्या दैनंदिन खर्चातील सर्वांत मोठा असा तब्बल ३६ टक्के घटक मानला जातो. त्यामुळेच कमी मान्सूनच्या अंदाजानुसार महागाई दर वाढू शकतो. नुकत्याच जाहीर झालेल्या रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक धोरणात व्याजदरात बदल करण्यात आलेला नाही; कारण रिझर्व्ह बँकेच्या अहवालाप्रमाणे यंदा 'एल निनो'मुळे अन्नधान्याच्या किमतींमध्ये अनिश्चितता निर्माण होईल आणि पुरवठा कमी असल्यामुळे आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी महागाईचा दर अंदाजे ४.६ टक्के राहील. युद्धजन्य आणि दुष्काळजन्य अनिश्चिततेत भर पडू नये म्हणून व्याजदराचे धोरण 'जैसे थे' ठेवण्यात आले आहे.

पाण्याची उपलब्धता हा पीकवाढीचा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. पावसाच्या कमतरतेमुळे केवळ खरीप हंगामावरच नव्हे, तर सिंचन व्यवस्थेतील पाणीसाठ्यावर आणि त्यायोगे रबी हंगामातील पिकांच्या वाढीलाही फटका बसतो. परिणामी अन्नसुरक्षेचा आणि भाववाढीचा धोका निर्माण होतो. हंगामात उशिरा दाखल होणारा पाऊस आणि महिन्यागणिक बदलणारे पावसाचे प्रमाण हेदेखील शेतकऱ्यांसमोरील सततचे आव्हान आहे. बी-बियाणे, मजुरी, कीटकनाशके, खते यांवरील खर्च भरून काढून आर्थिक गणित कसे जुळवायचे ही विवंचना शेतकरी कुटुंबाला सतावत असते; आणि या कोंडीतून सुटण्यासाठी कर्जबाजारीपणाचे ओझे उचलणे क्रमप्राप्त ठरते. दुष्काळी परिस्थितीत जनावरांच्या पाण्याचा आणि चाऱ्याचाही गंभीर प्रश्न निर्माण होतो. पावसाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्याला व शेतमजुराला काम मिळेनासे होते आणि पुरेसे उत्पन्न मिळवण्यासाठी अनेक कुटुंबांना स्थलांतर करण्याशिवाय पर्याय उरत नाही. थोडक्यात, ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णतः विस्कळीत होऊन जाते. त्यामुळे वारंवार येणाऱ्या दुष्काळी परिस्थितीचे आपत्ती नियोजन आणि त्यासाठीची आर्थिक तरतूद हा विकास धोरणाचा मोठा भागच बनून राहतो.

### आव्हाने आणि उपाय

स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात अन्नधान्याची टंचाई असलेला आपला देश आज अन्नधान्य व इतर कृषी मालाचे अतिरिक्त उत्पादन करून जागतिक व्यापारात सहभागी होत आहे. शेतीक्षेत्राची जसजशी प्रगती झाली, तसतसा सिंचन क्षेत्राचाही विकास झाला. तरीही आज सिंचनाची टक्केवारी एकूण पीकक्षेत्राच्या ५५ टक्क्यांवर जाऊ शकलेली नाही. गहू आणि ऊस यांसारखी ९५ टक्क्यांहून अधिक सिंचनाखालील ठराविक पिके वगळता, बहुतेक पिकांचे सिंचनाखालील सरासरी क्षेत्र बरेच कमी आहे. त्यामुळेच बेभरवशाच्या आणि लहरी मान्सूनवर आपली शेती मोठ्या प्रमाणात अवलंबून राहते. उत्तरेतील काही राज्यांचा अपवाद वगळता गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र आणि दक्षिणेकडील राज्यांतील शेती मोठ्या प्रमाणात पावसावरच अवलंबून आहे.

महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांचा आवर्षणग्रस्त भागात समावेश होतो; म्हणजेच येथे वारंवार दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते. राज्यात देशातील सर्वाधिक ३,८००हून अधिक सिंचन प्रकल्प आहेत. तरीही राज्य शासनाच्या २०२०-२१च्या सिंचन स्थितीदर्शक अहवालानुसार जून २०२० अखेर सिंचनक्षमतेचो लागवडीलायक जमिनीशी असलेले प्रमाण केवळ २५ टक्के होते. जिल्हानिहाय आकडेवारीनुसार राज्यातील ३६पैकी जवळपास अर्ध्या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण २५ टक्क्यांहून कमी आहे. यात प्रामुख्याने विदर्भातील अकोला, वाशिम, यवतमाळ तसेच मराठवाड्यातील हिंगोली आणि संभाजीनगर या जिल्ह्यांचा समावेश होतो.गेल्या काही वर्षांतील शेतकरी आत्महत्यांचे प्रमाणही याच जिल्ह्यांमध्ये अधिक आहे. कापूस, सोयाबीन ही या भागातील महत्वाची पिके. तक्ता-१ मधील आकडेवारीनुसार ऊस वगळता कापूस, सोयाबीन आणि इतर खरीप पिकांखालील सिंचन क्षेत्र अतिशय कमी आहे; पाण्याची कमतरता हेच या पिकांच्या तुलनेने कमी उत्पादकतेचे प्रमुख कारण मानले जाते.

महाराष्ट्रातील प्रमुख पिकांखालील सिंचन क्षेत्र

| क्र. | पीक | पिकाखालील सिंचन क्षेत्र (%) २०२३-२४ |
|---|---|---|
| १ | सोयाबीन | २१ |
| २ | कापूस | २९ |
| ३ | तूर | १४ |
| ४ | ज्वारी | २४ |
| ५ | ऊस | ९८ |

दुष्काळामुळे लोकांच्या खाण्यापिण्याच्या सवयी सुद्धा नकळत बदलतात. मध्यंतरी देशात डाळींचे उत्पादन घटल्याने डाळींच्या किमती आकाशाला भिडल्या. परिणामी प्रथिनांच्या कमतरतेचा प्रश्न निर्माण झाला. किमतींच्या ओझ्याखाली पारंपरिक पूर्णाहार थाळी बदलू लागते आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांची निकृष्ट पोषणमूल्य असलेली उत्पादने बाजारात प्रचलित होतात. उदाहरणार्थ, मॅगी मसाला नूडल्सच्या ७० ग्रॅमच्या पाकिटाची किंमत १० ते १५ रुपये, तर १०० ग्रॅम तूरडाळीची किंमत १२ ते १८ रुपये असते; म्हणजेच दर्जेदार डाळीपेक्षा मॅगी अनेकदा स्वस्त पडते. अशा प्रकारे अपुरे सिंचन आणि पीक उत्पादन यामुळे आरोग्य विषयक व आर्थिक अशा सर्व स्तरांवर समस्या निर्माण होऊ शकतात. याच पार्श्वभूमीवर सरकारने अन्नसुरक्षा धोरणाबरोबरच भारतीय पोषण सुरक्षा मोहीमही सुरू केली आहे.

### धोरणे राबवताना...

अनेक राज्यांत विभागलेल्या आपल्या देशाच्या विविध भागांत शेतीच्या विकासाचे टप्पे आणि विकास दर यांत मोठी तफावत आहे. त्यामुळे विशेषतः केंद्रीय योजना प्रत्येक राज्यात आणि गावात एकसारख्या पद्धतीने राबविली गेली, तरी परिणामकारक ठरेलच असे नाही. प्रादेशिक अथवा स्थानिक शेतीप्रश्नांच्या अनुषंगाने धोरणे आखणे आणि त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते. तसेच केंद्र, राज्य शासन आणि जिल्हा परिषदेच्या योजना आणि त्यांच्या अंमलबजावणी संस्थांची सांगड घालूनच काम पुढे नेणे गरजेचे ठरते.

### बिगर-कृषी क्षेत्रातही...

केंद्रीय कृषी मंत्रालयाच्या दुष्काळ व्यवस्थापन विभागाने २०२४मध्ये आपत्ती निवारणाचा आराखडा मांडला आहे. आपत्तीला तोंड देण्यास सज्ज राहणे, पूर्वइशारा व्यवस्था तयार ठेवणे आणि प्रत्यक्ष उपाययोजनांद्वारे आपत्तीशी सामना करणे असे त्याचे टप्पे आहेत. या आराखड्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्णत्वाला नेणे, जलसंधारण कार्यक्रम राबवणे, पीकविम्याची योग्य अंमलबजावणी, जनावरांसाठी चारा पीक उत्पादनाची व चारा छावण्यांची सोय, पीकपद्धतीत विविधता आणण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि जिल्हानिहाय आराखडे अशा गोष्टींचा समावेश असायला हवा. दुसरीकडे, शहरी आणि बिगर-कृषी भागात पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी औद्योगिक व घरगुती पाणीवापराचे ऑडिट आणि त्यानुसार दंड अथवा प्रोत्साहनात्मक कर सवलती यांसारखे उपायही राबवणे शक्य आहे.

### बिगर-शेतीत रोजगारनिर्मिती

शेतीक्षेत्रात जरी ४६ टक्के लोकसंख्या कार्यरत दिसत असली, तरी त्या लोकसंख्येची उत्पादकता अतिशय कमीआहे. शेतीशिवाय इतर उपजीविकेच्या संधी अधिक वेगाने निर्माण केल्यास अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून असल्याचे प्रमाण कमी होईल. २०२३-२४ च्या आर्थिक सर्वेक्षणानुसार भारतात बिगर-शेती क्षेत्रात वर्षाला ७८.५ लाख रोजगार निर्माण करण्याची गरज आहे. आज एल निनो आणि हवामान बदलामुळे भारतातील नेमेचि येणारा पावसाळा हुलकावणी देऊ लागला आहे. पण भारतातील दुष्काळ आणि शेतीच्या समस्यांवर अगदी स्वातंत्र्यपूर्व काळापासून चर्चा होत आहे. या समस्या खरोखर पावसाच्या दुष्काळामुळे भेडसावत आहेत, की सुयोग्य नियोजनाच्या अभावामुळे, हा खरा प्रश्न आहे. प्रत्येक राज्य आणि तालुक्यातील विशिष्ट परिस्थितीला साजेशी धोरणे राबविणे, राज्य आणि केंद्र सरकारच्या चालू योजनांमध्ये समन्वय साधणे, आणि बिगर शेतीक्षेत्रात जोमाने रोजगारनिर्मिती करणे या त्रिसूत्रीतच पुढील वाटचाल आणि विकासाचे गमक दडलेले आहे.(साभार म.टा)

**-प्रा. जयंती काजळे,**
**डॉ. ललितगौरी कुलकर्णी**

## संवाद

### नसरापूर प्रकरणी न्याय मिळेल?

पुण्यातील नसरापूर येथे एका ४ वर्षाच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचाराचे आणि तिच्या हत्येचे प्रकरण आज राज्यभर गाजत आहे. याप्रकरणी भीमराव कांबळे या नराधमाला पोलिसांनी अटक केली असून त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. या नराधमाच्या हा पहिला गुन्हा नसून यापूर्वीही त्याच्यावर स्त्री अत्याचाराचे आणि विनयभंगाचे अनेक गुन्हे नोंद आहेत. स्वतःच्या भावाच्या अल्पवयीन मुलीवरही त्याने अत्याचार केला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सर्व प्रकरणांत तो जामिनावर मुक्त आहे त्यामुळे या प्रकरणातही पुन्हा तो जामिनावर बाहेर येऊन पुन्हा तशा प्रकारचा गुन्हा करण्यासाठी मुक्त होणार का? असा प्रश्न आहे. आजमितीला राज्यात स्त्रीसुरक्षेचे तीनतेरा वाजले आहेत हे कोणीच नाकारणार नाही. प्रतिदिन राज्यात कुठेनाकुठे बलात्काराच्या, विनयभंगाच्या, लैंगिक शोषणाच्या घटना घडत आहेत. गुन्हेगारांवर कायद्याचा धाक राहिलेला नाही किंवा सध्याचे कायदे हे गुन्हेगारांना योग्य शासन देण्यास अपुरे असल्याचे वेळोवेळी दिसून येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नसरापूर प्रकरणी स्वतः लक्ष घालून एसआयटीची स्थापना केली आहे तसेच हा गुन्हा उच्च न्यायालयात चालवून कांबळेला फासावर लटकावण्याचे आश्वासन दिले आहे, मात्र खरोखर असे घडेल का ? या सर्व चौकशीत पुन्हा किती काळ जाईल ? हा खटला आणखी किती वर्षे चालेल ? गुन्हेगाराने गुन्हा कबुल केला आहे आणि सर्वकाही स्पष्ट असताना न्यायालय शिक्षा देण्यास विलंब का करते?आज प्रकरण राज्यभर गाजत असले तरी पुढील आठवडा-पंधरा दिवसांनी लोक सर्वकाही विसरून जातील.

**जगन घाणेकर**

### १०१ व्या दिवशी तरी मराठी बोलतील का ?

परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षा चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याच्या निर्णयाला अखेर सरकारने शंभर दिवसांची मुदतवाढ दिली. आगामी शंभर दिवसात जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी बोलता आली नाही तर त्याचा परवाना रद्द करण्यात येईल असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे. परप्रांतीय रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी शिकण्यासाठी १०० दिवसांची मुदत दिल्यानंतर हा वाद तूर्त शांत झाला असला तरी प्रश्न पडतो की जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकले नाही ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील का? आणि जर त्यांची मराठी मानसिकताच नसेल तर १०० दिवस काय १०० वर्षांची मुदत दिली तरी ते मराठी शिकणार नाहीत आणि जर ते १०० दिवसात मराठी शिकले नाही तर १०१ व्या दिवशी सरकार त्यांचे परवाने खरोखरच रद्द करेल का? की त्यांच्या मुजोरीला बळी पडून पुन्हा मुदत वाढ देईल? वास्तविक जे परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालक अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी शिकू शकले नाहीत ते अवघ्या १०० दिवसात मराठी शिकतील ही अपेक्षा करणेच चूक आहे. अनेक वर्ष महाराष्ट्रात राहूनही मराठी न शिकणाऱ्या या मुजोर रिक्षा, टॅक्सी चालकांवर कारवाई व्हायलाच हवी. पण सरकार त्यांच्याकडे मतपेटी म्हणून पाहते. मतपेटीच्या जोरावरच ते महाराष्ट्रात राहूनही मराठीला तुच्छ लेखतात आणि मराठी शिकण्यास नकार देतात. मतपेटीच्या जोरावरच ते मुजोरी करून सरकारलाही जेरीस आणतात. काही राजकीय नेतेही स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी या मुजोर परप्रांतीय रिक्षा टॅक्सी चालकांची बाजू घेतात हे मराठी आणि महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. सरकार या परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकण्यास मुदतवाढ देऊ अगर न देऊ मराठी भाषकांनी या परप्रांतीय चालकांशी मराठीतच बोलावे. जर परप्रांतीय रिक्षा, टॅक्सी चालकांनी मराठी बोलण्यास नकार दिला तर त्या रिक्षा, टॅक्सीतून प्रवासच करू नये. असे केले तरच हे मुजोर रिक्षा, टॅक्सी चालक मराठी शिकतील आणि मराठीतून बोलतील.

**श्याम ठाणेदार**

### बंगालचे महापरिवर्तन

पश्चिम बंगालच्या राजकारणात अखेर महापरिवर्तनाचे वारे वाहिले असून निकालांनी नवा इतिहास घडवला आहे. २०११ मध्ये ज्या ममता बॅनर्जी यांनी डाव्यांची ३४ वर्षांची अभेद्य सत्ता उलथवून टाकली होती, आज त्याच बॅनर्जी यांच्या १५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग लागल्याचे या निकालातून स्पष्ट झाले आहे. २०२१ मध्ये 'लक्ष्मी भंडार' सारख्या कल्याणकारी योजनांमुळे महिला मतदार तृणमूलचे 'सुरक्षा कवच' बनल्या होत्या. परंतु, २०२६ मध्ये हे चित्र पूर्णपणे पालटले. आर.जी. कर प्रकरण या मध्ये कोलकाता येथील शिकाऊ डॉक्टरवरील पाशवी अत्याचार आणि हत्येमुळे शहरी मतदारांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली. पीडितेची आई रत्ना देबनाथ यांनी न्यायासाठी स्वतः निवडणूक रिंगणात उतरण्याचा घेतलेला निर्णय हा सरकारसाठी मोठा नैतिक पराभव ठरला. संदेशखली मध्ये महिलांवर झालेले अत्याचार आणि सत्ताधारी नेत्यांनी बळकावलेली शेतजमीन या मुद्द्यांमुळे तृणमूलची प्रतिमा जनमानसात डागाळली.'रीक्लेम द नाईट' सारख्या आंदोलनांनी महिला सुरक्षेला निवडणुकीचा केंद्रबिंदू बनवले. गेल्या काही वर्षांत समोर आलेले भ्रष्टाचार चक्रावून टाकणारे आहेत. शिक्षक भरती घोटाळ्याने राज्याच्या शिक्षण व्यवस्थेला कलंक लावला, तर राशन वाटप घोटाळ्यामुळे भ्रष्टाचाराचे जाळे थेट मंत्रालयापर्यंत पोहोचल्याचे उघड झाले. भाजपने दिलेला 'भ्रष्टाचारमुक्त बंगाल' हा नारा त्रस्त जनतेला आपला वाटला. याव्यतिरिक्त, निवडणूक आयोगाने केवळ दोन टप्प्यांत मतदान घेण्याचा घेतलेला निर्णय हिंसाचार रोखण्यासाठी आणि निष्पक्ष मतदानासाठी निर्णायक ठरला.पश्चिम बंगालचा हा निकाल लोकशाहीतील एका महत्त्वाच्या तत्वाची पुनरावृत्ती करतो.बंगालच्या या निकालाने हे सिद्ध केले आहे की, केवळ कल्याणकारी योजनांच्या घोषणांनी पोट भरता येत नाही; जनतेला सुरक्षितता, पारदर्शक प्रशासन आणि न्याय हवा असतो. हा विजय केवळ एका पक्षाचा नसून, तो भयमुक्त वातावरणासाठी आसुसलेल्या सामान्य बंगाली जनतेच्या विश्वासाचा आहे. सत्तेचा माज उतरवण्याची ताकद आजही मतपेटीत सुरक्षित आहे, हाच संदेश या निमित्ताने संपूर्ण देशाला मिळाला आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# प्रशासकीय उदासीनतेचा 'हळद क्लस्टर'ला फटका

## जिल्हा उद्योग केंद्राच्या कारभाराविरोधात उपोषणाचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीचा दावा केला जात असतानाच, यवतमाळ जिल्हा उद्योग केंद्राच्या ढिसाळ कारभारामुळे उमरखेड तालुक्यातील महत्त्वाकांक्षी 'हळद प्रक्रिया प्रकल्प' संकटात सापडला आहे. प्रशासकीय स्तरावरून कोणतेही स्पष्ट मार्गदर्शन किंवा लेखी सूचना मिळत नसल्याने 'विद्यालय हळद प्रक्रिया क्लस्टर असोसिएशन'चे कामकाज पूर्णतः ठप्प झाले असून, याविरोधात आता आमरण उपोषणाचा पवित्रा असोसिएशनने घेतला आहे.

शेतकरी आणि उद्योजक आर्थिक अडचणीतविदर्भ आणि विशेषतः यवतमाळ जिल्ह्यात हळद उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यांना आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या या सामूहिक सुविधा केंद्राच्या (CFC) प्रशासकीय प्रक्रियेत जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांकडून जाणीवपूर्वक अडथळे निर्माण केले जात असल्याचा आरोप पत्राद्वारे करण्यात आला आहे. यामुळे प्रकल्पाची प्रगती थांबली असून, जिल्ह्यातील इतर केंद्रांवरही याचे सावट आहे. या दिरंगाईमुळे प्राथमिक प्रक्रिया उद्योगांना मोठा आर्थिक फटका



बसत असून, पर्यायाने शेतकऱ्यांचेही नुकसान होत आहे.

3 जुलै 2025 रोजी आयोजित डीपीआर संदर्भातील बैठकीत, जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांनी कोणत्याही तांत्रिक व आर्थिक विभागांचा अधिकृत अहवाल न घेता प्रकल्प तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या योग्य नसल्याचा ठराव मांडला. या ठरावावर असोसिएशनने तात्काळ हरकत नोंदवून सदर बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास लेखी स्वरूपात आणली आहे. सदर प्रकल्प हा पारंपरिक शेती पद्धतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करणारा नाविन्यपूर्ण उपक्रम असून, प्रशासकीय पातळीवरून सहकार्य मिळत नसल्यामुळे शेतकरी व उद्योजक आर्थिक अडचणीत सापडले असून, प्रकल्पाचा मूळ उद्देशच धोक्यात आला आहे. या संदर्भात संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यांनी दिनांक 28 एप्रिल 2026 रोजी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले होते, ज्याची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित विभागास तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रशासकीय बेजबाबदारपणामुळे प्रकल्पाचा मूळ उद्देशच सफल होत नसल्याचे दिसून येत आहे. याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांना योग्य निर्देश द्यावेत आणि प्रलंबित कामे मार्गी लावावीत, अशी मागणी असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष यांनी केली आहे. प्रशासनाला निवेदन सादर करून या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी असोसिएशनने यवतमाळचे पालकमंत्री, महाराष्ट्र राज्याचे उद्योग सचिव, जिल्हाधिकारी, तसेच अमरावती विभागाचे उद्योग संचालक यांना निवेदनाच्या प्रती पाठवल्या आहेत. प्रशासनाने तातडीने दखल न घेतल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. वारंवार पत्रव्यवहार करूनही जिल्हा उद्योग केंद्राकडून (DIC) प्रतिसाद मिळत नसल्याने उमरखेड येथील 'विडालय हळद प्रक्रिया क्लस्टर'च्या (Vidalay Turmeric Processing Cluster) प्रगतीवर गंभीर परिणाम होत आहे. तसेच 'डीआयसी'कडून कामात सहकार्य किंवा प्रतिसाद मिळत नसल्याने सामूहिक सुविधा केंद्राचे काम रखडले आहे.या दिरंगाईमुळे संतप्त झालेल्या अर्जदाराने उपोषण करण्याचा इशारा दिला होता. या निवेदनाची गंभीर दखल घेत, जिल्हाधिकारी कार्यालयातील नायब तहसीलदार (गृह) छाया काळे यांनी जिल्हा उद्योग केंद्राला पत्र पाठवले आहे. या प्रकरणावर तातडीने कार्यवाही करून अर्जदारास उपोषणापासून परावृत्त करावे, अशा सूचना पत्राद्वारे देण्यात आल्या आहेत. या पत्राची प्रत माहितीसाठी पोलीस अधीक्षकांनाही पाठवण्यात आली आहे. हळद वाळवण्याची प्रक्रिया 20–25 दिवसांवरून 24–30 तासांमध्ये पूर्ण होणार आहे, स्वच्छ व हायजेनिक प्रक्रियेमुळे उत्पादनाला आंतरराष्ट्रीय दर्जा (Export Quality) प्राप्त होणार आहे, तसेच शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेशी जोडण्यासाठी NCDEX सारख्या प्लॅटफॉर्मचा वापर होणार आहे.

# उटी येथे भररात्री घरफोडीचा थरार

महागाव : तालुक्यातील उटी येथे शनिवारी मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत साडेसात तोळे सोने, चांदीचे दागिने आणि सुमारे दीड लाख रुपयांची रोकड असा ऐवज लंपास केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राजू नानाराव गावंडे यांच्या राहत्या घरावर चोरट्यांनी डल्ला मारला. घरात प्रवेश करून त्यांनी आलमारीचे लॉकर तोडत अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने चोरी केली. घरातील केवळ मौल्यवान वस्तूंनाच लक्ष्य केल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा तत्काळ घटनास्थळी दाखल झाली. आयपीएस हर्षवर्धन बीजे यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा पुसदचे प्रमुख धीरज बांडे, साहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंबुरे, उपनिरीक्षक अमोल राठोड यांच्यासह पथकाने घटनास्थळाची पाहणी करत तपासाला वेग दिला. दरम्यान, फिंगरप्रिंट तज्ज्ञ, श्वानपथक व फॉरेन्सिक पथकाला पाचारण करण्यात आले. घटनास्थळावरून काही ठसे मिळाले असून त्याच्या आधारे संशयितांचा शोध सुरू आहे.

# आदिवासी समाज व विद्यार्थ्यांच्या हितासाठी काम करण्याचा संकल्प करा

## आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ : आदिवासी समाज आणि विद्यार्थ्यांचे हित जोपासून चांगल्या मानसिकतेने काम करण्याचा संकल्प करा, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री ना. डॉ. अशोक उईके यांनी केले. अप्पर आयुक्त आदिवासी विकास विभाग अमरावतीच्या वतीने हॉटेल एम डब्ल्यू पॅलेस येथे आयोजित शासकीय आदिवासी आश्रमशाळा विद्यार्थी प्रवेश क्षमता वाढीसाठी एक दिवसीय कार्यशाळेचे उद्घाटन व समारोप मंत्री ना. डॉ. अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, अमरावती विभागाच्या अपर आयुक्त आयुषी सिंह, नाशिक विभागाचे अपर आयुक्त डिगांबर चव्हाण, मुख्य अभियंता ढाबे, सर्व प्रकल्प अधिकारी, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते.



पुढे बोलतांना मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले की, ग्रामीण भागातील आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी प्रवेश संख्या वाढविण्यासाठी ग्रामसभांचे आयोजन करावे. त्यामाध्यमातून आदिवासी आश्रमशाळाविषयी पालकांचा विश्वास संपादन करुन त्यांचे मन परिवर्तन करावे. यासह शासकीय योजनांची जनजागृती करुन लोकसहभाग वाढवावा आणि लोकचळवळ निर्माण करावी. तसेच आदिवासी विद्यार्थी हा केंद्रबिंदू माणून काम करावे. आदिवासी समाजात परिवर्तन घडविण्यासाठी प्रशासन व आश्रमशाळांनी चांगल्या मानसिकतेने काम केले पाहिजे, अशा सूचना त्यांनी दिल्या. शासकीय आश्रमशाळेच्या प्रभावी कामकाजासाठी मुख्याध्यापक स्तरावर समित्या गठीत कराव्यात. त्यामध्ये शाळा प्रवेश समिती, भोजन समिती, दिनचर्या समिती, देखरेख समिती इत्यादींचा समावेश असावा, अशा सूचना मंत्री डॉ. अशोक उईके यांनी यावेळी दिल्या. आदिवासी विकास विभागांतर्गत येणाऱ्या योजना, उपक्रम व उल्लेखनीय कार्याबाबत प्रत्येक कार्यालयांनी प्रचार प्रसिद्धीवर भर द्यावा. या माध्यमातून आदिवासी विकास योजना, आश्रमशाळा व वसतिगृहांबाबत समाजात सकारात्मकता निर्माण करावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले. आदिवासी समाजातील मुलामुलींसाठीच्या वसतिगृहांना प्रकल्प अधिकाऱ्यांनी नियमित भेटी देवून आढावा घ्यावा. वसतिगृहाबाबत गैरसमज दूर करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, असे निर्देशही त्यांनी दिले. आदिवासी वसतीगृहात अनुचित प्रकार घडून नये या उद्देशाने नियंत्रणासाठी गृहपालांना वसतिगृहातच राहणे बंधनकारक करुन वसतीगृहांची तपासणी करावी. गैरहजर असलेल्यांवर कडक कारवाई करण्याचे निर्देशही मंत्री डॉ. अशोक उईके यांनी यावेळी दिले. आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांनी आश्रमशाळांमध्ये दिनचर्या, पौष्टिक आहार, आरोग्य तपासणी करावी. तसेच 'आधी प्रवेश नंतर कागदपत्र' या संकल्पनेनुसार विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश द्यावा.

# • वेचक

## सुसंस्कार शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद; प्रथम दिनी तब्बल १६५ विद्यार्थी उपस्थित



पुसद : मागील सतरा वर्षांपासून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती अर्थात ग्रामजयंती निमित्त घेण्यात येणाऱ्या सुसंस्कार शिबिरात पहिल्याच दिवशी तब्बल १६५ शिबिरार्थी विद्यार्थी आलेत त्यामुळे श्रीरामपूर पुसद येथील गुरुदेव सेवा मंडळाने पालकांचा विश्वास संपादन केल्याची चर्चा सर्वत्र होत असून अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गुरूकुंज आश्रम मोझरी यांनी मंडळाच्या कार्याची दखल घेतली. या शिबिरात पहाटे सामुदायिक ध्यानात नेताजी केणे,प्रमोद देशमुख, किसन गरडे,निवृत्तीनाथ बैस्कार,स्मिता धर्माळे मुक्ता काळबांडे यांनी प्रातस्मरण गीत, ध्यानपाठ,श्लोक,नामधून,नामजप, आत्मचिंतन गीत,शांतिपाठ व जयघोष घेतला, पतंजली योग समिती प्रभारी प्रकाश वानरे व सौ. माधुरी वानरे यांनी यौगिक जागिंग सह ताडासन,गरुडासन,गोमुखासन चक्रासन,वज्रासन,सर्वांगासन, शवासन,सिंहासन,हास्यासन शिवाय कपालभाती,अनुलोम विलोम, भ्रामरी प्राणायाम घेतले त्यानंतर बौद्धिक तासिकेत राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक यशवंत देशमुख यांनी आपल्या प्रदीर्घ शिक्षण सेवेच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना वडीलधारी व्यक्तींशी संबोधन, आईवडिलांचे ऋण,सामाजिक बांधिलकी, प्रयत्नवाद, व्यसनमुक्ती यांचे धडे देत शब्दाने वाक्य, वाक्याने विचार विचारणे कृती, कृतीने चरित्र तर चरित्राने चारित्र्य घडते त्या व्यक्तींचा इतिहास बनतो त्यांच्या उपदेशाचे पालन करून लोक जीवन जगतात अश्या अनेक महामानवांची उदाहरणे देऊन श्रवण करतांनी अवधान असावे अंधानुकरण नसावे, सूचनांचे पालन करावे व मन स्थिर ठेवावे असे सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला.

## प्रवासी महिलेची पोत पळविली

उमरखेड : येथील बस स्थानकावर गर्दीचा फायदा घेऊन कुणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवासी महिलेच्या गळ्यातील सोन्याची सोन्याची पोत अंदाजे २९ हजार रुपये किमतीची पळविली. ही घटना उमरखेड येथे ३० एप्रिल रोजी दुपारी उघडकीस आली. अनुसया सकाराम कदम (७७) रा. गांधीनगर पुसद ता. पुसद असे फिर्यादीचे नाव आहे. घटनेनंतर त्यांनी उमरखेड पोलीस ठाणे गाठून याप्रकरणी रीतसर तक्रार दिली. त्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# दातोडीत पैनगंगेची लूट..!

## 'त्रिमूर्ती'च्या संशयास्पद मौनामुळे रेती माफियांचा सुळसुळाट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

आर्णी - तालुक्यातील दातोडी परिसरात पैनगंगा नदीपात्रातून सुरू असलेला अवैध रेती उपसा आता उघडपणे सुरू असलेला संघटित गैरव्यवहार ठरत असून, प्रशासनाच्या संशयास्पद निष्क्रियतेमुळे रेती माफियांना मोकळे रान मिळाल्याचे चित्र समोर आले आहे. महसूल, वन आणि खनिकर्म या तीन प्रमुख यंत्रणांच्या देखरेखीखालीच नदीपात्राची उघड लूट सुरू असल्याने, या 'त्रिमूर्ती'च्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

खनिकर्म विभागाची 'दृष्टीआड' भूमिका जिल्ह्यातील खनिज संपत्तीचे संरक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या खनिकर्म विभागाने दातोडीतील अवैध उत्खननाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. नियमांनुसार, अनधिकृत उत्खननावर तात्काळ पाहणी व दंडात्मक कारवाई अपेक्षित असताना, पैनगंगेच्या पात्रात यंत्रांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात रेती उपसा सुरू



असतानाही अधिकारी निष्क्रिय असल्याचे दिसते. या 'दृष्टीआड' भूमिकेमुळेच माफियांचा आत्मविश्वास वाढल्याचे बोलले जात आहे. वन हद्दीतून मोकळा मार्ग काढला असून नदीपात्रातून काढलेली रेती वाहून नेण्यासाठी वनक्षेत्रातील रस्त्यांचा सर्रास वापर होत आहे. वन कायद्यानुसार ही वाहतूक रोखण्याचे अधिकार असूनही, दिवसाढवळ्या ट्रक व ट्रॅक्टरची ये-जा सुरू असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, तस्करांना अप्रत्यक्ष मोकळीक दिली जात असल्याची चर्चा रंगत आहे.महसूल यंत्रणेची कागदी कारवाई करतात महसूल विभागाचे भरारी पथक प्रत्यक्षात किती सक्रिय आहे, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अवैध उत्खनन उघडपणे सुरू असताना तहसील प्रशासनाकडून ठोस कारवाईचा अभाव जाणवतो. परिणामी, शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडत असून पर्यावरणीय हानीही तीव्र होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्तक्षेपाची मागणी महसूल, वन आणि खनिकर्म या तिन्ही विभागांच्या निष्क्रियतेमुळे दातोडीतील परिस्थिती गंभीर बनली आहे. स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेबाबत वाढत्या संशयाच्या पार्श्वभूमीवर, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच नदीपात्राची होत असलेली लूट तात्काळ थांबवावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# पांढरकवड्याच्या शिलेदारांची अर्नाळ्यात 'सुवर्ण' भरारी

## राष्ट्रीय कराटे स्पर्धेत पदकांची लयलूट!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - जपान शोतोकन कराटे-डो कन्निंजुकू ऑर्गनायझेशन इंडियाच्या वतीने आयोजित 'अखिल भारतीय कन्निंजुकू शोटो कप कराटे चॅम्पियनशिप आणि उन्हाळी प्रशिक्षण शिबिर २०२६' मध्ये पांढरकवडा येथील खेळाडूंनी पदकांची लयलूट करत ऐतिहासिक कामगिरी केली. विरार जवळील अर्नाळा येथील ग्रीन पॅराडाईज रिसॉर्ट येथे पार पडलेल्या या ५ दिवसीय शिबिरात देशभरातील विविध राज्यांतील २५० हून अधिक खेळाडू सहभागी झाले होते.

या राष्ट्रीय स्तरावरील शिबिरात हंशी परमजीत एस. सिंग यांनी खेळाडूंना जागतिक कराटे महासंघाच्या (डब्ल्यू के एफ) नवीन नियमावलीचे प्रशिक्षण दिले. यावेळी शिहान सुमा सिंह (सेक्रेटरी, जे.एस.के.के.ओ इंडिया) यांनीही खेळाडूंना मार्गदर्शन केले. यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशन द्वारा संचालित पांढरकवडा केंद्रातील ११ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत काता



व कुमिते प्रकारात आपले कसब दाखवले.

पांढरकवड्यातील अर्हत राहुल मेश्राम याने कातामध्ये सुवर्ण व कुमितेमध्ये कांस्य पदक जिंकले, तर छनछन योगेश पडोळे हिने काता आणि कुमिते या दोन्ही क्रीडा प्रकारात सुवर्ण पदकावर नाव कोरले. ईश्वरी रामकृष्ण गेडाम हिने कातामध्ये कांस्य व कुमितेमध्ये सुवर्ण, तर मनस्वी मुकेश माथुर हिने देखील कातामध्ये कांस्य व कुमितेत सुवर्ण पदक मिळवले. सानिध्य मंगेश वतीले याने कातामध्ये रौप्य व कुमितेत सुवर्ण पदक पटकावले. त्याचप्रमाणे वेदांत ज्ञानेश्वर सोयाम याने कातामध्ये सुवर्ण व कुमितेत रौप्य, तर रुद्र प्रदीप सोमनकर याने कातामध्ये सुवर्ण व कुमितेत रौप्य पदक आपल्या नावे केले. अथांक दीपक पडोळे आणि ओम प्रवीण कुमरे या दोघांनी काता व कुमिते या दोन्ही प्रकारात प्रत्येकी दोन रौप्य पदके मिळवली. साईप्रसाद हितेश नागभीडकर याने कातामध्ये रौप्य व कुमितेत कांस्य, तर मुग्धा संदीप वटे हिने कातामध्ये रौप्य व कुमितेत कांस्य पदक जिंकले. सांघिक कामगिरीत मुलींच्या संघाने 'टीम काता'मध्ये रौप्य, तर मुलांच्या संघाने कांस्य पदक पटकावले. स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरी योगेश पडोळे आणि रुद्र प्रदीप सोमनकर यांना 'बेस्ट कराटे का स्टुडन्ट' या बहुमानाने गौरवण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेत पांढरकवड्याच्या खेळाडूंनी एकूण ७ सुवर्ण, ८ रौप्य आणि ५ कांस्य अशा एकूण २० पदकांची कमाई केली. यवतमाळ जिल्हा कराटे असोसिएशन द्वारा संचालित पांढरकवडा केंद्रातील विद्यार्थ्यांनी काता आणि कुमिते या दोन्ही प्रकारात आपले वर्चस्व गाजवले. शिहान डॉ आनंद एस. भुसारी यांच्या मार्गदर्शनात सेन्साई योगेश पडोळे आणि हितेश नागभीडकर यांनी या खेळाडूंना तयार केले होते.

# बांधकाम कामगारांच्या बंद योजना तात्काळ सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलन

## जनवादी कामगार संघटनेचा इशारा

**जनमाध्यम प्रतिनिधी**

बाभूळगाव - महाराष्ट्र राज्य इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या बंद पडलेल्या योजना तात्काळ सुरू कराव्यात व कामगारविरोधी धोरणांचा निषेध म्हणून जनवादी बांधकाम कामगार मजदूर संघटनेने बाभूळगाव तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर व मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक कुंभार यांना सोमवारी निवेदन दिले.

कामगार हक्कापासून वंचित, प्रचंड असंतोष संघटनेच्या निवेदनात म्हटले आहे की, लाखो बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी स्थापन झालेल्या मंडळाचे लाभ गेल्या अनेक महिन्यांपासून शासनाच्या जाचक धोरणांमुळे थांबले आहेत. नोंदीत कामगार व इतर २१ प्रकारच्या क्षेत्रात काम करणारे खरे कामगार हक्काच्या लाभांपासून वंचित आहेत. सेवा हमी कायद्याचे सर्रास उल्लंघन होत असून प्रशासकीय दिरंगाईमुळे कामगारांमध्ये असंतोष खदखदतो आहे.

प्रमुख मागण्या काय : साहित्य संच वाटप तात्काळ सुरू करा गृहउपयोगी, सुरक्षा व अत्यावश्यक संचाचे वाटप विनाकारण थांबवले आहे. ते युद्धपातळीवर सुरू करावे. मृत्यू सहाय्य योजनेतील जाचक अटी रद्द करा: अंत्यविधी सहाय्य, नैसर्गिक व अपघाती मृत्यू विमा योजनेतील ५१ वर्षांची वयोमर्यादा व इतर अटी रद्द कराव्यात. सक्रिय कामगाराला विमा संरक्षण हा अधिकार आहे.प्रसूती लाभ व पाल्यांच्या शिष्यवृत्तीचे हजारो अर्ज तांत्रिक कारणास्तव प्रलंबित आहेत. ते त्वरित मंजूर करावेत. पेन्शनची २० वर्षांची अट शिथिल करा: बांधकाम क्षेत्र हंगामी असल्याने सलग २० वर्ष नोंदणीची अट जाचक आहे. वृद्ध कामगारांना आधार मिळावा यासाठी फेरविचार करावा. नोंदणी-नूतनीकरण प्रक्रिया सुरू करा: गेल्या तीन महिन्यांपासून नोंदणी व लाभाचे अर्ज तपासणी ठप्प आहे. सेवा हमी कायद्यानुसार विहित वेळेत सेवा द्यावी. ४ लेबर कोडला विरोध:✻ केंद्राच्या ४ लेबर कोडमुळे कामगारांचे शोषण होईल व कायदेशीर संरक्षण धोक्यात येईल. राज्याने यावर पुनर्विचार करावा. कामगारविरोधी जीआर रद्द करा: मंडळाच्या योजनांना कात्री लावणारे नवीन शासन निर्णय तात्काळ रद्द करावेत. १० दिवसांचा अल्टिमेटम "हे निवेदन शासन व कल्याणकारी मंडळाकडे तात्काळ पाठवून १० दिवसांच्या आत कामगारांना न्याय मिळवून द्यावा. मागण्यांची दखल न घेतल्यास कामगारांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा संघटनेने निवेदनातून दिला आहे.

# अंधश्रद्धा सोडल्याशिवाय महाराष्ट्र बलवान होणार नाही : प्रा. श्याम मानव

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने प्रगत आणि बलवान बनवायचे असेल, तर अंधश्रद्धेच्या विळख्यातून समाजाची सुटका करणे अत्यावश्यक आहे, असे ठाम मत व्यक्त करत प्रा. श्याम मानव यांनी राज्य सरकारवर आणि भोंदू बाबांच्या वाढत्या प्रभावावर जोरदार टीका केली. अ. भा. अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा यवतमाळ आणि बिरसा क्रांती दल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "बुवा तेथे बाया" या विषयावरील जाहीर व्याख्यानात ते बोलत होते. हा कार्यक्रम शनिवारी (दि. २ मे) सेलिब्रेशन हॉल, यवतमाळ येथे पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष दशरथ मडावी होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी सामाजिक न्याय मंत्री शिवाजीराव मोघे, राष्ट्रीय संघटक सुरेश झुरमुरे, जिल्हाध्यक्ष प्रा. काशिनाथ लाहोरे, तसेच डी. बी. अंबोरे यांची उपस्थिती होती. प्रा. मानव यांनी आपल्या भाषणात स्पष्टपणे आरोप केला की, अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम स्वतः राज्य सरकार करत आहे. "मुख्यमंत्रीच अशा कथित महाराजांना व्यासपीठ देत असतील, तर समाजात चुकीचे संदेश जातात," असे ते म्हणाले. धीरेंद्र कृष्ण शास्त्री आणि प्रदीप मिश्रा यांसारख्या प्रवचनकारांवर टीका करत त्यांनी चमत्कारांच्या नावाखाली लोकांची फसवणूक होत असल्याचा आरोप केला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने अशा कथित चमत्कारांना आव्हान देत ८० लाखांचे बक्षीस जाहीर केल्याची माहितीही त्यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी पसरवले जाणारे गैरसमज आणि इतिहासाचे विकृतीकरण यावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे अशोक खरातसारख्या भोंदू प्रवृत्ती वाढीस लागल्याचा आरोप त्यांनी केला. कार्यक्रमादरम्यान अचानक वीज खंडित होऊनही प्रा. मानव यांनी तब्बल दोन तास आपले भाषण सुरू ठेवले.

# "८ दिवसांत एटीएम सुरू करा, अन्यथा SBI ला कुलूप!"

## युवा टायगर फोर्सचा इशारा; बँक प्रशासनावर निष्काळजीपणाचा आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पांढरकवडा - शहरातील पुरोहित स्वीटमार्ट (जिडेवार भवन) शेजारील भारतीय स्टेट बँकेचे (SBI) एटीएम गेल्या अनेक दिवसांपासून बंद असल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः बाहेरगावाहून येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिलांना आर्थिक व्यवहारासाठी अक्षरशः भटकंती करावी लागत असून, बँक प्रशासनाचा हलगर्जीपणा उघड झाला आहे.

या गंभीर प्रश्नावर युवा टायगर फोर्स, पांढरकवडा आक्रमक झाली असून, शाखा व्यवस्थापक व महाप्रबंधक श्री भोसले यांना थेट जाब विचारत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात एटीएम तात्काळ सुरू करण्याची ठाम मागणी करत ८ दिवसांचा अल्टिमेटम देण्यात आला आहे. यावेळी बँक प्रशासनाने



एटीएममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे कारण पुढे करत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, युवा टायगर फोर्सच्या दबावामुळेच अखेर ८ दिवसांत एटीएम सुरू करण्याचे लेखी आश्वासन द्यावे लागले, अशी चर्चा शहरात रंगली आहे. संयोजक अंकित नैताम यांनी स्पष्ट शब्दांत इशारा देताना सांगितले की, "जर दिलेल्या मुदतीत एटीएम सुरू झाले नाही, तर शाखेसमोर तीव्र आंदोलन छेडून बँकेला कुलूप ठोकले जाईल. त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीस पूर्णतः बँक प्रशासन जबाबदार राहील." निवेदन देताना संजय झोटिंग, मनोज भोयर, संजय औदार्य, नरेश मानकर, अभय डोंगरे, माधव माने, गणेश बोरकुटे, प्रदीप नारनवरे, रामचंद्र अडते, सागर व्यास आदी पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, नागरिकांच्या मूलभूत सेवेकडे सातत्याने दुर्लक्ष करणाऱ्या बँक प्रशासनाविरुद्ध आता संताप उफाळला असून, येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# गॅस सिलिंडर चोरणारा युवक पोलिसांच्या सापळ्यात

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - एकीकडे स्वयंपाकाच्या सिलिंडरची टंचाई असताना शहरातून एका युवकाने चक्क गॅस सिलिंडरच चोरुन नेल्याचा प्रकार उघडकीस आला. अखेर २ मे रोजी एलसीबी पथकाने त्याला अटक करुन मुद्देमालही जप्त केला. शेख बिलाल शेख वहाब (वय १९) विर्दभ हाउसिंग सोसायटी यवतमाळ, असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या युवकाचे नाव आहे. पोलिसांनी खडसावून विचारपूस करताच त्याने दोन गुन्ह्यांची कबुली दिली. शनिवारी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शहरात पेट्रोलिंग करीत असताना या आरोपीबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. त्यावरुन पोलिसांनी विदर्भहाउसिंग सोसायटी परिसरात धडक देत शेख बिलाल याला ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या या युवकाला पोलिसी खाक्या दाखवताच त्याने चोरीची कबुली दिली. मी व माझा मित्र फारूख उर्फ मुक्का बशीर खान रा. इंदिरानगर अशा दोघांनी एका घरातून दोन दिवसांपूर्वी चोरी केल्याचे त्याने कबुल केले. तसेच २८ एप्रिल रोजी दुपारी गोल्डन पार्कमधून सिलिंडर व टीव्ही चोरल्याचेही त्याने कबुल केले. चोरट्याने स्वतःच्या घरी नेऊन ठेवलेला हा मुद्देमाल तसेच त्याच्या खिशातून चोरीचे पाच हजार रुपये पोलिसांनी जप्त केले. या दोन्ही चोरी प्रकरणी अवधुतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल असून आरोपीला अवधुतवाडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# जिल्ह्यात खाजगी ट्रॅव्हल्सची 'जीवघेणी' अवैध वाहतूक..!

## आरटीओच्या भ्रष्ट कारभाराविरोधात मंत्रालयात धडक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ – जिल्ह्यात नियमबाह्य पद्धतीने चालणारी खाजगी ट्रॅव्हल्सची अवैध वाहतूक आणि याकडे हेतुपुरस्सर दुर्लक्ष करणाऱ्या आरटीओ (RTO) विभागाच्या कारभाराविरोधात आता थेट मंत्रालयातून दाद मागण्यात आली आहे. लोककल्याण ग्राहक संरक्षण संस्थेचे जिल्हा कार्याध्यक्ष मनिष शिरभाते यांनी मुंबई येथे राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन या गंभीर परिस्थितीबाबत निवेदन सादर केले आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

निवेदनात नमूद केल्यानुसार, यवतमाळ जिल्ह्यात खाजगी बसेस आणि ट्रॅव्हल्स चालकांकडून 'टप्पा वाहतूक' नियमांचे सर्रास उल्लंघन केले जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांची वाहतूक करणे आणि बसेसमध्ये नियमबाह्य तांत्रिक बदल करणे यामुळे अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. या संदर्भात मनिष शिरभाते यांनी आरटीओ विभागावर खळबळजनक आरोप केला असून, आरटीओ अधिकारी आणि कर्मचारी या अवैध प्रकारावर कारवाई करण्याऐवजी दलालांमार्फत वसुली करण्यात मग्न असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.

आरटीओच्या नाक्यांवर उघडपणे होणाऱ्या या आर्थिक व्यवहारामुळे सर्वसामान्य प्रवाशांचा जीव धोक्यात आला आहे.पुसद - मुंबई मार्गावरील 'बंजारा' ट्रॅव्हल्सच्या भीषण अपघाताचा संदर्भ देत शिरभाते यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले. सुरक्षिततेचे नियम पायदळी तुडवले जात असल्यामुळेच निष्पाप नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत असून, या जीवघेण्या प्रकाराला वेळीच लगाम न घातल्यास भविष्यात मोठे आंदोलन छेडण्याचा इशाराही संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे. प्रवाशांच्या सुरक्षेसाठी आणि भ्रष्ट साखळी तोडण्यासाठी ही लढाई मंत्रालयापर्यंत नेली असल्याचे सांगत, शिरभाते यांनी परिवहन मंत्र्यांकडे काही प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. यामध्ये क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी भरणाऱ्या ट्रॅव्हल्सवर कठोर गुन्हे दाखल करणे, आरटीओ विभागातील भ्रष्ट अधिकारी आणि वसुली करणाऱ्या दलालांची सखोल चौकशी करून त्यांचे निलंबन करणे, तसेच प्रत्येक खाजगी ट्रॅव्हल्सची तांत्रिक तपासणी अनिवार्य करणे या बाबींचा समावेश आहे. या निवेदनामुळे आता आरटीओ विभाग आणि अवैध ट्रॅव्हल्स चालकांच्या गोटात खळबळ उडाली असून, राज्य शासन यावर काय भूमिका घेते याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# मेळघाटातील पाणीटंचाईत खपवून घेणार नाही

## सीईओंचा मॅरेथॉन दौरा

**धारणी/वार्ताहर**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांनी चिखलदरा व धारणी तालुक्यातील दुर्गम मेळघाट भागात मॅरेथॉन दौरा करत पाणीटंचाई, जलजीवन मिशन, लघुसिंचन तसेच ग्रामपंचायतस्तरावरील विकासकामांचा सखोल आढावा घेतला. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील पाणीपुरवठा सुरळीत ठेवणे, अपूर्ण योजनांना गती देणे आणि सुरू असलेल्या कामांची गुणवत्ता तपासणे यावर त्यांनी विशेष भर दिला. पाणी टंचाईबाबत हलगर्जीपणा खपवून घेणार नाही, असा इशारा त्यांनी दिला आहे.


सिईओ गांधी यांनी पहाटे अमरावतीहून दौऱ्याची सुरुवात करत कोहाना व बिहाली येथे कोल्हापुरी बंधारे आणि जलजीवन मिशनअंतर्गत कामांची पाहणी करण्यात आली. सेमाडोह मार्गे माखला येथे आरोग्य उपकेंद्राची तपासणी करताना इन्व्हर्टर बॅटरी व अंगणवाडीतील डिजिटल टीव्ही दुरुस्त करण्याचे तात्काळ निर्देश देण्यात आले. ग्रामपंचायतीत नागरिकांशी संवाद साधत

पाणीपुरवठा योजनेतील त्रुटींवर चर्चा करण्यात आली. टेंभूरढाणा येथे सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनेला गती देत पाच दिवसांत प्रत्यक्ष पुरवठा सुरू करण्याचे आदेश देण्यात आले. भिलोजा येथे सिंचन तलावाची पाहणी, तर राक्षा येथे जुन्या पाईपलाईनमुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तारूबांदा येथे ग्रामस्थांना विहिरीतून पाणी डोक्यावर वाहून न्यावे लागत असल्याचे आढळल्याने सीईओंनी तीव्र नाराजी व्यक्त करत तात्पुरत्या उपाययोजना त्वरित राबवण्याचे निर्देश दिले. आढाव येथे एक दिवसाआड पाणीपुरवठा होत असल्याचे समोर आल्यानंतर दररोज पाणी देण्याच्या सूचना देण्यात आल्या. ढाकणा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र, तर सावऱ्या व बोरिखेडा येथे पाणीपुरवठ्याची स्थिती तपासून आवश्यक सुधारणा करण्याचे आदेश देण्यात आले. धारणी तालुक्यातील कढाव येथे ग्रामस्थांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईचा इशारा देत पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी विहिरीचे खोलीकरण, अतिरिक्त पाइपलाईन व टँकरद्वारे पुरवठा सुरू ठेवण्याचे आदेश देण्यात आले. पाच दिवसांत समस्या निकाली न काढल्यास निलंबनाची कारवाई होईल, असे स्पष्ट करण्यात आले.

# भारतीय महाविद्यालयाचा घवघवीत यशकिर्तीचा ठसा

## विज्ञान शाखेचा ९७.६७ % निकाल



**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (पुणे) यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या निकालात राजापेठ येथील भारतीय महाविद्यालय, अमरावती यांनी यंदाही उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. विज्ञान शाखेने तब्बल ९७.६७ टक्के निकाल लावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

महाविद्यालयाच्या विविध शाखांनुसार पाहता विज्ञान शाखा आघाडीवर असून कला शाखेनेही ८७.५० टक्क्यांसह समाधानकारक कामगिरी केली आहे. वाणिज्य शाखेचा निकाल ५२.६३ टक्के, महाविद्यालयाचा एकूण निकाल ९२.०५ टक्के लागला आहे. तसेच एमसीव्हीसी विभागाचा निकाल ७२.७० टक्के लागला आहे. या सर्व निकालांमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा आणि विद्यार्थ्यांच्या परिश्रमाचे प्रतिबिंब स्पष्टपणे दिसून येते.यंदाच्या निकालात विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी विशेष प्रावीण्य मिळवत गुणवत्तेची उंची गाठली आहे. आर्या सांगले हिने ८८.६७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला, तर तनुश्री शेबे (८७.१७इ) आणि तनुश्री काळेकर (८३इ) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळवला. पियुष गजभिये (८१.८३इ), श्रावणी सातवकर (८०.८३इ) आणि समृद्धी भुते (७९.६७इ) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

कला शाखेत अदिती कुकडे हिने ६८.६७ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. दिव्या वायधने (६८इ) आणि गौरव श्रीवास्तव (६३.८३इ) यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक पटकावला. वाणिज्य शाखेत जानवी टाले हिने ६५ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. या यशामध्ये सामाजिक समावेशकतेचेही दर्शन घडते. पियुष गजभिये याने अनुसूचित जाती प्रवर्गातून ८१.८३ टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश मिळवले, तर अदिती कुकडे हिने दिव्यांग प्रवर्गातून ६८.६७ टक्के गुण मिळवत कला शाखेत प्रथम क्रमांक मिळवला.

महाविद्यालयाच्या या यशाबद्दल भारतीय विद्या मंदिर संस्थेच्या अध्यक्षा तथा प्राचार्या डॉ. आराधना वैद्य यांनी अभिनंदन केले.यावेळी प्राचार्यांनी कला शाखेच्या प्रा. लता वैद्य, विज्ञान शाखेच्या प्रा. रुपाली भागवतकर आणि वाणिज्य शाखेचे डॉ. सुशील गावंडे यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. तसेच प्रा.रुपाली माहोरे, प्रा.स्वप्निल वानखडे, प्रा. प्रियंका भांगे,प्रा. नेहा वर्मा, प्रा. अंकिता नाहे, प्रा. दीक्षा मेश्राम, प्रा. हेमंत बेलोकार, प्रा. संतोष घासले, प्रा. सविता खोत व प्रा. राजेश्री धलवार आदी प्राध्यापकांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहम्मद जहीर ताहेर ज्युनियर कॉलेजचे यश

**अमरावती/का.प्र.**

करजगाव येथे स्थित शरीफाबी उर्दू हायस्कूल आणि मोहम्मद जहीर ताहेर ज्युनियर कॉलेज येथे विज्ञान, कला, वाणिज्य आणि एमसीव्हीसी अभ्यासक्रम उर्दू माध्यमातून शिकवले जातात. येथील विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियानांतर्गत १२वीच्या बोर्ड परीक्षेत उत्कृष्ट यश मिळवून शाळेला गौरव मिळवून दिला आहे. विज्ञान विभागाचा उत्तीर्णतेचा टक्का ९७.६७ टक्के होता, ज्यात मोहम्मद फातिम अक्रम आणि मोहम्मद मुश्ताक यांनी ७४.३३ टक्के गुणांसह अव्वल स्थान पटकावले. मिस्बा कौसर अब्दुल आसिफने ७०.५० टक्के, तर आवेश ताजिन मुजफ्फर खानने ६८.०० टक्के गुण मिळवले. कला विभागाचा उत्तीर्णतेचा टक्का ७२.४१ टक्के होता, ज्यात लैबा फिरदौस अब्दुल सत्तारने ६८.३३ टक्के, तर सादिया फिरदौस शेख अहमदने ६१.५० टक्के गुण मिळवले. वाणिज्य विभाग उर्दू माध्यमातून शिकवला जातो. नाझीव अर्सलान जावेद इक्बाल याने ७४.६७ टक्के, तन्झिला महेक सय्यद शकील ६६.८३ टक्के आणि मोहम्मद उजेर अब्दुल रौफ ६५.१७ टक्के गुण मिळवून तिसरी क्रमांक पटकावली. एचएससी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली असून, हुशार विद्यार्थी उरूज फातेमा मोहम्मद इद्रिस (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) हिने ६४.५० टक्के, उवैस अहमद तनवीर अहमद (इलेक्ट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी) याने ६२.१७ टक्के आणि अर्शिया साहेर शम्सुद्दीन (ऑटोमोबाईल टेक्नॉलॉजी) हिने ६१.१७ टक्के गुण मिळवले आहेत. एमसीव्हीसीचा निकाल ६७.६४ टक्के लागला.प्राचार्य मोहम्मद मुदस्सिर मोहम्मद जहीर ताहेर, पर्यवेक्षक मोहम्मद मुमताजुद्दीन इनामदार सर आणि सर्व शिक्षकवृंदाने गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन केले.

# जाधव गुरुजींची शिक्षण सेवा,समर्पण आणि कार्य प्रेरणादायी- जितेंद्रनाथ महाराज

## अमृत महोत्सव व नागरी सत्कार सोहळा

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

आयुष्यभर शिक्षण, संस्कार, समाजसेवा आणि अध्यात्म या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य लक्ष्मणराव जाधव गुरुजींनी केले आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना घडवण्यासाठी आपल्या अंगीभुत असलेल्या अनेक कौशल्याचा वापर करत साभिनय पद्धतीने शिक्षण देण्यावर भर दिल्यामुळे ते विद्यार्थीप्रिय व आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक झाले. नाटक, वक्तृत्व, लेखन, पत्रकारिता अशा विविधांगी पैलूंच्या माध्यमातून त्यांनी समाजातील अनेकांना योग्य दिशा देत सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी योगदान दिले आहे. जाधव गुरुजींचे साधेपण, विनम्रता आणि लोकांप्रती असलेला जिव्हाळा हा प्रत्येकासाठी आदर्श आहे. त्यांची सेवा, समर्पण आणि सत्कर्म यातून त्यांनी आपल्या कर्तृत्वाने समाजात मानाचे स्थान मिळवले असे प्रतिपादन श्रीनाथपीठाधीश्वर स्वामी श्री जितेंद्रनाथ महाराज यांनी केले.



ते लक्ष्मणराव जाधव गुरुजी यांच्या अमृत महोत्सव व नागरी सत्कार सोहळ्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या सोहळ्याचे अध्यक्षस्थानी श्री संत सचिन देव महाराज होते तर प्रमुख अतिथी म्हणून दैनिक मंडल चे संपादक अनिल अग्रवाल, ह.भ.प. वासुदेव महाराज महल्ले. अध्यक्ष, संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, अकोट, तसेच सत्कारमूर्ती लक्ष्मणराव जाधव गुरुजी व शुभदा लक्ष्मणराव जाधव हे व्यासपीठावर उपस्थित होते.अनिल अग्रवाल यांनी मनोगतात सांगितले की, समाजात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही संस्कृती जपली पाहिजे. जाधव गुरुजींसारख्या व्यक्तींमुळे समाजातील सकारात्मकता वाढते. त्यांच्या कार्याचा आदर्श तरुण पिढीने नक्की घ्यावा व निकोप आयुष्य बनवावे.आपल्या अध्यक्षीय भाषणात संत सचिन देव महाराज यांनी जाधव गुरुजींच्या कार्याचा गौरव करत व्यक्ती ही आपल्या कार्यानेच मोठी होत असते असे आवर्जून सांगितले.याप्रसंगी आदर्श शिक्षक म्हणून अनेक पुरस्कार प्राप्त करणाऱ्या लक्ष्मण जाधव गुरुजींचा सचिन देव महाराज व जितेंद्रनाथ महाराज यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व मानपत्र देऊन सपत्निक सत्कार करण्यात आला. मानपत्राचे लेखन श्रीमती कोकिळाबाई गावंडे महिला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. हरिदास आखरे यांनी केले, तर मानपत्राचे वाचन प्रा. डॉ. सुशील गावंडे यांनी केले.याप्रसंगी जाधव गुरुजींवर लिहिण्यात आलेल्या अमृतमयी जाधव गुरुजी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या पुस्तकामध्ये अनेक मान्यवरांनी लिहिलेल्या लेखातून जाधव गुरुजींच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला. या पुस्तकाचे संपादन प्रा.डॉ. नरेंद्र माने, प्रा.डॉ. हरिदास आखरे , प्रा. डॉ. रणजीत गणोदे, प्रा.डॉ. सुशील गावंडे व प्रा.विद्या जाधव यांनी केले. याप्रसंगी जाधव गुरुजींच्या जीवन प्रवासावर चित्रपट दिग्दर्शक निलेश जळमकर तथा गौरव जाधव यांनी तयार केलेल्या दोन चित्रफिती दाखवण्यात आल्यात. संचालन प्रा. डॉ. नरेंद्र माने आभार ॲड.सदानंद जाधव यांनी मानले. प्रास्ताविक प्रा.डॉ. रणजीत गणोदे यांनी मानले. नागरी सत्कार समिती तथा ॲड.सदानंद जाधव, गौरव जाधव व आप्तेष्ट यांनी केले होते.

# विद्यापीठात उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्त व वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार

**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा त्रेचाळीसावा वर्धापन दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२६ व वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ चे पुरस्कार कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. हेमंत देशमुख, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.वैशाली गुडधे, मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.मोना चिमोटे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.



**उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार**

उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व १०० ग्रॅम चांदीचे पदक देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात उत्कृष्ट शैक्षणिक कार्याबद्दल इंदिरा महाविद्यालय, कळंबचे प्राचार्य डॉ. पवन मांडवकर यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार येथील प्राध्यापक तथा रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. नंदकिशोर गव्हाळे व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील प्राध्यापक तथा प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. जयश्री दिपक धोटे यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या गृहविज्ञान विभागातील प्राध्यापक डॉ. संयोगिता विलास देशमुख यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात परीक्षा विभागातील सहा. कुलसचिव मिलींद देशपांडे व महाविद्यालयीन विभागातील सहा. कुलसचिव डॉ. साक्षी ठाकूर यांचा, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात आस्थापना विभागातील अधीक्षक श्री अमोल अशोकराव म्हैसाळकर व परीक्षा विभागातील अधीक्षक सौ. स्मिता अमोल म्हैसाळकर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात वित्त विभागातील वरीष्ठ सहाय्यक संजय गुलाबराव कोकाटे व ज्ञानस्रोत केंद्रातील ग्रंथालय सहाय्यक ज्योती सुकराम गेडाम यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सामान्य प्रशासन विभागातील चौकीदार मोरश्वर मुंजाळे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय, अमरावती येथील अधीक्षक प्रशांत केशवराव देशमुख यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, जि. अमरावती या महाविद्यालयाची 'एन.ई.पी. स्कूल कनेक्ट' या वार्षिकांकाकरीता महाविद्यालयाचा रु. ५००१/- रोख पारितोषिक व प्रशस्ती प्रमाणपत्र देवून कुलगुरूंनी सत्कार केला.

**वार्षिकांक स्पर्धा**

वार्षिकांक स्पर्धा २०२४-२५ मधील विजेत्या महाविद्यालयांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे हस्ते पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये शहरी विभागातील बिगर व्यावसायिक गटातून प्रथम पारितोषिक श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'क्रिएशन' या वार्षिकांकास, व्दितीय डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रज्ञासूर्य' या वार्षिकांकास, तर तृतीय भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, तर ग्रामीण विभागात बिगर व्यावसायिक गटात प्रथम इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' व कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरबच्या 'अंतरंग' या वार्षिकांकास, द्वितीय गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' या वार्षिकांकास, तर तृतीय आदर्श विज्ञान, जयरामदास भागचंद कला व बिर्ला महाविद्यालय, धामणगांव रेल्वेच्या 'गुलमोहोर' या वार्षिकांकास आणि शहरी व ग्रामीण विभागातील व्यावसायिक गटात प्रथम पी.आर.पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीच्या 'पोटेन्शिअल' या वार्षिकांकास, द्वितीय डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, घातखेड, अमरावतीच्या 'टेक्नो-रिदम' या वार्षिकांकास, तर तृतीय प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नो-स्ट्रीम' या वार्षिकांकास पारितोषिक व स्मृतिचिन्ह देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विजेत्या महाविद्यालयांच्या प्राचार्यांना व त्यांच्या प्रतिनिधींना गौरवान्वित केले.

## संक्षिप्त

### बुद्ध जयंती उत्साहात



**अंजनगाव बारी-**पार्डी (देवी) येथे तथागत गौतम बुद्ध, धम्मनायक सम्राट अशोक, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती महोत्सवाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन भंते सारीपुत्त यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी संतोष परांजपे, चंद्रशेखर चतुर आणि मधुकर ढेंबरे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.इंजि.पवन महाराज दवंडे यांच्या सप्तखंजिरी वादनासह समाजप्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.'कोण महाराज' यांनी दिलेल्या प्रेरणादायी बोधविचारांनी उपस्थित श्रोते मंत्रमुग्ध झाले.प्रास्ताविक संघपाल सरदार संचालन मिलिंद वाहणे यांनी तर आभारप्रदर्शन अमर सोनोने यांनी केले.दुसऱ्या दिवशी ध्वजारोहण करून कार्यक्रमास सुरुवात झाली.दोन दिवसीय कार्यक्रमाला सर्व उपासक–उपासिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावली.

### यश खंडारेचा सत्कार



**अमरावती-**अचलपूर तालुक्यातील गौरखेडा कुभी येथील दामोदर खंडारे यांचा मुलगा यश खंडारे यांची बैंक आफ बडोदा संलग्नीत क्षेत्रीय ग्रामीण बैंक मध्य प्रदेश विभाग येथे प्रोबेशनरी आफिसर या पदावर निवड झाल्याबद्दल त्याच्या निवासस्थानी जाऊन राष्ट्रीय चर्मकार महासंघातर्फे सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक प्रा.डॉ.नंदकिशोर खंडारे संचालन व आभार अविनाश खंडारे यांनी केले.यावेळी जिल्हा सचिव पांडुरंग गोंडेकर,जेष्ठ समाजसेवक पद्माकर खंडारे, रमेश खंडारे, संजय येवतकर , दिलीप तायडे, भास्कर खंडारे, दिलीप इंगळे, दिपक खंडारे, गजानन सावळे, राहुल चंदन, पुष्पक आंबीलकर, प्रमोद वनस्कर आदिसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वेदांतपाल मुंदाने सन्मानित



**अमरावती-**महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाज प्रबोधनकार तथा सप्त खंजरीचेजनक महाराष्ट्र भुषण सत्यपाल महाराजांचे शिष्य समाजप्रबोधनकार वेदांतपाल मुंदाने यांना १मे २०२६ ला महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून अमरावती येथील पोलीस मुख्यालय परेड मैदान येथे आयोजीत मुख्य शासकीय समारोहामध्ये महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य , जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अमरावती यांचे वतीने जिल्हा युवा पुरस्कार २०२५ -२६ सहकारमंत्री बाबासाहेब पाटील व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.जिल्हाधिकारी आशिष येरेकर , पोलीस आयुक्त राकेश ओला, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी , जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद , जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव , आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये त्यांना स्मृतिचिन्ह सन्मानपत्र व दहा हजार रुपये चा धनादेश देण्यात आला. या पुरस्कार सोहळ्याला उद्योजक संतोषजी गांधी , भाजपा संत गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष छोटू उर्फ अभिजीत वानखडे , प्रतीक गारपवार ,प्रथमेश वाघ, आदि उपस्थित होते.

### सर्वज्ञ फाउंडेशनच्या पाणपोईला ५० दिवस पूर्ण



**अमरावती-** शहरातील सर्वज्ञ फाउंडेशन रोटी बँक तर्फे गांधी चौक येथे मार्च महिन्यात सुरू करण्यात आलेल्या मोफत पाणपोई उपक्रमाला आज ५० दिवस यशस्वीरित्या पूर्ण झाले. कडक उन्हाळ्यात तहानलेल्यांसाठी थंड पाण्याची सोय करणाऱ्या या पाणपोईमुळे दररोज ३०० हून अधिक प्रवासी, मजूर, रिक्षाचालक व विद्यार्थी लाभ घेत आहेत. प्रेरणास्थान स्व. रमेशराव पावडे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ व सर्वज्ञ फाउंडेशन आधारस्तंभ श्रीमती पुष्पलता रमेशराव पावडे यांच्या व सर्व मदत करणाऱ्यांच्या आशीर्वादाने व संत गाडगेबाबांच्या विचाराने प्रेरित होऊन सर्वज्ञ फाउंडेशनने 'रोटी बँक' व 'धान्य बँक' नंतर दरवर्षी उन्हाळ्यामध्ये हा उन्हाळा पानपोई सेवाभावी उपक्रम सुरू केला आहे. गेल्या ५० दिवसांपासून अखंड सेवा देत आहेत. आणि पुढे पण नेहमीच सुरू राहील. उपक्रमामध्ये सहकार्य करणारे दानवीर पुष्पलता पावडे,शिला भेंडे, चित्रा खोब्रागडे ( सौ रामटेके ) माधुरी चव्हाण,संजीवनी काळे,रेखा चिंचे,पुरुषोत्तम मुंदडा,महेंद्र देशमुख, अमोल औरंगपुरे, नरेंद्र तायडे,भुरेलाल बेढेकर अनेक ज्ञात-अज्ञात दानवीरांनी मदत करून यांच्यामुळे ५० दिवस पूर्ण झाले त्यांनी प्रत्यक्ष सहकार्य केले

# ‘ब्रँड ममता’ चे भवितव्य काय?

**पश्चिम बंगालमध्ये तब्बल १५ वर्षांच्या सत्तेनंतर ‘दीदी’ना पराभवाचा सामना करावा लागला आहे. सिंगूर आंदोलनापासून ते २०२६ च्या आर.जी. कार प्रकरणापर्यंत, ममतांचा प्रवास चढ-उतारांनी भरलेला राहिला. भ्रष्टाचार, घराणेशाहीचे आरोप आणि महिला सुरक्षेचा कळीचा ठरलेला मुद्दा यामुळे बंगालमध्ये सत्तांतर झाले. या ऐतिहासिक पराभवाचे सविस्तर विश्लेषण.**

### १५ वर्षांच्या सत्तेला सुरुंग

पश्चिम बंगालच्या राजकारणात ममता बॅनर्जी यांचा पराभव हा केवळ एका निवडणुकीचा निकाल नाही; तो एका दीर्घ, संघर्षमय आणि वादळी राजकीय प्रवासातील सर्वात निर्णायक वळण ठरले आहे. तब्बल १५ वर्षांच्या सत्तेनंतर ‘ममतादीदी’ पराभवाच्या गर्तेत सापडलेल्या दिसतात. पण ममता बॅनर्जी यांना या पराभवाच्या क्षणांत नव्हे, तर त्यांच्या लढण्याच्या वृत्तीतून समजून घ्यावे लागते.

### कारच्या बोनटवर उभी राहणारी मुलगी

१९७० च्या दशकात, आणीबाणीविरोधी आंदोलनाच्या काळात, एक तरुणी कोलकात्यातील रस्त्यावर गोंधळात अचानक एका कारच्या बोनटवर चढली. ती कार होती Jayaprakash Narayan यांची. त्या क्षणाने ममतांच्या राजकीय आयुष्याचा सूर ठरवला. व्यवस्थेविरुद्ध उभे राहण्याची हिंमत दाखविणारी तरुण राजकीय नेता म्हणून ती पुढे आली. हा प्रसंग फक्त धाडसाचा नव्हता; तो ‘स्टेज’ ओळखण्याच्या त्यांच्या नैसर्गिक क्षमतेचा दाखला होता. गर्दी कुठे आहे, नेमका क्षण कोणता आणि त्याला वेगळा प्रतिकात्मक अर्थ कसा द्यायचा, हे ममतांना तेव्हाच उमगले होते.

### न्यायालयही राजकीय मंचच

त्यानंतर कित्येक वर्षांनी अगदी अलीकडे २०२६ च्या फेब्रुवारी महिन्यांत मुख्यमंत्री असताना, ममता सर्वोच्च न्यायालयात उभ्या राहून स्वतः युक्तिवाद करताना दिसल्या. साधी पांढरी हातमागाची साडी, पायात हवाई चप्पल आणि थेट सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींच्या दिशेने केलेला प्रश्न ‘इतकी घाई कशासाठी?’ राजकारणात फार कमी नेते असे आहेत जे न्यायालयाला देखील ‘राजकीय मंचा’मध्ये रूपांतरित करण्याची क्षमता राखतात. ममतांसाठी तो मंच महत्त्वाचा नसतो; कारण महत्त्वाचा असतो तो ‘संघर्षाचा क्षण’.

### हजरा मोर्चा: जखमेतून घडलेली प्रतिमा

१९९० मध्ये हजरा येथे डाव्या आघाडीविरोधातील आंदोलनात ममता गंभीर जखमी झाल्या. डोक्यावर पट्टी बांधलेली, रक्ताळलेली ती प्रतिमा संपूर्ण बंगालमध्ये गाजली होती. हा प्रसंग त्यांच्या राजकीय ब्रँडिंगचा कणा ठरला पीडित पण न झुकणारी नेता. ती प्रतिमा इतकी प्रभावी होती की, पुढील तीन दशकांत त्यांनी सत्ता असो वा विरोधात, स्वतःला ‘लढणारी’ नेता म्हणूनच त्यांनी सादर केले.






### बंडखोरीचे संस्थाकरण

१९९७ मध्ये Indian National Congress सोडून त्यांनी All India Trinamool Congress ची स्थापना केली.हा निर्णय केवळ राजकीय नव्हता; तो ‘स्वतंत्र ओळख’ निर्माण करण्याचा प्रयत्न होता. एक कमी चर्चेतला किस्सा म्हणजे, तृणमूलच्या सुरुवातीच्या काळात, निधीअभावी अनेक सभा रद्द होण्याच्या मार्गावर होत्या. ममतांनी स्वतःच्या चित्रांची विक्री करून पैसे उभे केले, असे त्यांच्या सहकाऱ्यांचे म्हणणे आहे. हा तपशील त्यांच्या ‘साधेपणाच्या’ प्रतिमेला अधिक बळ देणारा ठरला.

### सिंगूरचे उपोषण

सिंगूरमध्ये जमीन अधिग्रहणा विरोधातील २५ दिवसांच्या उपोषणाने ममतांना केवळ ‘आंदोलक’ नव्हे तर ‘लोकनेता’ ठरवले. हा फक्त धोरणात्मक विरोध नव्हता; तर त्यात भावनिक गुंतवणूकही होती. तिथे उपस्थित असलेल्या एका सरकारी अधिकाऱ्याने दिलेल्या मुलाखतीत



सांगितले होते की, उपोषणादरम्यान एका शेतकऱ्याच्या कुटुंबाने त्यांना घरगुती जेवण आणले. त्यांनी ते नाकारले, पण त्या कुटुंबाशी अर्धा तास संवाद साधला. ही संवादाची पद्धत, व्यक्तिगत संवाद हा त्यांच्या राजकारणाचा मुख्य घटक राहिला आहे.

### सत्ता मिळाल्यानंतरही ‘रस्त्यावर’

२०११ मध्ये West Bengal मध्ये सत्ता मिळाल्यानंतरही ममता बदलल्या नाहीत, किमान त्यांच्या प्रतिमेच्या पातळीवर तरी. त्या अजूनही रस्त्यावर उतरतात, मोर्चे काढतात, घोषणाबाजी करतात. RG Kar प्रकरणानंतर, स्वतः मुख्यमंत्री असूनही, त्या आंदोलनात सहभागी झाल्या. (अर्थात या प्रकरणानंतर महिला सुरक्षेचा मुद्दा खूप वेगात पुढे आला आणि आजही निवडणूक निकालांमध्ये तोच महत्त्वाचा ठरला आहे, अशी राजकीय निरिक्षकांची अटकळ आहे.) हा विरोधाभास सत्तेत असूनही विरोधकाची भूमिका हे ममतांच्या राजकारणाचे वैशिष्ट्य होते.

### निर्णयक्षमता की उतावळेपणा?

ममता जलद निर्णय घेण्यासाठी ओळखल्या जातात.रस्त्यावर अनवाणी मुलांना पाहून त्यांनी तात्काळ विद्यार्थ्यांना चप्पल वाटप योजना सुरू करण्याचा आदेश दिला होता, पण हीच शैली कधी अडथळा ठरते. राज्य नागरी सेवेतील सुधारणा प्रकल्प त्यांनी अचानक थांबवला आणि त्यानंतर तो पुन्हा सुरू झालाच नाही.त्यांच्या निर्णयप्रक्रियेत ‘भावना’ आणि ‘प्रेरणा’ यांचा मोठा वाटा असतो. हेच दोन मुद्दे त्यांच्या राजकारणाची ताकद आणि मर्यादा ठरले.

### ‘दीदी’ची खासगी दुनिया

ममतांचे कालीघाटमधील घर हे साधेसेच आहे. ना सत्तेचा देखावा, ना वैभवाचा ठसा.त्या स्वतः कालीपूजे साठी प्रसाद तयार करतात, ही माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून वारंवार सांगितली जाते. ही ‘साधेपणा’ची प्रतिमा त्यांच्या राजकीय भांडवलाचा महत्त्वाचा भाग आहे.पण यामागे एक वेगळा पैलूही आहे, तो म्हणजे त्या लोकांशी थेट संपर्क ठेवतात, वैयक्तिक फोनद्वारेही संपर्क राखतात. ही शैली अनेकदा त्यांची मर्यादा ठरते, असे विश्लेषकांना वाटते.

### सत्ता आणि वाद

ममतांच्या कारकिर्दीवर अनेक गैरव्यवहारांची सावली आहे, शारदा, शिक्षक भरती, रेशन Enforcement Directorate च्या छाप्यांदरम्यान त्यांनी थेट हस्तक्षेप केल्याचे प्रसंगही घडले.एका छाप्यात त्यांनी स्वतः फाईल आणि लॅपटॉप घेऊन बाहेर येत, ‘मी हे वाचवले, भाजपाला आमची उमेदवार यादी हवी होती. पण मी हे ताब्यात घेतले आहे’ असे त्यांनी जाहीर केले.हा प्रसंग त्यांच्या शैलीचे उत्तम उदाहरण ठरतो, त्या प्रशासनालाच भीडतात.

### भाचा आणि पक्ष

Abhishek Banerjee यांना पुढे आणण्याचा निर्णय हा पक्षातील पिढीबदलाचा प्रयत्न मानला जातो.पण यामुळे जुने नेते नाराज झाले आणि काहींनी पक्ष सोडला.हा निर्णय ममतांच्या दीर्घकालीन रणनीतीचा भाग असू शकतो, त्यामुळे पक्षातील एकसंधता ढासळली.

### आयुष्यातील सर्वात मोठी लढाई

आजचा पराभव हा ममतांसाठी केवळ सत्तेचा गमावलेला क्षण नाही;तर तो त्यांच्या संपूर्ण राजकीय मॉडेलवर प्रश्नचिन्ह उभे करणारा ठरला आहे.त्यांनी प्रत्येक निवडणुकीत ‘बंगाल विरुद्ध दिल्ली’ अशी मांडणी केली.पण यावेळी मतदारांनी कदाचित वेगळा प्रश्न विचारला तो म्हणजे सत्तेतील १५ वर्षांचा हिशेब काय?

### पराभवातही लढणारी

ममता बॅनर्जी या जिंकल्या तरी लढतात आणि हरल्या तरीही.त्यांची खरी ताकद सत्तेत नाही; तर ती संघर्षात आहे.

आता प्रश्न असा की, त्या पुन्हा एकदा ‘रस्त्यावरची नेता’ होणार का, की सत्तेच्या पराभवाने त्यांची राजकीय ऊर्जा कमी होईल?इतिहास सांगतो की, कारच्या बोनटवर उभी राहणारी ती तरुणी अजून संपलेली नाही.

**विनायक परब**

# सत्ताविरोधी लाट

तमिळनाडूत एम जी रामचंद्रन, जयललिता तसेच करुणानिधी अशा चित्रपट क्षेत्राशी संबंधितांनी राजकारणावर प्रभुत्व गाजवले. आता त्याच मालिकेत विजय यांचा समावेश झाला आहे.

तमिळनाडूच्या राजकारणात चित्रपट कलावतांचे प्रस्थ नेहमीच राहिले आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत जोसेफ विजय चंद्रशेखर या ५१ वर्षीय अभिनेत्याने असाच पराक्रम करून दाखविला. टीव्हीके या पक्षाची स्थापना केल्यानंतर केवळ दोन वर्षांत राज्यातील दोन प्रादेशिक पक्षांना मागे टाकत सत्तेचे सोपान चढून त्यांनी विक्रम केला. त्यातही स्टॅलिन यांच्यासारख्या तगड्या राजकारण्याला दिलेली मात विशेष उल्लेखनीय ठरली.

### तरुण, महिलांची मते निर्णायक

विजयच्या समर्थकांनी २००९ मध्ये फॅन क्लब करत राजकारणात पदार्पण करण्याच्या दृष्टीने एक पाऊल टाकले होते. सुरुवातीला त्यांनी अण्णा द्रमुकला पाठिंबा दिला होता. मात्र २०२१ मध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढत द्रमुक-अण्णा द्रमुकच्या लढतीत तिसरा पर्याय निर्माण केला. मात्र तीन वर्षांतच मोठी झेप घेत दक्षिणेतील राज्यात सत्ता आणली. तरुण तसेच महिलांचा मोठा पाठिंबा विजय यांना मिळाला. विशेषत: १८ ते ४५ वयोगटातील ६० टक्क्याच्या आसपास मते टीव्हीकेला मिळाली. एकूण मतदारांमध्ये ४० टक्के हा वर्ग आहे. महिलांची मोठ्या प्रमाणात मतेही या पक्षाला मिळाली. त्यामुळे त्यांनी मोठा विजय मिळवला. ४० ते ६० वयोगटातही त्यांना बऱ्यापैकी समर्थन मिळाले.

### द्रमुकचा गड कोसळला



चेन्नई शहर आणि परिसरातील २९ जागा या द्रमुकचा अभेद्य बालेकिल्ला मानल्या जात होत्या. मात्र यंदा विजय यांनी त्यातील २६ जागांवर यश मिळवत द्रमुकला मोठा धक्का दिला. सत्ता नसतानाही यापूर्वी चेन्नई शहर परिसरात द्रमुकला यश मिळत होते. मात्र यंदा ती परंपरा खंडित झाली, ती विजय यांच्या अभूतपूर्व यशाने. दुसरीकडे राज्याचा पश्चिम भाग कोंगुनाडू पट्टा म्हणून ओळखला जातो. हा अण्णा द्रमुकचे प्रभावक्षेत्र मानले जाते. तेथेही टीव्हीकेने अण्णा द्रमुकला रोखले. किनारपट्टी भागातही टीव्हीकेला यश मिळाले. अल्पसंख्याक बहुल जागांवरही त्यांना विजय मिळाला. द्रमुकने सर्व समाजघटकांना एकत्र करून व्यापक आघाडी तयार केली होती. मात्र अल्पसंख्याक मते द्रमुकला यावेळी राखता आली नाहीत. राज्यात द्रमुक, अण्णा द्रमुकच्या तुलनेत गावपातळीवर संघटन नसतानाही विजय यांचे हे यश महत्त्वाचे आहे.

### सत्ताविरोधी लाट

तमिळनाडूत दर पाच वर्षांनी सत्तांतरांची परंपराच आहे. कधी द्रमुक तर कधी अण्णा द्रमुक हे चक्र गेली सहा दशके सुरू आहे. यंदा सत्तांतर झाले पण राजकारणात नवा खेळाडू आल्याने चमत्कार घडला. द्रमुकच्या राजवटीविरोधात नाराजी होती. पक्षाच्या कार्यकर्त्यांची दादागिरी सुरू असल्याच्या तक्रारी होत्या. त्यातच सरकारवर हिंदूविरोधी असल्याचा आरोप भाजपने केला होता. द्रमुकने भाषेचा मुद्दा असेल किंवा निधीच्या मुद्द्यावर केंद्र सरकारविरोधात प्रखर भूमिका घेतली होती. मात्र राज्यातील जनतेने त्यांना साथ दिली नाही. राज्यातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या अण्णा द्रमुकलाही त्याचा लाभ झाला नाही. विजय यांच्या टीव्हीकेची शिट्टी जोरदार वाजली. त्यांची खूण शिट्टी आहे.

### आंध्र पारूपाची पुनरावृत्ती

एन.टी.रामराव यांनी आपल्या चित्रपटातील करिष्म्याच्या जोरावर १९८३ मध्ये आंध्र प्रदेशात काँग्रेसला पराभूत विधानसभा निवडणुकीत प्रचंड विजय मिळवला होता. तेलुगु देशम स्थापन केल्यावर वर्षभरातच त्यांनी हे यश मिळवले होते. स्थानिक अस्मितेशी या यशाला जोडले गेले होते. विजय यांनी त्याचीच पुनरावृत्ती केली, फरक इतकाच की विजय यांनी राज्यातील दोन तगड्या प्रादेशिक पक्षांना नमवत ही किमया साध्य केली. विजय यांचे बरेचसे उमेदवार राजकारणाबाहेरचे होते. तरीही विजय यांच्या नावावर मतदारांनी कौल दिला. विजय यांच्या सभांना अभूतपूर्व गर्दी होत होती. त्यामुळे त्यांच्याशी आघाडी करावी असा काँग्रेसमधील एका गटाचा आग्रह होता. मात्र राष्ट्रीय राजकारण पाहून काँग्रेस नेतृत्त्वाने द्रमुकबरोबर जाणे पसंत केले. तमिळनाडूत एम जी रामचंद्रन, जयललिता तसेच करुणानिधी अशा चित्रपट क्षेत्राशी संबंधितांनी राजकारणावर प्रभुत्व गाजवले. आता त्याच मालिकेत विजय यांचा समावेश झाला आहे. पक्ष संघटनेचे व्यापक जाळे नसतानाही चित्रपट पडद्यावरी करिष्म्याच्या जोरावर सत्ता खेचून आणता येते हे विजय यांच्या यशाने दाखवून दिले.

**हृषीकेश देशपांडे**

## बाप

येता मिरगाच्या सरी, बाप तिफन धरते
वटी बांधून पोटाले, माय सरतं भरते....

पोट फाडून मातीचं, बाप बिया थ्या पेरते
पानी ढगाले मांगून, पिकं असं लह्यरते...

ढग दिसेना डोयाले, बाप मनात झुरते
कसं सालं काढू देवा, सारी हिम्मत हारते...

वारा धून गारपीट, अवकानी असा येते
तोंडी आल्या घासाची,
सारी धुयधानी होते...

त्याच्या घामाले ना मोल,
काम शिवारी करते
चिल्ले पिल्ले जगासाठी,
धंदा घाट्याचा ठरते...

बाप जुगार खेयते, किती हाल थो सोसते
कधी हारते जितते, बाप जगाले पोसते.. .

**शंकर घोरसे,**
खापरखेडा

# नावीन्यपूर्णतेच्या युगाचा करा स्वीकार

**गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारीकपातीच्या बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. या परिवर्तनात अनेक नव्या संधी दडल्या आहेत.**

आजच्या काळात जग झपाट्याने बदलत आहे. तंत्रज्ञान, शिक्षण, करिअरच्या संधी आणि जीवनशैली या सर्व गोष्टींमध्ये मोठे परिवर्तन होत आहे. जग अशा एका टप्प्यावर उभे आहे, जिथे तंत्रज्ञान अभूतपूर्व वेगाने बदलत आहे. जागतिक माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा चेहरा-मोहरा पूर्णपणे बदलून गेला आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये ओरॅकल, ॲमेझॉन आणि मायक्रोसॉफ्ट यांसारख्या मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये झालेल्या कर्मचारी कपातीच्या (ले-ऑफ) बातम्यांनी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र, या घडामोडींकडे केवळ उद्योगाची घसरण म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. उलट, हे बदल आयटी उद्योगातील एका मोठ्या संक्रमणाचे आणि परिवर्तनाचे संकेत आहेत. एखादी मोठी कंपनी कर्मचारी कपात करते, तेव्हा सामान्यतः मंदीची भीती व्यक्त केली जाते. पण सध्याचे ले-ऑफ हे मंदीपेक्षा ‘बदलत्या प्राधान्यक्रमामुळे’ अधिक आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (स्वयंचलन) आणि क्लाउड कॉम्प्युटग यांसारख्या तंत्रज्ञानांमुळे कामाचे स्वरूप बदलत आहे. पूर्वी दहा लोकांची गरज असणारी कामे आता प्रगत सॉफ्टवेअरच्या मदतीने कमी वेळेत आणि अचूकपणे होऊ लागली आहेत. याचा अर्थ असा की, पारंपरिक कौशल्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची गरज कमी होत असून नवीन तंत्रज्ञान अवगत असलेल्या लोकांची मागणी वाढत आहे.

भारतीय आयटी क्षेत्र हे जगाचे पॉवरहाऊस म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात अनुभवायला मिळत असलेल्या ताज्या बदलांमुळे भारतीय आयटी उद्योग आकुंचन पावेल, अशी अनेकांना भीती वाटते; परंतु वास्तव याच्या उलट आहे. भारतीय आयटी क्षेत्र कमी होत नसून संक्रमित होत आहे. सायबर सिक्युरिटी, डेटा ?नालिटिक्स, मशीन लर्निंग आणि रोबोटिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. या क्षेत्रांसाठी केवळ पदवी पुरेशी नसून विशिष्ट कौशल्ये, विश्लेषणात्मक विचार आणि सतत शिकण्याची तयारी असणे आवश्यक आहे. स्वतःला या बदलांनुसार जुळवून घेणाऱ्या व्यावसायिकांसाठी भविष्यात संधींचे आकाश खुले आहे. त्यानुसार त्यांना परिस्थितीची जाणीव व्हायला हवी. भारतातील पुणे, बंगळूरु आणि हैदराबादसारखी शहरे आता जागतिक स्तरावर ‘इनोव्हेशन हब’ म्हणून नावारूपाला येत आहेत. विशेषतः पुण्यात ‘ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स’ (जीसीसी) मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पूर्वी ही केंद्रे केवळ बॅक-ऑफिस कामांसाठी वापरली जात होती, पण आता ती जागतिक कंपन्यांची धोरणात्मक संशोधन आणि विकास केंद्रे बनली आहेत. याचा अर्थ असा की, भारतीय प्रतिभा आता मायदेशात राहूनच जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञानावर काम करत आहेत. ही केंद्रे केवळ सेवा देणारी नसून जागतिक स्तरावर नावीन्यपूर्ण शोध लावणारी केंद्रे बनली आहेत.

या बदलाच्या काळात आयटी विद्यार्थी आणि व्यावसायिकांसाठी असलेला एक महत्त्वाचा संदेश म्हणजे अनुकूलता हीच यशाची गुरुकिल्ली आहे. पूर्वी एकदा पदवी घेतली की, आयुष्यभर त्या जोरावर नोकरी करता येत असे, पण आता ती परिस्थिती राहिलेली नाही. तंत्रज्ञान इतक्या वेगाने बदलत आहे की, दर दोन-तीन वर्षांनी तुम्हाला नवीन काही तरी शिकावेच लागेल. सतत शिकणे, नवीन कौशल्ये आत्मसात करणे आणि तांत्रिक प्रगतीशी अपडेट राहणे, हे आता करिअरमधील यशाचे मूलभूत मंत्र बनले आहेत. ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्म्स, इंडस्ट्री सर्टिफिकेशन आणि प्रत्यक्ष प्रकल्पांवरील कामाचा अनुभव आता नोकरीच्या बाजारपेठेत तुमची किंमत ठरवत आहेत. ती ओळखून आपल्या कौशल्यांमध्ये बदल करत राहणे गरजेचे आहे, हे माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या नव्या पिढीला कळणे आवश्यक आहे. यापुढील काळात फक्त विद्यार्थ्यांनीच बदलून चालणार नाही, तर आपल्या शैक्षणिक संस्थांनाही काळानुसार बदलावे लागेल. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ आणि धोरणकर्ते यांनी एकत्र येऊन ‘कौशल्य दरी’ भरून काढण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज करणारे अभ्यासक्रम तयार केले पाहिजेत. कल्पकता वाढवणे, उद्योजकता जोपासणे आणि डिजिटल साक्षरतेमध्ये गुंतवणूक करणे यामुळेच भारताची जागतिक स्पर्धात्मकता टिकून राहील.



प्रत्येक क्षेत्रात वेगाने वाढत असलेली कृत्रिम बुद्धिमत्ता नोकऱ्या हिरावून घेईल, अशी भीती अनेकांना वाटते. पण इतिहास साक्षी आहे की, जेव्हा जेव्हा नवीन तंत्रज्ञान आले, तेव्हा सुरुवातीला काही नोकऱ्या गेल्या; पण त्यापेक्षा कैक पटींनी नवीन नोकऱ्या निर्माण झाल्या. संगणक आले तेव्हाही अशीच भीती होती, पण संगणकामुळे आज आयटी क्षेत्रात लाखो लोकांना रोजगार मिळाला आहे. एआय हे मानवाचे रिप्लेसमेंट नसून मानवाची क्षमता वाढवणारे एक साधन आहे. एआयचा प्रभावी वापर करायला शिकतील तेच भविष्यातील कामाच्या ठिकाणी सर्वात मौल्यवान असतील. भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व आणखी वाढणार, हे निश्चित आहे. महाराष्ट्रात या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. नवी संशोधन केंद्रे, नवउद्योग आणि शैक्षणिक संस्था या विषयावर भर देत आहेत. त्यांना अपेक्षित मनुष्यबळ आणि अस्तित्वात असणाऱ्या कार्यपद्धतीतील बदल लक्षात घेऊन आपल्या कामात बदल करणारे काळाची कसोटी पार करतील, तसेच बदलणाऱ्या अपेक्षांची पूर्तताही करतील. त्यामुळे येणाऱ्या काळात महाराष्ट्र या क्षेत्रात आघाडीवर राहील, अशी अपेक्षा आहे.

नव्या युगात टिकून राहण्यासाठी आणि प्रगती करण्यासाठी काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. यातील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे जिज्ञासू वृत्ती. नेहमी प्रश्न विचारा आणि नवीन गोष्टी शिकण्यासाठी उत्सुक राहा. या युगात तांत्रिक कौशल्ये आवश्यक आहेतच, पण त्याचबरोबर ‘सॉफ्ट स्किल्स’ ही तेवढीच महत्त्वाची आहेत. संवादकौशल्य, नेतृत्व आणि सांघिक कार्य या बाबी मशीन करू शकत नाहीत. त्यामुळे या कौशल्यांचे महत्त्व कधीच कमी होणार नाही. नवनवीन तंत्रज्ञान आणि कौशल्ये आत्मसात करताना प्रत्येकाने बदलांचा धैर्याने स्वीकार करायला हवा. ले-ऑफ किंवा बदलांना न घाबरता संधी म्हणून पाहायला हवे.

थोडक्यात सांगायचे तर, आयटी क्षेत्राचा हा काळ नवनिर्माणाचा आहे. जुन्या पद्धती नष्ट होत आहेत आणि नव्या अधिक कार्यक्षम पद्धती जन्म घेत आहेत. बदल स्वीकारतील, स्वतःची कौशल्ये अद्ययावत करतील आणि तंत्रज्ञानाच्या प्रवाहाविरुद्ध न जाता त्या प्रवाहाचा भाग बनतील, अशा लोकांचे भविष्य उज्ज्वल आहे. भारत केवळ या बदलाचा साक्षीदार नसेल, तर या जागतिक डिजिटल क्रांतीचे नेतृत्व करेल. आपल्याला केवळ पदवीधर व्हायचे नाही, तर ‘कौशल्यवान’ आणि ‘डिजिटल साक्षर’ व्हायचे आहे. ले-ऑफच्या या वावटळीत ज्ञानाचा आणि कल्पकतेचा पाया मजबूत असलेल्यांची नौका नक्कीच सुरक्षित किनाऱ्याला लागेल.

शेवटी, हे लक्षात ठेवले पाहिजे की तंत्रज्ञान माणसाला पर्याय ठरू शकत नाही, तर ते माणसाला अधिक सक्षम करते. ले-ऑफची भीती बाळगण्यापेक्षा आपण आपल्या ज्ञानाची ‘बॅटरी’ सतत चार्ज ठेवली पाहिजे.

ही वेळ थांबण्याची नाही, तर अधिक वेगाने धावण्याची आहे. बदल स्वीकारण्याचे धाडस आणि सतत शिकण्याची तहान असलेल्यांसाठी हे ‘एआय’ आणि ‘क्लाउड’चे युग सुवर्णकाळ ठरेल. केवळ कपात नाही, तर बदलपरिवर्तन हाच निसर्गाचा नियम आहे आणि या परिवर्तनाशी जुळवून घेणाराच उद्याचा विजेता असेल. त्यामुळे नव्या युगाचे स्वागत करून तंत्रज्ञानाच्या अथांग महासागरात यशाची नवी नौका वल्हवू या.

# शहर विकासाला विरोध नाही ; पण जनतेच्या खिशावर डल्ला चालणार नाही

## आ. साजिद खान पठाण यांचा सत्ताधा-यांना इशारा

■ प्रतिनिधी | अकोला ■

*मनपात सत्ता स्थापन झाल्यानंतर शहरातील नागरिकांवर कचरा संकलनाच्या नावाखाली दरवर्षी ६०० रुपयांचा कर लादण्याचा निर्णय घेतला गेल्याने अकोलेकरांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. आधीच विविध करांच्या ओझ्याखाली दबलेल्या सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर हा नवा 'भुर्दंड' पडत असल्याने मनपाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.*



दरम्यान, कचरा कर वसुली सुरू असतानाच शहरातील घंटागाडी सेवा विस्कळीत झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर येत आहेत. अनेक भागांत घंटागाड्या वेळेवर न येणे, काही ठिकाणी पूर्णपणे सेवा बंद पडणे, तर काही भागांत कचऱ्याचे ढिग साचणे, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिकांच्या आरोग्यावरही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर आ. साजिद खान पठाण यांनी सत्ताधाऱ्यांवर जोरदार हल्लाबोल चढवत या निर्णयावर कडाडून टीका केली आहे. 'विकासाच्या नावाखाली जनतेची आर्थिक कोंडी करणे हा कोणत्याही परिस्थितीत योग्य मार्ग नाही. शहराच्या प्रगतीसाठी आम्ही सकारात्मक आहोत; मात्र करांच्या माध्यमातून नागरिकांची पिळवणूक करणे खपवून घेतले जाणार नाही,' असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

आधीच 'डर्टी टॅक्स'च्या नावाखाली नागरिक त्रस्त असताना त्यात आणखी ६०० रुपयांचा कचरा कर लादणे म्हणजे सामान्य माणसाच्या सहनशीलतेची परीक्षा घेणारा निर्णय असल्याचे त्यांनी नमूद केले. 'सत्ताधाऱ्यांनी विकासाच्या गोंडस नावाखाली आर्थिक भार टाकण्याऐवजी पर्यायी उत्पन्नाचे मार्ग शोधले पाहिजेत,' असा टोला त्यांनी लगावला. मनपाने शहरातील स्वतःच्या मालकीच्या मोक्याच्या जागांचा योग्य वापर करून महसूल वाढवावा, अशी ठोस भूमिका त्यांनी मांडली. मुख्य बाजारपेठेतील दानाबाजार परिसरात अत्याधुनिक शॉपिंग कॉम्प्लेक्स उभारून विद्यमान व्यापाऱ्यांना प्राधान्य देत सवलती द्याव्यात, तसेच इतर प्रमुख ठिकाणीही अशा प्रकल्पांची उभारणी करून मनपाचा आर्थिक पाया मजबूत करावा, अशी मागणी त्यांनी केली.

'शहर विकासाच्या प्रत्येक चांगल्या उपक्रमाला आमचा ठाम पाठिंबा राहील; मात्र जनतेच्या खिशावर डल्ला मारणारे निर्णय आम्ही कदापि सहन करणार नाही,' असा कडक इशारा देत आ. साजिद खान पठाण यांनी सत्ताधाऱ्यांना थेट आव्हान दिले. यावेळी मनपाचे विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसैन, कपिल रावदेव, नगरसेविका प्रिया अश्विन शिरसाट, आर्शिया परवीन मोहम्मद शारिक, निखत परवीन अफसर कुरेशी, निलोफर खान सोहेल खान, आकाश कवडे, गुड्डू पठाण, मोहम्मद शारिक यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## ...थोडक्यात...

### अकोटच्या गौरी झाडे भारतीय जेसीजच्या राष्ट्रीय प्रशिक्षक

**चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत उल्लेखनीय कामगिरी; जेसीआय अकोटच्या लौकिकात भर**



**अकोट :** आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्था जेसीआयच्या भारतीय शाखेतर्फे मुंबई येथे आयोजित 'नॅशनल ट्रेन द ट्रेनर्स सेमिनार' या चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत अकोटच्या गौरी नितीन झाडे यांनी उल्लेखनीय यश संपादन करत भारतीय जेसीजच्या राष्ट्रीय प्रशिक्षकपदाचा बहुमान मिळवला आहे. त्यांच्या या यशामुळे जेसीआय अकोट संस्थेच्या प्रतिष्ठेत मोठी भर पडली आहे.

राष्ट्रीय प्रशिक्षकांची निवड करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेत विविध निकषांवर सहभागींची कसून चाचणी घेण्यात आली. यामध्ये ज्ञान, प्रशिक्षण कौशल्य, व्यक्तिमत्त्व आणि मुलाखत या सर्व स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी करत गौरी झाडे यांनी अव्वल स्थान पटकावले.

गौरी झाडे या गेल्या काही वर्षांपासून जेसीआयच्या सक्रिय सदस्य असून त्यांनी यापूर्वी अंचल प्रशिक्षक म्हणूनही कार्य केले आहे. प्रशिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण अभ्यास, कौशल्यविकास आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी राष्ट्रीय प्रशिक्षक होण्याचे स्वप्न साकार केले. विशेष म्हणजे, जेसीआय अकोटच्या पहिल्या महिला राष्ट्रीय प्रशिक्षक होण्याचा मानही त्यांनी मिळवला आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गौरी झाडे या आस्की किड्स पब्लिक स्कूलचे संचालक नितीन झाडे व प्राचार्या वंदना झाडे यांच्या कन्या आहेत. आपल्या यशाचे श्रेय त्यांनी मिलिंद झाडे, अतुल भिरडे, कुटुंबीय तसेच जेसीआयच्या वरिष्ठ पदाधिकारी व सदस्यांना दिले.

### मालमत्ता कर आगाऊ भरा, सवलतीचा लाभ घ्या

**मनपा उपायुक्त विजय पारतवार यांचे आवाहन**

**अकोला :** शहरातील सर्व मालमत्ताधारकांनी चालू आर्थिक वर्ष २०२६–२७ साठी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकोला महानगरपालिकेचे उपायुक्त विजय पारतवार यांनी केले आहे. महानगरपालिका हद्दीतील मालमत्ताधारकांसाठी कराची मागणी देयके (बिले) तयार करण्याचे काम सुरू असून, ज्यांना अद्याप देयक मिळाले नाही त्यांनी पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण झोन कार्यालयातून ते प्राप्त करून घ्यावे, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

कर भरणा सुलभ करण्यासाठी महानगरपालिकेच्या akolamc.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच कर वसुली लिपीकांना घरोघरी जाऊन वसुलीसाठी टॅब व प्रिंटर देण्यात आले असून, नागरिकांना रोख रक्कम, फोनपे, गुगल पे, डेबिट व क्रेडिट कार्डद्वारेही भरणा करता येणार आहे. मनपाकडून आगाऊ भरण्यावर आकर्षक सवलत जाहीर करण्यात आली आहे. १५ जून २०२६ पर्यंत कर भरल्यास सामान्य करावर ७ टक्के सूट, १५ जुलैपर्यंत ६ टक्के आणि १५ ऑगस्टपर्यंत भरणा केल्यास ५ टक्के सवलत दिली जाणार आहे. थकीत तसेच चालू मालमत्ता कराचा भरणा वेळेत करून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही उपायुक्त पारतवार यांनी केले आहे.

### डाबकी रोड पोलिसांकडून जप्त दुचाकींचा लिलाव जाहीर

**अकोला :** डाबकी रोड पोलीस स्टेशन, अकोला येथील विविध गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या दुचाकी वाहनांचा जाहीर लिलाव करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. इच्छुक नागरिकांना तोंडी बोली प्रक्रियेद्वारे या लिलावात सहभागी होता येणार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जप्त वाहनांमध्ये MH-30-AS-6622 क्रमांकाची होंडा ॲक्टीव्हा, MH-27-W-5072 होंडा सीडी डिलक्स, तसेच हिरो होंडा सीडी डिलक्स (चेसिस क्रमांक MBLHA11ERB9M31030), हिरो होंडा मेस्ट्रो (इंजिन क्रमांक JF32AAE) आणि चेसिस क्रमांक ME4JC627JE8008213 असलेले वाहन यांचा समावेश आहे. या वाहनांच्या लिलावासाठी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील तीन दिवसांच्या आत इच्छुकांनी कार्यालयीन वेळेत डाबकी रोड पोलीस स्टेशन येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. लिलाव प्रक्रियेत तोंडी बोली लावण्यात येणार असून, सर्वाधिक बोली लावणाऱ्या व्यक्तीस संबंधित वाहन देण्यात येईल, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, नागरिकांनी लिलाव प्रक्रियेत सहभागी होताना आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असेही आवाहन डाबकी रोड पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक दीपक कोळी यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण; चार महिन्यांपासून पोलिसांचा तपास ठप्प

**▶▶ बाळापूर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह**

**▶▶ पीडित वडिलांचा न्यायासाठी एल्गार**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

महिला व अल्पवयीन मुलींवरील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाकडून कठोर निर्देश दिले जात असताना, चान्नी पोलीस ठाणे हद्दीतील एका अल्पवयीन मुलीचे अपहरण होऊन तब्बल चार महिने उलटूनही तिचा शोध लागलेला नसल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित अल्पवयीन मुलगी ही बाळापूर पोलीस ठाणे हद्दीतील वाडेगाव येथे कोचिंग क्लाससाठी राहत होती. दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास ती नेहमीप्रमाणे क्लासला जात असल्याचे सांगून रूमवरून बाहेर पडली; मात्र त्यानंतर ती परतलीच नाही. बराच वेळ उलटल्यानंतर मैत्रिणींनी तिच्या कुटुंबीयांना माहिती दिली.

मुलीच्या वडिलांनी तात्काळ शोधमोहीम सुरू करत मोबाईलवर साधण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणताही संपर्क होऊ शकला नाही. अखेर त्यांनी बाळापूर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, पातूर तालुक्यातील भानोस येथील एका संशयित युवकाने मुलीला अमिष दाखवून फूस लावून पळवून नेल्याचा आरोप करण्यात आला आहे.

पोलिसांनी गुन्हा दाखल केला असला, तरी चार महिन्यांनंतरही मुलगी व आरोपीचा ठावठिकाणा लागलेला नाही.

दरम्यान, या प्रकरणात तपासातील दिरंगाईमुळे संताप व्यक्त केला जात असून, जिल्हा पोलीस अधीक्षकांनी तातडीने हस्तक्षेप करून मुलीचा शोध लावावा, अशी मागणी पीडित कुटुंबीयांनी केली आहे.

**चार महिन्यांपासून प्रतीक्षा; न्याय कधी मिळणार?**

'माझ्या मुलीला अमिष दाखवून पळवून नेल्याची तक्रार करूनही पोलिसांकडून योग्य तपास होत नाही. चार महिन्यांपासून आम्ही न्यायाच्या प्रतीक्षेत आहोत. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून माझ्या मुलीचा शोध घ्यावा,' अशी आर्त मागणी पीडित मुलीच्या वडिलांनी केली आहे.

# पातूर पंचायत समितीत अर्धनग्न आंदोलन; निधी माहितीप्रकरणी खळबळ

**- ग्रामपंचायतींच्या निधीबाबत माहिती देण्यास टाळाटाळ**

**- अधिकाऱ्यांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

ग्रामपंचायत निधीच्या माहितीसाठी वारंवार पाठपुरावा करूनही संबंधितांकडून टाळाटाळ होत असल्याने संतप्त झालेल्या सामाजिक कार्यकर्त्याने थेट पंचायत समितीत अर्धनग्न आंदोलन केल्याची घटना सोमवारी (दि. ४) पातूर येथे घडली. या प्रकारामुळे पंचायत समिती परिसरात एकच खळबळ उडाली.

सायवणी येथील सामाजिक कार्यकर्ते विजयकुमार ताले यांनी पातूर पंचायत समिती अंतर्गत गोंधळवाडी, तांदळी बु. आणि देऊळगाव या तीन ग्रामपंचायतींमधील १४वा व १५वा वित्त आयोगाच्या निधीची माहिती मिळावी यासाठी अनेकदा अर्ज सादर केले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती देण्यास टाळाटाळ होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त झालेल्या ताले यांनी सोमवारी



पंचायत समिती गाठत गटविकास अधिकाऱ्यांच्या कक्षात अर्धनग्न होऊन आंदोलन सुरू केले. यावेळी गटविकास अधिकारी अनुपस्थित असल्याने काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

दरम्यान, प्रभारी गटविकास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्यात आला असता, त्यांनी मंगळवारी (दि. ५) संबंधित माहिती देऊन समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर ताले यांनी आंदोलन स्थगित केले.

**निधीचा दुरुपयोग थांबेना?**

पातूर पंचायत समिती अंतर्गत विविध गावांमध्ये विकासकामे केवळ कागदोपत्री दाखवून शासनाच्या निधीचा दुरुपयोग होत असल्याच्या तक्रारी प्रलंबित आहेत. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून कारवाई होत नसल्याने गैरप्रकारांना जणू अभय मिळत असल्याचे चित्र असून, निधीचा दुरुपयोग थांबता थांबत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे.


## हरविले आहे

मी श्रीकांत विजयकुमार कांबे, रा. श्री कॉलनी लोहारी रोड, अकोट या जाहिर सुचनेद्वारे सर्वांना सांगू इच्छितो की, माझे एचडीएफसी बँकेचे ओळखपत्र (क्र.२४०३१६३२४७००२९१) हे नजर चुकीने कोठेतरी गहाळ झाले असून त्याबाबत मी अकोट शहर पोलिस स्टेशन येथे रितसर तक्रार नोंदविली असून त्याचा सान क्र. ४५/२६ असा आहे.

तरी सदर क्रमांकाचा माझ्या नावाचा उल्लेख असलेला ओळखपत्र कोणालाही कोठेही आढळून आल्यास तो अकोट शहर पोलिस ठाणे अथवा माझ्या खालील नमूद पत्त्यावर आणून द्यावा, ही विनंती. तसेच सदर ओळखपत्राचा कोणीही दुरपयोग करू नये केल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

करिता ही जाहीर सुचना.

**आपला**
**श्रीकांत विजयकुमार कांबे**
पत्ता: रा. श्री कॉलनी लोहारी रोड, अकोट
मो. ९०११२९४१२९

## Change In Name

I have change my name From
**"SALEEM KHAN"**
(As per Old Passport Name/ Wrong Name) -TO-
**"SALEEM KHAN MEHBOOB KHAN"**
(New Name as per on Two Photo ID)
Address (If as per old passport or if change then as per Adhar) "NAMAN KIRANA MUZAFFAR NAGAR AKOLA - 444001"
Passport number - M2668071
File number- NG1078140939214

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५४९/२०२६ — प्रोसेस नं.५१३८/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : १५/०४/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती आशाबाई महादेव रायबोले रा. मु. पो. म्हातोडी, ता. जि. अकोला २. सौ. वैशाली गणेशराव अनाकुरकर रा. सरकारी हॉस्पिटल जवळ, म्हातोडी, ता. जि. अकोला. ३. सौ. उषा शिवचरण तराळे रा. हिंगणी बु, पोस्ट दहिहांडा, ता. जि. अकोला. ४. सौ. दिपाली सारंगधर घावट रा. पातोंडा, पोस्ट जउळखेड, ता. अकोट, जि. अकोला. ५. संतोष महादेव रायबोले रा. मु. पो. म्हातोडी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : महादेव विठ्ठलराव रायबोले
**पत्ता :-** रा. मु. पो. म्हातोडी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत महादेव विठ्ठलराव रायबोले यांचे दि. १३/१२/२०२५ रोजी म्हातोडी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६४७/२०२६ — प्रोसेस नं.५४९९/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** १. गजानन विठ्ठलराव थोरात रा. प्लॉट नं. १८, पाटील लेआउट, अभिरूची गार्डनच्या मागे, श्रीहरी नगर, उमरी प्र. अकोला. ता. जि. अकोला. २. विनया प्रकाश थोरात ३. आदित्य प्रकाश थोरात ४. हर्षल प्रकाश थोरात नं. २ ते ४ रा. प्लॉट नं. ९२, हिंगणा रोड, नागपूर, ता. जि. नागपूर. ५. जयश्री बाबुराव दळवी रा. काजळी, पो. देउरवाडा, ता. अमरावती, जि. अमरावती. ६. ललिता राजाभाऊ उर्फ राजेंद्र बोंदे रा. सांगेकर नगर, चांदूर बाजार, ता. चांदूर बाजार, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विठ्ठलराव त्र्यंबकराव थोरात २. चित्रकलाबाई विठ्ठलराव थोरात
**पत्ता :-** रा. दोन्ही रा. चिखलगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विठ्ठलराव त्र्यंबकराव थोरात यांचे दि. १७/१०/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. तसेच मयत चित्रकलाबाई विठ्ठलराव थोरात यांचे दि. १८/०१/२०१८ रोजी चिखलगाव ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६९०/२०२६ — प्रोसेस नं.५८५७/२०२६
चौ.ता. २९/०६/२०२६ — दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** १. मंगला विनोद तांबडे २.शरवरी विनोद तांबडे ३. सृष्टी विनोद तांबडे सर्व रा. म्हैसपूर, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : विनोद यशवंत तांबडे
**पत्ता :-** रा. म्हैसपूर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विनोद यशवंत तांबडे यांचे दि. ०५/०७/२०२४ रोजी म्हैसपूर, ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६४६/२०२६ — प्रोसेस नं.५३८४/२०२६
चौ.ता. १५/०६/२०२६ — दिनांक : १८/०४/२०२६

**अर्जदार :** १. शकुंतला वासुदेवराव काळमेघ २. संजय वासुदेवराव काळमेघ ३. दिलीप वासुदेवराव काळमेघ ४. गोपाल वासुदेवराव काळमेघ अर्जदार क. १ ते ४ रा. कासळी बु, पो. म्हातोडी, ता. जि. अकोला. सध्याचा पत्ता- अर्जदार क. १ ते ४ रा. बर्फाच्या कारखान्याजवळ, शेलार फैल, अकोला. ता. जि. अकोला. ५ प्रतिभा गजानन भटकर रा. वडत बु, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : वासुदेवराव रामराव काळमेघ
**पत्ता :-** रा. बर्फाच्या कारखान्याजवळ, शेलार फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वासुदेवराव रामराव काळमेघ यांचे दि. ११/१२/२०१७ रोजी शेलार फैल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६७८/२०२६ — प्रोसेस नं.६१०७/२०२६
चौ.ता. २२/०६/२०२६ — दिनांक : ०२/०५/२०२६

**अर्जदार :** १. प्रगती संतोष गावंडे २. श्रेयश संतोष गावंडे ३. मुक्ता संतोष गावंडे सर्व रा. गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि.अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : संतोष रामकृष्ण गावंडे
**पत्ता :-** रा. गायत्री नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत संतोष रामकृष्ण गावंडे यांचे दि. ०३/०३/२०२६ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## अकोला महानगरपालिका, अकोला
## पाणी पुरवठा विभाग

**निविदा सुचना क्र. ०३, सन २०२६-२७**

अकोला महानगरपालिका, पाणी पुरवठा विभाग, अकोला मनपा निधी अंतर्गत दि. ०४/०५/२०२६ रोजी निविदा महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली असुन या कामासंबंधीत सविस्तर तपशिल खालील नमुद संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ( संपर्क- ७७०९०४९३५१)

संकेतस्थळ - www.amcakola.in

**कार्यकारी अभियंता**
पाणी पुरवठा विभाग
अकोला महानगरपालिका, अकोला

जा.क्र./ अमनपा/पापू/५६/२०२६,
पाणी पुरवठा विभाग, अकोला महानगरपालिका, अकोला
दिनांक : ०४/०५/२०२६


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १५०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# हिंगणघाटचा कामगार दिन 'काळा'

**मोहता–डागा मिलचा अंत; हजारो संसार रस्त्यावर, कुणीच जबाबदार नाही, रोजगार नाही, शिक्षण नाही; हिंगणघाटची तरुणाई अंधारात ढकलली**

**हिंगणघाट/जनमाध्यम**

जागतिक कामगार दिनाच्या दिवशी देशभरात श्रमिकांच्या हक्कांचा जयघोष होत असताना, विदर्भाचे मँचेस्टर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हिंगणघाटमध्ये मात्र हा दिवस संताप, हताशा आणि तुटलेल्या स्वप्नांची वेदना घेऊन उगवला. एकेकाळी गिरण्यांच्या सायरनवर धावणारे शहर आज बेरोजगारीच्या गर्तेत अडकले असून, आम्हाला न्याय कधी मिळणार हा प्रश्न कामगारांनी सरकारसमोर उभा केला आहे.

**गिरण्या बंद; हजारो कुटुंबे उद्ध्वस्त**

'मोहता मिल' आणि 'डागा मिल' या गिरण्यांनी कधी हजारो घरांमध्ये उजेड दिला होता. सुमारे १२ हजार कामगारांच्या हाताला काम देणाऱ्या या उद्योगांचे चाके थांबताच शहराची आर्थिक कणा मोडली. गिरण्या बंद होणे म्हणजे केवळ उद्योग थांबणे नव्हते, तर हजारो स्वप्नांचा अंत होता. आज त्या जागा ओस पडल्या असून, विकासाच्या नावाखाली केवळ आश्वासनांची धूळ उडत आहे.

**पर्यायी उद्योगांचा अभाव; लोकप्रतिनिधी अपयशी**

गेल्या अनेक वर्षांत बंद पडलेल्या उद्योगांच्या जागी एकही मोठा उद्योग उभा राहू शकला नाही. याबाबत लोकप्रतिनिधींच्या इच्छाशक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. राजकीय भाषणांत विकासाचे दावे केले जातात, पण प्रत्यक्षात तरुणांच्या हाताला काम नाही, ही वस्तुस्थिती आहे.



**कामगारांचे शोषण; नियम धाब्यावर**

सध्या सुरू असलेल्या मोजक्या उद्योगांमध्येही कामगारांचे शोषण होत असल्याचे आरोप आहेत. कुशल कामगारांना अकुशल वेतन, कंत्राटी पद्धतीत अन्याय आणि कामगार कायद्यांचे उल्लंघन यामुळे कामगार वर्गात संताप वाढत आहे. कामगारांच्या हक्कासाठी उभ्या राहणाऱ्या संघटनाही निष्क्रिय झाल्याची टीका होत आहे.

**उच्च तंत्रशिक्षणाचा अभाव; तरुणाई भरकटली**

हिंगणघाटमध्ये इंजिनिअरिंग, पॉलिटेक्निक सारख्या उच्च तंत्रशिक्षणाच्या सुविधा नसल्याने कामगारांच्या पुढच्या पिढीसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. शिकण्याची क्षमता असूनही आर्थिक मर्यादा आणि स्थानिक सुविधांचा अभाव यामुळे अनेक तरुणांची स्वप्ने अधांतरी आहेत. परिणामी, काही तरुण चुकीच्या मार्गाकडे वळत असल्याचे चित्र आहे.

**कामगारांचा सरकारला थेट इशारा**

रस्ते आणि नाले म्हणजे विकास नव्हे, रोजगार आणि शिक्षण द्या अशी स्पष्ट मागणी कामगारांकडून होत आहे. केवळ आश्वासनांवर जगणे आता शक्य नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

**नव्या उद्योगांची गरज; अन्यथा उद्रेक अटळ**

हिंगणघाटमध्ये १-२ मोठे उद्योग उभारून स्थानिक तरुणांना रोजगार देणे, तसेच उच्च तंत्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. अन्यथा वाढती बेरोजगारी आणि असंतोष यामुळे मोठ्या आंदोलनाचा उद्रेक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हिंगणघाटचा कामगार दिन हा उत्सव राहिलेला नाही; तो व्यवस्थेच्या अपयशावर बोट ठेवणारा आरसा ठरला आहे.

आता तरी सरकार आणि लोकप्रतिनिधींनी जागे होऊन ठोस निर्णय घेतले नाहीत, तर गिरण्यांच्या राखेतून उठणारा संतापाचा ज्वालामुखी थोपवणे कठीण ठरेल.

## मायनॉरिटी असोसिएशनच्या वतीने आव्हान
# स्व-गणनेतून तुमची नोंद करा

**वर्धा/जनमाध्यम**

देशाच्या १६ व्या जनगणनेचा रणशिंग फुंकला गेला असून, डिजिटल भारताच्या दिशेने एक मोठी झेप घेत 'स्व-गणना'चा नवा अध्याय सुरू झाला आहे. मात्र, या ऐतिहासिक संधीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वालाच हरवण्यासारखे ठरेल, असा इशारा देत मायनॉरिटी वेलफेयर असोसिएशन, वर्धा यांनी नागरिकांना थेट आव्हान दिले आहे.दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या पहिल्या टप्प्यात प्रत्येक नागरिकाला https://se.census.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर स्वतःची माहिती नोंदविण्याची संधी आहे. सरकार दारात येण्याची वाट पाहू नका, स्वतः पुढे या आणि आपली ओळख नोंदवा, असा संदेश असोसिएशनने दिला आहे. अध्यक्ष इकराम हुसेन शेख, सय्यद मतीन, एझाज मोहम्मद, अमीनउद्दीन शेख, मुबीन शेख, समीन खान, ईद्रीस मेमन, महेबूब बनानी, जुनेद शेख, अख्तर खान तसेच प्रा. डॉ. अनिस बेग यांनी सांगितले की, स्व-गणना ही केवळ कागदी प्रक्रिया नाही; ती आपल्या हक्कांची पायाभरणी आहे. आज आपण नोंदलो नाही, तर उद्या आपल्या प्रश्नांना कोण उत्तर देणार, देशाच्या विकासाच्या आराखड्यापासून ते निधीच्या वाटपापर्यंत प्रत्येक गोष्ट जनगणनेच्या आकड्यांवर उभी असते. अशा वेळी नागरिकांनी उदासीनता दाखवणे म्हणजे स्वतःच्या हक्कांवरच पाणी सोडण्यासारखे आहे, असा घणाघातही यावेळी करण्यात आला.एक क्लिक एक नोंद एक जबाबदारी या घोषवाक्यासह नागरिकांनी मोठ्या संख्येने स्व-गणनेत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# डिजिटल जनगणनेचा बिगुल; आर्वी तालुका सज्ज

**आर्वी/जनमाध्यम**

देशातील पहिल्या अत्याधुनिक डिजिटल जनगण नेचा बिगुल वाजताच आर्वी तालुक्यात प्रशासनाने पूर्ण तयारी केली आहे.

ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करून ही प्रक्रिया पारदर्शक आणि अचूक करण्यावर भर देण्यात आला आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागासाठी २२२ प्रगणक व ३७ पर्यवेक्षक, तसेच राखीव कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. आर्वी शहरासाठी ६२ प्रगणक व १० पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे. उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट आणि तहसीलदार हरिष काळे यांनी संपूर्ण तयारीचा आढावा घेत यंत्रणेला गतीमान कामकाजाचे निर्देश दिले आहेत.

या जनगणनेत नागरिकांना पहिल्या टप्प्यात १ मे ते १५ मे २०२६ दरम्यान घरी बसून स्मार्ट मोबाईलद्वारे स्वतःची माहिती भरता येणार आहे. त्यासाठी अधिकृत संकेतस्थळ https://se. census.gov.in उपलब्ध करून देण्यात आले आहे.यानंतर १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरोघरी भेट देऊन माहितीची पडताळणी करतील. प्रत्येक कुटुंबाला एक स्वतंत्र घ्‍ क्रमांक मिळणार असून तो जतन करणे आवश्यक आहे.

तहसीलदार हरिष काळे यांनी सांगितले की, ही जनगणना राष्ट्रीय काम असून सर्व कर्मचारी उत्साहाने सहभागी होत आहेत. स्वगणनेत दिलेली माहिती प्रगणक पडताळून अंतिम नोंदीत समाविष्ट करतील.सामाजिक कार्यकर्ते अविनाश ल. टाके यांनी जनतेला आवाहन केले की, खरी आणि अचूक माहिती देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. यामुळे विकास योजना अधिक परिणामकारक ठरतील.

डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणारी ही जनगणना आर्वी तालुक्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरणार असून प्रशासन आणि जनतेच्या समन्वयावरच या प्रक्रियेचे यश अवलंबून आहे.

## १२ वीच्या गुणवंतांचा गौरव; एनसीसी सभागृहात सत्कार सोहळा उत्साहात

**देवळा/जनमाध्यम**

आजचे युग हे तीव्र स्पर्धेचे आहे. या स्पर्धात्मक युगात स्वतःला सक्षम बनवणे गरजेचे आहे. जिद्द, कठोर मेहनत आणि ध्येयप्राप्तीसाठीचे समर्पण हेच यशाची खरी गुरुकिल्ली आहे,' असे प्रतिपादन माजी खा. रामदास तडस यांनी केले.स्थानिक एस. एस. एन. जे. कनिष्ठ महाविद्यालयात १२ वीच्या परीक्षेत प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा अभिनंदन सोहळा ४ मे रोजी एनसीसी सभागृहात उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी रामदास तडस होते.प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ. सुनिता सोनारे, एनसीसी अधिकारी कॅप्टन मोहन गुजरकर, पालक प्रतिनिधी संजय पारिसे, नगरसेवक रवींद्र कारोटकर, उमेश कामडी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.यावर्षीच्या उच्च माध्यमिक परीक्षेत एस. एस. एन. जे. कनिष्ठ महाविद्यालयाने देवळी शहरातून दुसरे स्थान मिळवत १७ विद्यार्थ्यांनी प्राविण्य यादीत स्थान मिळवले. प्राचार्य डॉ. सोनारे यांनी सातत्यपूर्ण अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले.यावेळी सर्वाधिक ७०.९२ टक्के गुण मिळविणारी साक्षी संजय पारिसे हिला १००० रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेच इतर गुणवंत विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५०० रुपयांचे बक्षीस देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन आरती मरघडे यांनी केले तर आभार प्रा. जगदीश यावले यांनी मानले.

## बाजार समितीत अज्ञात मृतदेह आढळला

**वर्धा** - कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळल्याने शहरात खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर घटनास्थळी धाव घेत तपास सुरू करण्यात आला. मृत व्यक्तीची अद्याप ओळख पटलेली नाही. शहर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## १८ वर्षीय तरुणाची आत्महत्या



**वर्धा** - वायगाव (नि.) येथील १८ वर्षीय अथर्व विंचूरकर याने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. देवळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेत तपास सुरू केला आहे. तरुण वयातील वाढत्या आत्महत्यांमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर G0536201वरील माझे **MEHRUN NISA DOSHI** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड व पॅन कार्ड वरील **MEHARUN NISA HARUN DOSHI** हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

-:पत्ता:-
गौतम वॉर्ड हिंगणघाट वर्धा
४४२३०१

# हिंगणघाटात धर्मवीर संभाजी महाराजांचा भव्य पुतळा उभारावा

**हिंगणघाट/जनमाध्यम**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय शौर्याचा आणि राष्ट्रनिष्ठेचा गौरव करण्यासाठी हिंगणघाट बस स्थानक परिसरात त्यांचा भव्य पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, या मागणीने आज शहरात वातावरण भारून गेले. सकल हिंदू समाज, विश्व हिंदू परिषद व शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान हिंगणघाट तालुका यांच्या वतीने मुख्यमंत्री तसेच गृहमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले. हे निवेदन तहसीलदार, हिंगणघाट यांच्या मार्फत अधिकृतरीत्या सुपूर्त करण्यात आले.



**सकल हिंदू समाजाची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी**

निवेदनात ठामपणे नमूद करण्यात आले की, छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान, पराक्रम आणि अखंड राष्ट्रभक्ती ही आजच्या युवा पिढीसाठी दीपस्तंभासारखी प्रेरणादायी आहे. शहरातील मध्यवर्ती आणि गर्दीचा ठिकाण असलेल्या बस स्थानक परिसरात त्यांचा पुतळा उभारल्यास इतिहासाची जाणीव अधिक दृढ होईल आणि देशभक्तीची भावना नव्या पिढीत जागृत राहील. या भव्य स्मारकासाठी आवश्यक निधी तात्काळ मंजूर करून शासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. निवेदनाची प्रत संबंधित मंत्री व प्रशासकीय अधिकाऱ्यांना पाठविण्यात आली असून, लवकर सकारात्मक निर्णय होईल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.निवेदन सादर करताना वर्धा जिल्हा विश्व हिंदू परिषद मंत्री शरद कोणप्रतिवार, विहिप विशेष संपर्क प्रमुख गजानन मसाये, जिल्हा धर्मप्रसार प्रमुख अजय भोंग, श्याम इडपवार, पंकज देशपांडे, नरेंद्र गंधारे, वैभव हुलके, श्रेयस वानोडे, प्रमोद टिपले, रवी नौकरकर, विशाल मुटे, गजानन टोपलमोडे, मनीष तडस, राहुल फटिंग, मदन माडे, देवा शेंडे, बजरंग दलाचे नगर संयोजक संदीप नासरे तसेच शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जगदीश लोणकर यांच्यासह शेकडो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या वेळी परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रम शांततेत पार पडला असला तरी मागणीने शहरात चर्चेचे वातावरण निर्माण केले आहे.

# उन्हाचा तडाखा, माठाचा दर डोळे पाणावणारा

**कच्चा माल महागला; तरीही बाजारात माठ-रांजणांना जबरदस्त उठाव**

**आष्टी/जनमाध्यम**

एप्रिलच्या झळाळत्या उन्हाने यंदा सुरुवातीपासूनच अंगाची लाही लाही केली आहे. तापलेल्या वातावरणात थंड पाण्याचा एक घोट म्हणजे जणू जीवाला दिलासा देणारा अमृततुल्य क्षण! पण याच दिलास्याचा आधार असलेल्या 'गरिबांचा फ्रिज' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माठ-रांजणांच्या किमती यंदा चांगल्याच भडकल्या आहेत.

कच्च्या मालाच्या वाढलेल्या दरामुळे आणि दुसरीकडे ग्राहकांची उसळलेली मागणी यामुळे बाजारात माठ-रांजणांचे भाव गेल्या वर्षाच्या तुलनेत लक्षणीय वाढले आहेत. परिणामी, थंड पाण्याची तहान भागवण्यासाठी यंदा सर्वसामान्यांना 'खिसा गरम' ठेवावा लागत आहे, अशी भावना ग्राहकांतून व्यक्त होत आहे.साहूर व परिसरात उन्हाचा पारा दिवसेंदिवस चढत असून, रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी माठ-रांजणांच्या दुकानांची रांग लागलेली दिसते. फेब्रुवारीपासूनच उन्हाची चाहूल लागल्याने यंदा विक्री हंगाम लवकरच रंगात



आला. जरी ३ एप्रिलच्या अवकाळी पावसाने क्षणिक दिलासा दिला, तरी उकाड्याचा जोर कायम असल्याने माठांची मागणी दिवसागणिक वाढतच आहे.विशेष म्हणजे, वाढलेल्या किमती असूनही ग्राहकांची गर्दी मात्र ओसरलेली नाही. अडीचशे ते पाचशे रुपयांपर्यंत माठांची किंमत पोहोचली असून, तरीही 'थंड पाण्याचा मोह' ग्राहकांना थांबू देत नाही. फॅन्सी लाल, काळे आणि रंगीबेरंगी माठ बाजारात आकर्षण ठरत आहेत.दरम्यान, पारंपारिक कुंभार व्यवसायावरही या बदलांचा परिणाम दिसून येत आहे.

कच्चा माल सहज उपलब्ध होत नसल्याने अनेक कुंभारांनी स्वतः माठ तयार करण्याऐवजी परजिल्ह्यातून तयार माल आणून विक्री करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. यामुळे स्थानिक उत्पादन घटत असून, रेडिमेड आणि आकर्षक डिझाइनच्या माठांमुळे स्पर्धा अधिक तीव्र झाली आहे.

**उन्हाची झळ वाढतेय... आणि त्याच वेगाने 'माठाचा भाव'ही!**

सामान्य माणसाच्या घामाच्या धारांबरोबरच खिशावरचा ताणही वाढत असल्याचे हे चित्र आहे. तरीही, थंड पाण्याच्या एका घोटासाठी माठाची साथ सोडण्याचा प्रश्नच नाही, अशीच भावना बाजारपेठेतून उमटताना दिसत आहे.

## संक्षिप्त

### शेतीच्या वादातून सख्ख्या भावाकडून मारहाण

**वर्धा** - शेतीच्या वाटणीवरून निर्माण झालेल्या कौटुंबिक वादातून सख्ख्या भावानेच भावावर काठीने हल्ला केल्याची धक्कादायक घटना मलकापूर येथे घडली. अमोल नामदेव मिसाळ हे शेतात काम करत असताना त्यांचा भाऊ संजय मिसाळ तेथे दाखल झाला. 'तू शेती करू नको, मीच करणार' असे म्हणत दोघांमध्ये जोरदार वाद झाला. वाद विकोपाला गेल्यानंतर संजय याने अमोल यांना काठीने मारहाण करून जखमी केले. या घटनेने परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. जखमी अमोल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पुलगाव पोलिसांनी आरोपी संजय मिसाळ याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू असून, कौटुंबिक जमिनीच्या वादातून वाढत चाललेल्या हिंसाचारावर चिंता व्यक्त केली जात आहे.

### क्षुल्लक कारणावरून काठीने हल्ला

**हिंगणघाट** - तालुक्यातील इंजाळा शिवारात क्षुल्लक कारणावरून झालेल्या वादातून एका तरुणावर काठीने हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. रमेश उत्तम खोडे (रा. इंजाळा) हे कामानिमित्त बाहेर असताना गजानन भलमे (रा. अल्लीपूर) याच्यासोबत किरकोळ कारणावरून वाद झाला. हा वाद अचानक वाढत गेला आणि गजानन भलमे याने रमेश यांना काठीने मारहाण करून जखमी केले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जखमी रमेश यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. गावात वाढणाऱ्या किरकोळ वादातून होणाऱ्या हिंसाचारावर नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

### विश्वासघातातून कार बळकावली

**वर्धा** - आर्थिक व्यवहाराच्या बहाण्याने विश्वासघात करून कार परस्पर ताब्यात ठेवल्याची घटना समोर आली आहे. संकेत जोडापे (रा. चनोडा हिवरा) याने विठ्ठल बाभुळकर यांची कार घेतल्यानंतर ती परत न देता स्वतःकडे ठेवली. वारंवार मागणी करूनही कार परत न मिळाल्याने बाभुळकर यांनी समुद्रपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध विश्वासघात व फसवणुकीचा गुन्हा नोंदविला आहे. या घटनेमुळे आर्थिक व्यवहारांतील विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोलिसांकडून प्रकरणाचा तपास सुरू असून कार परत मिळवण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया राबवली जात आहे.

### कुलूपबंद घर फोडून ४० हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा** - रामनगर परिसरात घर कुलूपबंद असताना चोरट्यांनी हात साफ केल्याची घटना उघडकीस आली आहे. हेमलता गजानन वाडकर या केदारनाथ यात्रेसाठी बाहेर गेल्या होत्या. त्यांच्या अनुपस्थितीत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी रोख ३० हजार रुपये आणि चांदीचे दागिने असा एकूण ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. घरी परतल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी रामनगर पोलिसांत तक्रार दिली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### अवैध रेती वाहतूक उघड

**हिंगणघाट** - पोलिसांनी मांडगाव शिवारात मोठी कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला आहे. शिवणी रोडवर करण्यात आलेल्या कारवाईत एमएच ३२ क्रमांकाचा ट्रॅक्टर, टॉली आणि रेती असा सुमारे ८ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात मांडगाव येथील राहुल तडस याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अवैध रेती उत्खनन आणि वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असल्याच्या तक्रारीनंतर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. पुढील तपास सुरू असून महसूल विभागालाही माहिती देण्यात आली आहे.

### कॉपर रॉड चोरी; हजारांचा मुद्देमाल गायब

**हिंगणघाट** - येथील सगुना कंपनी समोरील २२० केव्ही उपकेंद्रातून कॉपर रॉड चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अज्ञात चोरट्यांनी सुमारे ५० हजार रुपये किमतीचे दोन कॉपर रॉड चोरून नेले. ही बाब लक्षात आल्यानंतर प्रकाश तपासे यांनी हिंगणघाट पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. या घटनेमुळे विद्युत उपकेंद्रांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### भरधाव ट्रकची कारला धडक

**हिंगणघाट** - शहरातील कलोडे चौक परिसरात भरधाव ट्रकने कारला जोरदार धडक दिल्याने अपघात घडला. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले असून सुदैवाने जीवितहानी टळली आहे. नितीन पाटील यांच्या तक्रारीवरून ट्रक चालकाविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन आणि भरधाव वेगामुळे अपघात झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिस पुढील तपास करत आहेत.

### हद्दपार आदेशाचा भंग; अमन बावने पोलिसांच्या ताब्यात

**वर्धा** - हद्दपार आदेश असतानाही प्रतिबंधित क्षेत्रात वावरताना अमन रमेश बावने (रा. सिंदी मेघे) याला पोलिसांनी अटक केली आहे. तो न्यायालयीन आदेशाचे उल्लंघन करून परिसरात फिरत असल्याचे आढळले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. त्याच्यावर हद्दपार आदेश भंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १५७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### जि.प.प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिन

**अमरावती-**भातकुली तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उत्तमसरा येथे १ मे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे बक्षीस वितरण करण्यात आले. त्यासोबतच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना पेपर पॅड तसेच बिस्कीटचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमामधील प्रमुख अतिथी असलेले शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रत्नदीप सवाई यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.तसेच उल्लास अंतर्गत नवसाक्षर परीक्षार्थींच्या गुणपत्रिका (प्रमाणपत्र) वाटप करण्यात आले.सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी,भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून हारार्पण करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्या अनुराधा भिंगारे,माया बोरकर,गणेश मानकर शाळेच्या मुख्याध्यापिका मिनाक्षी इंगळे,स.शि.राजेश सावरकर,गजानन येलोने,प्रमोद कांबळे,संगिता कराळे,अर्पना झाडे उपस्थित होत्या.शाळेच्या मुख्यध्यापिका मिनाक्षी इंगळे यांच्या हस्ते ध्वज पूजन व ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली त्यासोबतच राज्य गीत व राष्ट्रीय गीताचे गायन करून घेण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन शाळेचे गजानन येलोने यांनी केले. आभार सहशिक्षक राजेश सावरकर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व लहान-मोठ्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.



### पोहरा पूर्णा येथे बुद्ध जयंती उत्साहात

**आसेगाव पूर्णा-** भातकुली व चांदूरबाजार तालुक्याच्या सीमेवरील पोहरा पूर्णा येथील अनाथ पीडक बुद्ध विहारात बुद्ध जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाला परिसरातील बौद्ध उपासक व उपासिका संघाची लक्षणीय उपस्थिती होती. यावेळी आसेगाव पूर्णा येथील बुद्ध उपासक देवेंद्र इंगळे यांनी खिरदानाचे आयोजन करून कार्यक्रमात गोडवा निर्माण केला. त्यामुळे विहार परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमास धम्म प्रचारक गंगाधरराव इंगळे, ज्ञानरत्न अश्वघोष भंते, सुरज नेतनराव, सुनील खांडेकर, नानासाहेब धुळे, प्रीतम ताई इंगळे, अरुण भाऊ तेलमोरे, शारदाताई मकेश्वर, मनोहर इंगळे यांच्यासह पंचक्रोशीतील अनेक बौद्ध बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्री राजर्षि शाहू महाराज वाचनालयात महाराष्ट्र दिन

**तिवसा-**श्री स्वामी विवेकानंद बहू. सामाजिक संस्था अंतर्गत श्री राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय तिवसा येथे महाराष्ट्र दिन तसेच गौतम बुद्ध पौर्णिमा निमित्त फोटो पूजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमानिमित्त वाचनालयामध्ये गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले अनिल थुल, विरोधी पक्ष नेता न. पं. कार्यालय तिवसा व पत्रकार प्रशिक शापामोहन यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेले मधुकरराव पिंगळे, प्रकाश विजयकर,भूषण मुंदाणे,सुरज तंवर,राजाभाऊ देशमुख,कृणाल गौरखेडे, प्रशांत डगवार, सचिन काळे, हृषीकेश गंधे,यशवर्धन भगत,यश देशमुख,गणेश तरंगे,विशाल गडलिंग,राहुल धडांगे व इतर वाचक वर्ग यांनी सुद्धा गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

# चांदूर बाजार पोलिसांच्या हद्दीत अवैध धंदे उघड

**बेलोरा/ वार्ताहर**

परिसरातील अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी चांदूर बाजार पोलिसांनी धडक मोहीम राबवत तीन वेगवेगळ्या कारवायांमध्ये एकूण ३ लाख १८ हजार ५८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशानुसार व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

३ मे रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेदरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीसमोरील मोकळ्या





जागेत छापा टाकण्यात आला. यावेळी आरोपी शेख अयुब शेख युसुफ (वय ६२, रा. पेठपुरा, मोर्शी) यांच्या ताब्यात १६ गोवंश बैल आढळून आले. पशुवैद्यकीय तपासणीदरम्यान काही जनावरांवर बोगस टॅग असल्याचे निष्पन्न झाले असून जप्त जनावरांची किंमत सुमारे १,९७,००० रुपये आहे. याप्रकरणी महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच दिवशी रात्री १०:३५ वाजता मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी जाबाज अली मुशरफ अली यांच्या घरावर छापा टाकला असता काही आरोपी ५२ पत्त्यांचा 'एक्का बादशाह' जुगार खेळताना रंगेहाथ पकडले गेले. पोलिसांनी आरोपींकडून ८,७०० रुपये रोख रक्कम व ५५,००० रुपयांचे ३ मोबाईल फोन जप्त केले असून या प्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम, १८८७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच दि. ४ मे २०२६ रोजी पोलिसांनी कारवाई करत आरोपी मोहम्मद शोएब मोहम्मद शकिल (वय ३६, रा. पठाण चौक, अमरावती) याच्या ताब्यातील मोपेडवरून मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त केला. यामध्ये विविध ब्रँडच्या सुमारे १४,००० गुटखा पुड्या आढळून आल्या असून जप्त मालाची किंमत ५७,८८० रुपये आहे. या सर्व कारवायांमध्ये पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक तोडेवाड व उपविभागीय पोलीस अधिकारी शुभम कुमार यांचे मार्गदर्शन लाभले, तर प्रत्यक्ष कारवाई सहायक पोलीस अधीक्षक सागर भामरे व त्यांच्या पथकाने पार पाडली. सलग करण्यात आलेल्या या कारवायांमुळे चांदूर बाजार परिसरातील अवैध धंद्यांवर मोठा आळा बसण्याची शक्यता असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे.

## गांधी विद्यालयाचा उत्कृष्ट निकाल; गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**बडनेरा-** न्यू एज्युकेशन सोसायटी, बडनेरा यांच्या संचलनाखालील गांधी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी- २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत कला शाखेचा एकूण निकाल तब्बल ९७.२९% लागला असून परीक्षेसाठी ३७ विद्यार्थी प्रवेशित होते. त्यापैकी १ विद्यार्थी प्राविण्यासह उत्तीर्ण, ४ विद्यार्थी प्रथम श्रेणी, तर १९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले. गुणवंत विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक - मयुरी कुऱ्हाडे (७६.१७%) द्वितीय क्रमांक- पल्लवी कैथवास (७२.००%) तृतीय क्रमांक – हेमंत वरठी (६२.३३%)यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्था अध्यक्ष डॉ. हेमंतजी देव, उपाध्यक्ष ॲड.आनंदराव इंगोले, राजेश टारपे, शाळा समिती सभापती रामेश्वरराव लाड तसेच सर्व कार्यकारिणी सदस्यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले. विद्यालयाच्या प्राचार्या वंदना



टिक्कस, पर्यवेक्षक दिगंबर करडे, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना दिलेल्या मार्गदर्शनामुळे व परिश्रमांमुळेच हा उत्कृष्ट निकाल साध्य झाल्याचे सांगण्यात आले.विद्यालयाच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# रुग्णसेवेची ज्योत अखंड तेवत ठेवा : डॉ. उर्मिला क्षीरसागर

## संवेदना आरोग्य प्रसार उपक्रम; जनकल्याण सेवा संस्थेचे आयोजन

**अमरावती/ का.प्र.**

आरोग्याचा बाजार झाला असताना आरोग्य सेवेत खारीचा वाटा उचलायचा आहे. यासाठी संवेदना आरोग्य प्रसार उपक्रम सुदैवाने रुग्णांना उपलब्ध आहे. आज सामाजिक कार्यातील पदवीधर चमूला या उपक्रमातून आपल्या ज्ञान व कौशल्याचे चीज करता येते याचे समाधान आह. पण अधिक पुढचा टप्पा गाठताना ग्रामीण लोकांच्या शारीरिक, मानासिक, सामाजिक आणि आध्यात्मिक आरोग्यासाठी काम करणे व आपणही समाजासाठी काही करू शकतो, ही भावना त्यांच्याही मनात जागवणे ही दृष्टी ठेवायला हवी. कार्यकर्ते आणि समाजमनात रुग्णसेवेची ज्योत अखंड तेवत ठेवण्यासाठी निरपेक्ष भावाने कार्य करा. ही निरपेक्ष सेवाभावाची साखळी, लोकसहभागातून जोडल्यास शिवभावे जीवसेवा संकल्प अधिक जोमाने यशस्वीपणे सिद्धीस जाईल, असे प्रतिपादन डॉ. उर्मिला क्षीरसागर यांनी केले.

'शिवभावे जीवसेवा' हे ब्रीद असलेल्या जनकल्याण सेवा संस्था व डॉ. हेडगेवार हॉस्पीटल संचालित संवेदना आरोग्य प्रसार



उपक्रमाची वार्षिक आढावा बैठक, संचालिका डॉ. मानसी कविमंडन यांनी आयोजीत केली होती. त्या वेळी डॉ. क्षीरसागर बोलत होत्या.व्यासपीठावर नागपूर येथील निरामय बहुऊद्देशिय सेवा संस्थेच्या सचिव डॉ. उर्मिला क्षीरसागर, स्वानंद समुपदेशन संस्थेच्या संस्थापिका व प्रख्यात समुपदेशक डॉ. मोहना कुळकर्णी, संस्थेचे विश्वस्त अविनाश भोजापुरे होते. डॉ. क्षीरसागर यांचे स्वागत डॉ. मानसी कविमंडन , विश्वस्त भोजापुरे यांचे स्वागत रवींद्र देशपांडे, डॉ. मोहना कुळकर्णी यांचे स्वागत डॉ. प्रज्ञा बनसोड, डॉ स्मीता पच्चीगर यांचे स्वागत वनिता कविमंडन यांनी केले. दीप प्रज्वलन नतंर डॉ. क्षीरसागर म्हणाल्या, कार्याला जोडणारी, माणसं बांधून ठेवणारी वर्तणूक ठेवल्यास कार्याला वेग येईल. समाजातील मातृशक्तीमध्ये चेतना जागवण्यासाठी काम करा. शिवभावे जीवसेवा हे ब्रीद असलेल्या जनकल्याण सेवा संस्था व डॉ. हेडगेवार हॉस्पीटल संचालित, संवेदना आरोग्य प्रसार उपक्रमात डॉ. प्रतिक्षा भोवते, डॉ. विधी तुलशान, अनिकेत कराळे, विजया चिखलकर, प्रेरणा नांदापुरे, मोनिका पांडे, डॉ. सुमीत धिमान आणि ऋषिकेश पांडे यांनी कामाचा आढावा घेणारे पॉवर पाइंट प्रेझेंटेशन सादर केले. शुगर, बीपी, ॲनिमिया, किटक नाशकांमुळे होणारे विकार या विषयांवर गेले वर्षभर सर्व्हे, रुग्ण तपासणी, पॅथॉलॉजी टेस्ट्स, तज्ञांचे मार्गदर्शन आणि औषधोपचार सुरू आहे. स्कूल हेल्थ उपक्रमात स्वतःची व आपल्या भोवतालची स्वच्छता यासंबंधी प्रश्नावली दिली गेली व रंजक पद्धतीने चांगल्या सवयींचे महत्व सांगितले गेले. एक पाऊल आरोग्याकडे, देशसेवा आणि मोबाईलसह अन्य व्यसन मुक्ती अशा मैत्रीपूर्ण सेशनमध्ये हा उपक्रम राबविला गेला. एकनाथजी रानडे यांच्यावर डॉक्युमेंट्री दाखविण्यात आली

**सेवेत वाढ होणार : डॉ.मानसी कविमंडन**

संवेदना आरोग्य सेवा प्रसार उपक्रमाविषयी बोलताना संचालिका डॉ. मानसी कविमंडन म्हणाल्या, की श्रद्धेय एकनाथजी रानडे यांच्या जन्मशताब्दी निमित्त टीमटाला मध्ये आरोग्य तपासणीला २०१४ मध्ये प्रारंभ झाला. ग्रामीण भागातील वैद्यकीय सेवेपासून वंचित रुग्णांना आरोग्य सेवा मिळावी, यासाठी संवेदना आरोग्य प्रसार उपक्रम तेव्हापासून सातत्याने कार्यरत आहे. गेल्या वर्षीपासून विशेषत्वाने यामध्ये सर्वेक्षणाचेही काम जोडले गेले. २०२५-२६ या वर्षात तब्बल ४३ गावांमध्ये हे काम पोचले असून दहा हजाराहून अधिक रुग्णांनी दर आठवड्याला २० ठिकाणी होणाऱ्या ओपीडी चा लाभ घेतला आहे. साडेसात हजाराहून अधिक सर्वेक्षणातून काही महत्वाच्या बाबी समोर आल्या असून त्यावर काम करण्याची या वर्षीची योजना आखली गेली आहे. यामध्ये प्रामुख्याने बीपी, मधुमेह व अनेमिया यांचा समावेश आहे.

डॉ. मोहना कुळकर्णी यांनी अधिकाधिक युवक-युवतींनी सामाजिक कामात योगदान द्यावे असे आवाहन केले व त्यासाठी अशा बैठका व चर्चा आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या. संवेदनाच्या वार्षिक आढावा बैठक डॉ. कविमंडन हॉस्पिटल येथे पार पडली. बैठकीला संस्थेचे सचिव गोविंद जोग, अविनाश भोजापुरे, सतीश बक्षी, निशा भाराणी, प्रकल्प संचालक डॉ. यशोधन बोधनकर, डॉ. श्याम गिरी, डॉ. मानसी कविमंडन, डॉ. प्रज्ञा बनसोड, डॉ. अमित कविमंडन, डॉ. तुषार राठी, डॉ. भाविक चांगोले, डॉ. सुमीत पात्रीकर, डॉ. शिवानी पुरी, डॉ. स्मीता पच्चीगर, डॉ. प्राजक्ता पात्रीकर, सेवाव्रती वनिता कविमंडन, श्रीरंग कविमंडन, हितचिंतक रवींद्र देशपांडे, आनंद गणोरकर, डॉ. राजेश चौधरी, प्रेरणा नंदापुरे, ऋषिकेश पांडे, विजया चिखलकर, अनिकेत कराळे, डॉ.सुमित धीमान, डॉ.विधी तुलशान, डॉ.प्रतीक्षा पोवते, रितिका छाबडा, शांता बामणे, कविता मेंढे, श्रेया रंगारी, विशाल कटकतलवार, ज्ञानेश्वर जगताप, आकाश काळे, तृषांत तव्वर, अनिकेत अकोटकर, हेमंत बोरीकर, सुधीर गुर्जर आणि अनिता कुळकर्णी उपस्थित होते. वैयक्तिक गीत-विजया चिखलकर यांनी सादर केले. संचालन व आभार प्रदर्शन अनिकेत कराळे यांनी केले. वंदे मातरम् या गीताने बैठकीचा समारोप झाला.

# टावरी इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी गुण गौरव सोहळा उत्साहात

**चांदूर रेल्वे/ वार्ताहर**

तालुक्यातील घुईखेड येथील श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल येथे १ मे रोजी महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने करण्यात आली. श्रीमती कमलाबाई ब. टावरी बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे संस्थापक कृष्णकुमार टावरी यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. या प्रसंगी शाळा प्रमुख रुपेश भोयर, मुख्याध्यापक प्रकाश मिरासे तसेच उपमुख्याध्यापक सतीश वानखडे उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

त्यानंतर शैक्षणिक सत्र २०२५–२०२६ मध्ये शाळा व विद्यार्थ्यांनी ऑलिम्पियाड परीक्षेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यार्थ्यांचा गुणवंत गौरव सोहळा शाळेच्या सभागृहात आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आ. प्रताप अडसड यांनी भूषविले, तर विशेष अतिथी म्हणून चांदूर रेल्वे पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी प्रसाद संकपाळ उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून विषय तज्ञ विवेक राऊत, केंद्र प्रमुख वानखडे तसेच घुईखेड येथील सरपंच वर्षलता जाधव यांची उपस्थिती लाभली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांनी ऑलिम्पियाड परीक्षांचे महत्त्व स्पष्ट केले. संस्थेचे सचिव निलेश राठी यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. अशा स्पर्धात्मक परीक्षांमुळे विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता,




**आ.प्रताप अडसड यांची उपस्थिती**

तर्कशक्ती व विश्लेषण कौशल्य विकसित होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी विज्ञान, गणित, इंग्रजी तसेच जनरल नॉलेज विषयांच्या ऑलिम्पियाड परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे, पदके व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. इंग्रजी विषयात अभिनव कोल्हे, आरव टेम्भूर्णे, सोहम राजनकर व अक्षरा ढोले यांनी यश मिळवले.गणित विषयात असित शिंगाडे, समृद्धी गोटफोडे, समृद्धी वाघ, आराध्या जिबकाटे, श्रद्धा लाडके, उन्नती वासनिक, चेतना बोरकर, सुरभी देशमुख व सूरज पांडे यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. कॉम्प्युटर सायन्स विषयात क्रांती बगाडे हिने यश संपादन केले, तर हिंदी विषयात स्वरा गिरी हिने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार प्रताप अडसड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. 'ऑलिम्पियाड परीक्षा केवळ गुणांसाठी नसून ज्ञानवृद्धीसाठी व स्पर्धात्मक वातावरणात स्वतःला सिद्ध करण्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत,' असे त्यांनी सांगितले.यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, सातत्य व आत्मविश्वास यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच इतर विद्यार्थ्यांनीही अशा परीक्षांमध्ये सहभागी होऊन आपली गुणवत्ता विकसित करावी, असे आवाहन करण्यात आले.विद्यार्थ्यांच्या यशामध्ये मोलाचा वाटा उचलणारे उपमुख्याध्यापक सतीश वानखडे, ऋतुजा भारती, राणी जवंजाळ, मनीषा बनकर, राधा गुजरकार, माधुरी लाडे, मृणाल पाचखेडे, राधा राऊत, लिना क्षीरसागर, अजिंक्य मदन यांचा गौरव करण्यात आला. तसेच परीक्षेचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांचा विभागामार्फत सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता ८ वीची विद्यार्थीनी दर्शना मेश्राम व इयत्ता ९ वीचा विद्यार्थी कृष्णा भारती यांनी प्रभावीपणे केले. आभार प्रदर्शन लिना क्षीरसागर यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे कर्मचारी अतुल राजगुरे, बंडू गिरी, होमेंद्र भोयर व गोपाल मांडवेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.




## कस्तुरा कनिष्ठ महाविद्यालय शिराळा ९२.६९ टक्के निकाल

**शिराळा-**येथील महाराष्ट्र शिक्षण समिती व्दारा संचालित कस्तुरा कनिष्ठ महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवत ९२.६९ टक्के निकाल लावला आहे.एकुण ५४ प्रविष्ट विद्यार्थ्यांपैकी ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून ८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २० विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.मयुरी अनिल सोळंके ७४.७५ गुण मिळवत केंद्रात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे.तर सिद्धी रविंद्र भनगे ६९.७० टक्के व आदिती अरसडे हिने ६८ टक्के गुण प्राप्त केले आहे.सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे महाराष्ट्र शिक्षण समिती शिराळा अध्यक्ष मनोजभाऊ देशमुख, प्राचार्य डॉ सचिन देशमुख, प्राध्यापक गायकवाड, रोडे व देशमुख यांनी अभिनंदन कौतुक केले आहे.पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## कुरळपूर्णा मूकबधिर महाविद्यालयाचा १२ वी निकाल १०० टक्के

**आसेगाव पूर्णा-**उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) परीक्षा २०२६ च्या निकालात येथील सत्यशोधक बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचालित, श्रीमती इंदिराबाई बाबारावजी कडू निवासी मूकबधिर कला व वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाने शंभर टक्के निकालासह उल्लेखनीय यश संपादन केले. या वर्षी ४१ विद्यार्थ्यांनी परीक्षेला हजेरी लावली होती. अपंगत्वावर जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर सर्व ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. यापैकी ३० विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर ११ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणीत यश मिळवले.गुणवंत विद्यार्थी प्रथम - अरुण खेमजी वसावे (७८.५०%) ,द्वितीय- साक्षी प्रदीप माने (७७.१७%),तृतीय - कार्तिक शिवशंकर येवले (७५.८३%),चतुर्थ -स्नेहल राजेश शामकुंवर (७५.००%),या यशाबद्दल माजी राज्यमंत्री आ. बच्चू कडू, संस्थेच्या अध्यक्षा डॉ. नयनाताई कडू, सचिव राहुल म्हाला व प्रशासकीय अधिकारी चंद्रशेखर मोहोड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. 'विद्यार्थ्यांनी आपल्या मर्यादांवर मात करून यश संपादन केले असून, त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे,' असे त्यांनी नमूद केले.या यशाचे श्रेय प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांना दिले जात आहे.मूकबधिर विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# अकोटात ‘बेनामी’ खाणसाम्राज्याचा स्फोट

## आदिवासींच्या नावावर उद्योग, नफा मात्र गैर आदिवासींच्या घशात

## कोट्यवधींच्या उलाढालीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष?

**अ‍ॅड. समीर ठाकूर**

**अकोला** : अकोट तालुक्यातील सातपुड्याच्या पायथ्याशी असलेल्या गाजीपूर व रुदाळी परिसरात आदिवासी बांधवांच्या नावावर सुरू असलेल्या खाणकामाच्या आड मोठ्या प्रमाणावर बेनामी व्यवहारांचे जाळे उघड होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. जमीन आदिवासींची, परवाने त्यांच्या नावावर; मात्र प्रत्यक्ष उत्खनन, गुंतवणूक आणि नफ्याचा प्रवाह पूर्णपणे गैर आदिवासी घटकांच्या ताब्यात असल्याने हा प्रकार संघटित आर्थिक गैरव्यवहाराचा असल्याची चर्चा रंगत आहे.या भागात मागील काही वर्षांत खदान, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट यांसारख्या उद्योगांचे जाळे मोठ्या प्रमाणात पसरले आहे. आदिवासी बांधवांना उदरनिर्वाहासाठी देण्यात आलेल्या जमिनींचा मूळ हेतू बदलून त्या जमिनींचा व्यावसायिक वापर केला जात आहे. आदिवासी बांधवांच्या अज्ञानाचा फायदा घेत अल्प मोबदल्यात जमिनीचा काही भाग पोटखराब दाखवून अकृषक करण्यात येत असून त्यानंतर त्या ठिकाणी उद्योग उभारले जात असल्याची माहिती आहे. या प्रक्रियेमागे धनदांडग्यांची साखळी कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातील कलम ३६नुसार आदिवासींची जमीन गैर आदिवासींना हस्तांतरित किंवा वापरासाठी देण्यासाठी शासनाची पूर्वपरवानगी आवश्यक असते. मात्र गाजीपूर आणि रुदाळी परिसरातील अनेक प्रकरणांमध्ये ही अट सर्रास मोडली गेल्याचे दिसून येत आहे. विधानसभेत विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात काही गट क्रमांकांवर परवानगीविना भाडेपट्टे तयार करण्यात आल्याचे नमूद झाले होते. तरीही संबंधित महसूल अधिकाऱ्यांकडून तातडीने कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.या उद्योगांसाठी जिल्हा उद्योग केंद्राकडून अनुदान घेतले गेले असल्यास, चुकीची माहिती देऊन ते मिळवले गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत हा प्रकार शासनाची आर्थिक फसवणूक ठरू शकतो. त्यामुळे अनुदानाची वसुली, दंडात्मक कारवाई आणि संबंधितांविरोधात गुन्हे दाखल करण्याची गरज व्यक्त होत आहे.

अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, बेनामी व्यवहार प्रतिबंध अधिनियम १९८८, खनिज नियम तसेच भारतीय दंड संहितेअंतर्गत कठोर कारवाईची तरतूद आहे. बेकायदेशीर व्यवहार आढळल्यास जमीन जप्त करणे, दंड आकारणे, अनुदानाची वसुली करणे तसेच गुन्हे नोंदविणे अशा कारवाया केल्या जाऊ शकतात.

या संपूर्ण प्रकरणात महसूल विभाग, खनिज विभाग, जिल्हा उद्योग केंद्र, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पोलीस यंत्रणा यांची संयुक्त जबाबदारी ठरते. जमीन व्यवहारांची पडताळणी, परवानग्यांची वैधता, पर्यावरणीय नियमांचे पालन आणि आर्थिक व्यवहारांची चौकशी करणे आवश्यक आहे.

दरम्यान, इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या व्यवहारांबाबत संबंधित विभाग अनभिज्ञ असल्याचे सांगितले जात असले तरी स्थानिक स्तरावर सुरू असलेली हालचाल पाहता ही अनभिज्ञता नसून जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्याची टीका होत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

### बाळू सोयाम प्रकरण ठरतेय उदाहरण

रुदाळी येथील सर्व्हे क्रमांक २ मधील अवैध उत्खनन प्रकरणी बाळू सोयाम यांच्यावर जवळपास ५८ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. मात्र प्रत्यक्षात उत्खनन कोणी केले याबाबत अद्याप स्पष्टता नाही. या प्रकरणालाही बेनामी व्यवहाराची किनार असल्याची चर्चा असून संपूर्ण यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### हस्तकांच्या नावावर व्यवहारांची साखळी

गैर आदिवासी मंडळी स्वतः पुढे न येता आपल्या विश्वासातील व्यक्तींच्या नावावर जमिनी खरेदी करत असल्याचे समोर येत आहे. या हस्तकांच्या नावावर खाणकाम आराखडे मंजूर करून प्रत्यक्षात तिसऱ्याच व्यक्तीकडून उत्खनन केले जात असल्याने हा संपूर्ण व्यवहार बेनामी स्वरूपाचा असल्याचा संशय बळावत आहे.

# विद्यार्थ्याचे अपहरण करून लुटणारे तिघे ताब्यात



### हॉटेल शालिमार समोरील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** मित्रासह दुचाकीमध्ये पेट्रोल टाकण्यासाठी गेलेल्या २१ वर्षीय विद्यार्थ्यासोबत वाद घालून त्याचे अपहरण करून त्याला जबर मारहाण करून लूटण्यात आले. यामध्ये विद्यार्थी गंभीर जखमी झाला आहे. त्याच्यावर जिल्हा सामान रुग्णालयात उपचार सुरू आहे. पोलिसांनी त्याच्या तक्रारीवरून तीन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले आहे.



दानियाल काजी नदीमोद्दिन (वय २१, अराफत मज्जित जवळ,पाटीपुरा) असे जखमी विद्यार्थ्याचे नाव आहे तर आरोपी शेख सलमान शेख अतीक (वय २८, यास्मिन नगर), शेख शाहिद शेख रशीद (वय २१, अकबर नगर) , सुफियान खान नाजिम खान (वय १९) व शेख एफाज शेख इस्माईल (वय १९) हे आरोपी आहे. यापैकी तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. एका फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे.

माहिती नुसार दानियाल काजी नदीमोद्दिन रविवारी रात्री १० वाजता आपल्या घरी अभ्यास करत होता. त्यावेळी त्याचा मित्र वजाहद अम्मार कुरेशी (वय २२) दुचाकी घेऊन त्याच्या घरी आला आणि त्याला पेट्रोल भरण्यासाठी घेऊन गेला. दोन्ही सक्करसाथ मार्गावरून जात होते. ट्राफिक जास्त असल्यामुळे त्यांनी आपली दुचाकी हॉटेल शालिमार कडे वळवली. त्याचवेळी एक पांढ-या रंगाची कार आली. कार चालकाने दानियालच्या मित्राला हटकले आणि वाहन व्यवस्थित चालवण्याचे म्हणत शिवीगाळ केली. कार आरोपी शेख सलमान शेख अतीक चालवत होता.दानियलच्या मित्राने त्याच्या माफी मागितली. यावेळी कारमध्ये बसलेले तिन्ही आरोपी खाली उतरले आणि त्यांनी वजाहदला मारहाण केली.☞(पान २ वर)

# पाळा गावालगत नदीकाठी पडिताला भीषण आग



### -कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला!

**मोर्शी/ प्रतिनिधीः-** सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या श्रीक्षेत्र पाळा येथील नदीकाठी असलेल्या बजरंगबली मंदिराच्या जवळील पडिताला अचानक आग लागली.सुदैवाने शासकीय कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळल्याची घटना काल दि.२ मे रोजी घडली.

प्राप्त माहितीनुसार मोर्शी शहरासह तालुक्यात कडक उन्हाची तीव्रता वाढली असून उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. सध्या ४५ ते ४६ अंश सेल्सिअस तापमानाची तीव्रता वाढून आगीच्या घटना घडत आहे. दि.२ मे रोजी सायंकाळी पाच वाजताचे सुमारास मोर्शी शहरासह तालुक्यात ढगाळ वातावरण निर्माण होऊन सोसाट्याचा वारा सुटल्यामुळे काही ठिकाणी टिन पत्रे उडाली व झाडे सुद्धा कोसळून खाली पडली. त्याचवेळी सातपुडा पर्वताला लागून असलेल्या पाळा गावालगत अचानक सायंकाळी पाच वाजताचे सुमारास जंगल परिसरात भीषण आग लागली.पर्वताचा भाग असल्यामुळे सोसाट्याचा वारा सुटून आगीने प्रचंड रौद्ररूप धारण केले. पाळा गाव घटनास्थळापासून अगदी जवळ असल्यामुळे आगीचे लोट गावाच्या दिशेने जात असल्याने एकच हाहाकार उडाला होता. लगेच ग्रामसेवक भातुरकर यांनी दूरध्वनीवरून संपर्क करून मोर्शी वरूड नगरपरिषदेच्या फायर ब्रिगेडला घटनास्थळी पाचारण केले. मोर्शी वरूडचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल होऊन उशिरा आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश प्राप्त केले.ही आग एवढी मोठी होती की पाळा गावातील घरे जळून खाक झाली असती मात्र कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला.ही आग लवकरात लवकर आटोक्यात यावी उष्णतेचा प्रकोप कमी व्हावा आणि होणारे वनसंपदेचे नुकसान टळावे यासाठी ग्रामसेवक पाळा ग्रामस्थ यांनी अथक परिश्रम घेतले.

# पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक विजयाचा भाजपने केला जल्लोष

### ढोल ताशे वाजवत वाटली मिठाई



**अमरावती/ प्रतिनिधीः-** भारतीय जनता पार्टीने पश्चिम बंगालमध्ये ऐतिहासिक विजय मिळवला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या रणनीती मुळे बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांचा पंधरा वर्षाचा कार्यकाळ संपवत भाजपाने शानदार विजय मिळविला. बंगाल विजयाचा भाजप ने राजापेठ येथील कार्यालयात जल्लोष साजरा केला. ढोल ताशे वाजवत मिठाई वाटली. पश्चिम बंगाल व्यतिरिक्त भाजपाने आसाम आणि पुद्दुचेरी मध्ये आपला डंका वाजवला. प्रधानमंत्री मोदी यांच्या विकास गॅरंटीवर लोकांनी विश्वास ठेवून भाजपाला मतं दिली आणि पार्टीला विजयी बनविले. जल्लोष साजरा करताना भाजपा पदाधिकाऱ्यांनी☞(पान २ वर)

# माथेफिरूचा महिला परिचारिकेवर प्राणघातक हल्ला

### भातकुली पंचायत समितीमध्ये खळबळ, आरोपी अटक

**अमरावती/ प्रतिनिधीः-** भातकुली पंचायत समिती कार्यालयामध्ये आज सोमवार ४ मेच्या दुपारी त्यावेळी खळबळ उडाली जेव्हा एका माथेफिरूने एका महिला परिचारिकेवर काचेची बॉटल फोडून हल्ला केला. यामध्ये महिला जखमी झाली आहे. तिच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या प्रकरणात पोलिसांनी माथेफिरू आरोपी मुन्नू पुजूर (वय ३५,छत्तीसगड) याला ताब्यात घेतले आहे. माहितीनुसार आरोपी मुन्नू पुजूर स्वतःला मानसिक रोगी सांगत आहे. तो पुण्यावरून नागपूर आणि नागपूर वरून छत्तीसगड जाण्यासाठी बस मध्ये बसला होता. अचानक तो बसमधून उतरला आणि भातकुली पंचायत समिती कार्यालयामध्ये पोहोचला. तिथे त्याने महिला परिचारिकेवर काचेची बॉटल फोडली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. परिचारिकेवर हल्ला करून तो तिथून पळाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस तिथे पोहोचले. त्यांनी पंचनामा करून महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले आणि थोड्याच वेळात आरोपी☞(पान २ वर)



# पिंपळखुटा येथे तरुणीची गळफास घेऊन आत्महत्या!

**मोर्शी/ प्रतिनिधीः-** मोर्शी तालुक्यातील पिंपळखुटा मोठा येथे एका २९ वर्षीय तरुणीने स्वतःच्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. चैताली सुभाष भागवत असे मृत तरुणीचे नाव आहे.

प्राप्त माहितीनुसार चैताली भागवत ही विवाहित मुलगी कौटुंबिक कारणामुळे आपल्या आई-वडिलांसोबत पिंपळखुटा मोठा येथे राहत होती.काल दि.१ मे रोजी दुपारी चार वाजताच्या सुमारास आई-वडील लग्न समारंभासाठी बाहेर गेले असतांना तिने घरातील स्वयंपाक घरात दोरीच्या साहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. आई-वडील घरी परतल्यानंतर मुलगी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आली. ही घटना समजताच गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. याबाबतची☞(पान २ वर)

# लक्ष्मी सॉ मिलमध्ये अग्नी तांडव

### मशिनरीसह लाकूड जळून ३० लाखांचे नुकसान




**अमरावती/ प्रतिनिधीः-** हमालपुरा, गांधीनगर परिसरातील लक्ष्मी सॉ मील मध्ये रविवारी रात्री अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. या आगीत मशिनरी सह इतर साहित्य जळून ३० ते ४० लाखांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. माहितीनुसार गांधीनगर परिसरात असणाऱ्या लक्ष्मी सॉ मिलमध्ये रविवारी रात्री अचानक आग लागली. आगीचा लोळ आणि धूर दिसतात परिसरातील नागरिकांनी याची माहिती अग्निशमन विभागाला दिली. अग्निशमन विभागाच्या ३ वाहनाने☞(पान २ वर)

# ट्रकच्या धडकेत ऑटो चालकाचा मृत्यू

### वेलकम टी पॉईंट परिसरातील घटना

**अमरावती/ प्रतिनिधीः-** ट्रकच्या धडकेत ऑटो चालकाचा मृत्यू झाल्याची घटना गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या वेलकम टी पॉइंट परिसरात समोर आली आहे. अहमद अली अजगर अली ( ताज नगर नं.२ ) असे मृत चालकाचे नाव आहे. या प्रकरणी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माहितीनुसार अहमद अली अजगर अली नेहमीप्रमाणे आपला ऑटो घेऊन जात होते. त्यावेळी वेलकम टी पॉइंट परिसरात ट्रक एमएच २७ बीएक्स ७१७१ क्रमांकाच्या चालकाने ऑटोला जोरदार धडक दिली. या धडकेत अहमद अली ऑटो मधून बाहेर फेकले गेले आणि ट्रकचे चाक त्यांच्या हात व पायावरून गेल्याने गंभीर दुखापत झाली. त्यांना डोक्याला आणि छातीला ही मार लागला होता. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी☞(पान २ वर)

# वीट भट्टी कामगारांचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निर्दशने

### मूलभूत सुविधा आणि शिक्षणासाठी आंदोलन

**अमरावती/ प्रतिनिधीः-** वीट भट्टी वरील कामगारांनी मूलभूत सुविधा आणि मुलांना शिक्षण मिळण्याच्या प्रमुख मागणीसाठी आज सोमवार ४ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर निर्दशने केली. स्थलांतरित मुलांचे एक स्वप्न शिक्षण आणि उज्वल भविष्य... वीट भट्टी वरील मुलांना शिक्षण, आरोग्य ,पोषण आहार सुविधा मिळाली पाहिजे.. मजुरांचा हक्क शिक्षण हा आमचा हक्क... हम हमारा हक मांगते है भीख नहीं... अशा घोषणांच्या पाट्या घेऊन आंदोलन करण्यात आले.



जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मेळघाट आणि अकोला परिसरातील आदिवासी आणि अन्य समाज बांधव पोट भरण्यासाठी मेळघाटच्या बाहेर स्थलांतरित होत असतात. मोठ्या प्रमाणात वीट भट्टी कामावर जातात. फारशी सुविधा नसल्याने ते मुलांनाही सोबत घेऊन जातात पण यामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहत ☞(पान २ वर)

# ‘दोन मुली झाल्या’ म्हणून छळ विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

### पतीसह सासरच्यांविरुद्ध गुन्हा

**अमरावती/ प्रतिनिधीः-** ‘दोन मुली झाल्या’ या कारणावरून सासरच्या मंडळींकडून होत असलेल्या सततच्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून ३५ वर्षीय विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना अचलपूर येथील फरमानपुरा भागात घडली. या प्रकरणी पोलिसांनी पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

मृत विवाहितेचे नाव साजेदा आफरीन (वय ३५, रा. फरमानपुरा, अचलपूर) असे आहे. तक्रारीनुसार, साजेदाचा विवाह आरोपी पतीसोबत झाला होता. मात्र लग्नानंतरपासूनच सासरच्या मंडळींकडून तिला सतत मानसिक व शारीरिक छळ सहन करावा ☞(पान २ वर)

# गोदावरी अर्बनला ‘महाराष्ट्र उद्योग रत्न’ पुरस्कार

### नाशिक येथील सोहळ्यात अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते गौरव

**यवतमाळ/ प्रतिनिधीः-** सहकार आणि आर्थिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गोदावरी अर्बनला महाराष्ट्र शासन पुरस्कृत ’महाराष्ट्र उद्योग रत्न २०२६’ या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. नाशिक येथील सोहळ्यात अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी हा गौरव स्वीकारला. संस्थेच्या सामाजिक आणि आर्थिक योगदानाची दखल या पुरस्काराद्वारे घेण्यात आली आहे.



नाशिक येथे आयोजित भव्य समारंभात गोदावरी अर्बनचे सचिव ॲडव्होकेट रवींद्र रगटे, उपसरव्यवस्थापक रवी इंगळे आणि चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गातून उत्कृष्ट उद्दिष्टपूर्ती करणारे भूषण काळमेघ यांनी हा मानाचा पुरस्कार स्वीकारला. आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२६ पर्यंत गोदावरी अर्बनने सहा राज्यांतील शाखांच्या माध्यमातून ३०७९ कोटी रुपयांच्या ठेवी आणि ५५५५ कोटी रुपयांचा विक्रमी व्यवसाय पूर्ण करून सहकार क्षेत्रात नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. या पुरस्काराचे महत्व अधिक आहे कारण २०२३ मध्ये हाच पुरस्कार प्रसिद्ध उद्योगपती रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता. गोदावरी अर्बनच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थापक तथा विधान परिषद गटनेते आमदार हेमंत पाटील आणि अध्यक्षा राजश्री☞(पान २ वर)

# कर्जात अडकलेल्या तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**अमरावती/ प्रतिनिधीः-** सततची नापिकी, निसर्गाचा लहरीपणा आणि वाढत चाललेला कर्जाचा बोजा यामुळे त्रस्त झालेल्या ३० वर्षीय तरुण शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना वलगाव येथे घडली. मयूर अरुणराव देशमुख (रा. पोहोकारपुरा, वलगाव) असे मृत तरुणाचे नाव असून, या घटनेने संपूर्ण परिसर शोकसागरात बुडाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १ मे २०२६ रोजी उशिरा रात्री कुटुंबातील सदस्य झोपेत असताना मयूरने राहत्या घरी गळफास घेतला. सकाळी ही बाब लक्षात येताच कुटुंबियांनी पोलिसांना कळवले. वलगाव पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठवला. मयूरकडे सुमारे साडेचार एकर शेती होती. शेतीसोबतच तो ट्रॅक्टरवर मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. शेतीच्या कामांसाठी त्याने सहकारी बँकेकडून सुमारे १ लाख ८० हजार ☞(पान २ वर)